# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१५

## अंतरंग


संपादकीय ४
वंदे मातरम्। - प्रताप वेलकर ५
अजन्मा - सुहासिनी कीर्तिकर ७
लेखिका - उज्ज्वल र. ब्रम्हांडकर ९
गानहिरा हिराबाई बडोदेकर - पं. सुजन राणे १६
एकदा काय झालं - कल्पना कोठारे १८
श्रावणसरी - अलका तळपदे २१


### वडिलांची कीर्ति


गुंजारव नायक २४
सॉ. राजन जयकर २५
विश्वास अजिंक्य २८
मृदुला जोशी २९
बागेश्री पारीख ३४

कॅ. अश्विन प्रधान ३६
प्रारब्ध - शुभांगी धराधर ४०


### बाल विभाग


परी - डॉ. सुमन नवलकर ४२
चौधरीचाचा - मेघना उदय झावबा ४५
झाडावरील भूत - भाऊ पोरे ४६
The Abnornal Horro - Armaan A. Kothare ४८
आई गं आई - वरुण राकेश राणे ६५

पुरुषोथ्थमन - नंदकुमार विजयकर ४९
While away from mother land - अचला देसाई ५२


### केल्याने देशाटन -


पूर्वाचल सप्तभगिनी - अपर्णा कीर्तिकर ५३
Our Family did the 7-8-9 too! शुभदा सुरेश आगासकर ५९
नेपाळ - जयंत बा. कीर्तिकर ६२

जयोस्तुते - सुहासिनी कीर्तिकर ६३
Effect of Social Net...-ऐश्वर्या वेलकर ६६


### चित्र हेच देखणे


पुनम कुर्डेकर ६७
अदिती हेमंत जयकर ६८
श्वेता गोगटे ६९
अदिती देसाई ७०, ७१
आभा देसाई ७१
अश्मीत जयकर ७२
जान्हवी नील कीर्तिकर ७३
अनीश नील कीर्तिकर ७३


### Foodies


राजेश नवलकर ७४
अस्मिता राणे ७४

I Celebrate Because of U...- शौनक जयकर ७९
सुखाचा शोध - विजयश्री नवलकर ८१
बदल - उज्ज्वल र. ब्रह्मांडकर ८४
Social Networking - अतीश प्रधान ८७
Approaching Sixty-मिलिंद कोठारे ८९
शताब्दी एक्सप्रेस - दीपश्री कोठारे ९०
जरा हटके - कल्पना कोठारे ९१

**कविता:**- नलिनी तळपदे, सुहासिनी कीर्तिकर, उज्ज्वल ब्रह्मांडकर, कल्पना कोठारे, तन्वी विजयकर

**वात्रटिका:-** डॉ. सुमन नवलकर

**'जरा हसा'**:- संकलन - सुहासिनी कीर्तिकर

**व्यंग्य / हास्यचित्रे -**
प्रदीप कोठारे
संदीप धुरंधर
प्रभुतरुणासाठी देणग्या, प्रभुतरुणाची डायरी, ज्ञाती संस्थावृत्त इ.
भाऊबीज,


**मुखपृष्ठ:** बागेश्री परीख

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

कार्यकारी संपादक मंडळ:
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

सहाय्यक संपादक:
**त्वरिता देसाई, भक्ती शेटये, राजेश नवलकर**

**www.prabhutarun.com**

**वर्ष ४९ वे)** **नोव्हेंबर २०१५** **(अंक ५**

# संपादकीय

आठवतेय् मला. मागे एकदा असाच 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक दिवाळी झाल्यावरच प्रकाशित झाला होता. तेंव्हाही मी संपादकीयात म्हटलं होतं की, 'आपली दिवाळी देवदिवाळीपर्यंत असते.' याही वर्षी 'प्रभुतरुण'चा दिवाळी विशेषांक देवदिवाळी साजरी करतोय्. एकापरीने ते चांगलंच. म्हणजे धनतेरस, बळीराजा, भाऊबीज वगैरे आटपून आपल्या निवांत, उसंतीच्या क्षणांचा विसावा असेल तुमचा लाडका 'प्रभुतरुण'. उसंतीचा आणि पसंतीचाही. या अंकात आपल्या पसंतीस उतरेल अशी विविधता आहे, कस आहे अन् महत्त्वाचे म्हणजे जुन्या लेखकांबरोबरीने नवीन लेखकांचा, चित्रकारांचा सहभाग आहे. कथा, कविता, लेख, नाटुकलं, वात्रटिका, व्यंगचित्रं यांची मनपसंत चंगळ आहेच; पण या अंकात 'वडिलांची कीर्ति' आहे. त्यातून परभूंचं मोठेपणाचं संचित आहे. हे संचित जपत जपतच प्रवासलेखही आहेत. गतवर्षी रंगचित्रांना अनेकांनी पसंतीची दाद दिली. या अंकातही रांगोळी, तैलचित्रे, रसिकहो; बालचित्रकलेसह तुमच्यासाठी सादर आहेत. 'फुडीज' ही गेल्या वर्षीप्रमाणे स्वाद वाढविणारी आहेच. आपल्या ज्ञातीकलाकारांना, लेखकांना सामावून घेणारा हा दिवाळी अंक तुमच्या भेटीला आला आहे. त्याचे सहर्ष स्वागत होईलच; याची खात्री आहे.

आमचे सर्व देणगीदार, लेखक, कलावंत, शुभेच्छुक, हितचिंतक आणि वाचक यांना मन:पूर्वक शुभेच्छा. देवदिवाळीच्या आणि नव वर्षाच्या! नव वर्ष सुखा-समाधानाचे, भरभराटीचे, आरोग्याचे, वाचनसमृद्धीचे जावो!

**-संपादक आणि संपादक मंडळ**
**(मंडळ भारी आहे!)**

लेख

# वंदे मातरम्

**✶ प्रताप वेलकर ✶**

'वंदे मातरम्' राष्ट्रगीत बंगालच्या बंकिमचंद्र यांनी रचले. आज ते साऱ्या देशभर गायले जाते. ६ ऑगस्ट १९०५ मध्ये रचले व राष्ट्राला अर्पण केले. ब्रिटीश साम्राज्यशाहीचा तो कर्दनकाळ होता. राष्ट्रीय चळवळीत पकडले गेलेले स्वातंत्र्यसैनिक मुखाने 'वंदेमातरम्' म्हणत वधस्तंभावर फाशी गेले. पेटलेल्या स्वातंत्र्ययज्ञकुंडात त्यांची आहुती पडली.

वंदेमातरम् हे देशाचे मानचिन्ह आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वत्र म्हटले जाते. आर्मी, नेव्ही, एअर फोर्समध्येही बॅण्डच्या तालावर मार्चिंग केले जाते. राष्ट्राच्या जागृतीचे ते एक बाह्यचिन्ह आहे. पारंपरिक साजरे होणारे, मातृदिनाचेच 'वंदेमातरम्' (मातृभूमीला वंदन) एक दृश्य फल होय.

हिंदुस्थान हा पुरातन देश रामायण, महाभारत काळातला. ख्रिस्त, इस्लामच्या आधीचा, पृथ्वीतलावर आजही दिमाखाने नांदत आहे. त्यामुळे हिंदवासीयांच्या मनात जुन्या कल्पना, चालीरीती, परंपरागत आचार-विचारांची गर्दी असते. हिंदूंचा 'पिठोरी अमावस्या' सण हा त्या काळातला मातृदिन, 'मातृदेवो भव'. पिठोरी सणाला आजच्या वंदेमातरम्चा अर्थ लावायला पाहिजे. वंदेमातरम् म्हणजे आईला वंदन, मातृभूमीला वंदन, भारतमातेला वंदन. कुटुंबवत्सल माता त्या काळातही आपल्या प्रिय बालकास, भारतमातेविषयी महत्त्व सांगून वायन-सण साजरा करीत. धरतीमातेला त्या काळीही हिंदू संस्कृतीचे मानचिन्ह मानले जात असे. देशाच्या कल्याणाची जाणीव करून सण साजरा होत असे.

शिवाजी, विवेकानंदांच्या मातुश्री ही त्याची उदाहरणे.

अगदी अलीकडचेच उदाहरण द्यायचे झाल्यास, शिवाजीला घडवणाऱ्या जिजाईचे, स्वामी विवेकानंदांच्या मातुश्रींचे. विवेकानंदांचे बंधू भूपेंद्रनाथ दत्त 'युगांतर'चे संपादक, यांना बंगालमधील दडपशाहीच्या काळात, ज्वलंत अग्रलेखांबद्दल क्रूर इंग्रज सरकारने लोखंडी बेड्या ठोकून तुरुंगात डांबले, हाल हाल केले. त्या वेळी सांत्वन करणाऱ्या लोकांना विवेकानंदांच्या मातुश्री म्हणतात, 'देवाने मला एकच काय, अशी अनेक मुले, देशकल्याणासाठी माझ्या उदरी का घातली नाहीत? तीही तुझ्या चरणी अर्पण केली असती.' किती देशप्रेम, धरतीमातेविषयी प्रेम. वंदेमातरम्!

हा झाला गेल्या शतकातला स्वातंत्र्यापूर्वीचा इतिहास. स्वातंत्र्यप्राप्तीही त्याच शतकातली. नंतरच्या काळात, भारताची खंडित स्वतंत्रता पाकिस्तानच्या निर्मितीमुळे संपूर्ण देशाला भोवली. जाचक ठरली. भारतमातेला 'सारे जहाँसे अच्छा' म्हणणारे महंमद इकबाल आदी मुसलमान भूमातेला वंदन करायचे सोडून पाकिस्तानात निघून गेले. उरलेले जाऊच शकत नव्हते. तेही हिंदुस्थानात राहून पाकिस्तानला आदर्शवत मानून आता त्यांच्या व इतर मुस्लीम राष्ट्रांच्या मदतीने इस्लामी शरीयत पुढे करून वंदेमातरम् मानायला तयार नाहीत. का? तर ते कुराणाविरुद्ध आहे. व शालेय मुलांना वंदे मातरम् म्हणण्यास बंदी घालीत आहेत.

असे असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, विक्रमराव सावरकरांनी विधानसभेवर मोर्चा नेला. त्यात काय चुकले? एकदा तर मुंबई महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीचे वेळी, सावरकरांनी 'अगर भारतमें रहना होगा, तो वंदे मातरम् कहना होगा', हे घोषवाक्य घेऊन जो वंदेमातरम् म्हणेल त्यालाच महापालिकेत सोडण्यात येईल म्हटल्यावर दंगाच पेटला. एका मुसलमान सभासदाने 'वंदेमातरम्' बोलण्याचे नाकारले. तेव्हा जंगी लाठीमार झाला. त्यात विक्रम सावरकर जखमी झाले होते. त्यामुळे जातीय दंगा होण्याची भीती निर्माण झाली. त्याचा परिणाम असा झाला की महापालिकेत काय, विधानसभेतही वंदेमातरम् म्हटले जाऊ लागले.


त्यामुळेच तर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 'लेखण्या मोडा बंदुकी हातात घ्या' हा आदेश कृतीशील अनुयायी विक्रमराव सावरकरांनी मानून ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र मिलीटरी स्कूल, भोसला मिलीटरी स्कूल, टिळक स्मारकाच्या धर्तीवर स्थापन केले व देशाचे मानचिन्ह 'वंदेमातरम्' मोठ्या अक्षराने दर्शनी दरवाजावर लावले. सदा सर्वदा मातृभूमीचे संरक्षण, मातृभूमीला वंदन 'वदे मातरम्' सदैव म्हटले पाहिजे.

'वंदे मातरम्'!

*

---

## हास्यचित्र



एकांकिका

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# अजन्मा

## ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

स्थळ - दिवाणखाना - वेळ संध्याकाळची.

(दिग्दर्शन - एक स्त्री घरात विषण्णपणे उभी, फोनची बेल वाजते. यांत्रिकपणे फोन उचलते)

दृश्य १

स्त्री : हॅलो

मुलगा : ममा, कशी आहेस? गुड न्यूज. अगं माझं 'ग्रीन कार्ड' मिळालं.

स्त्री : अरे व्वा, कॉंग्रॅट्स. मग... काय विचार केलास?

मुलगा : ती माझ्याबरोबर माझी कलीग आहे ना; ती गं काव्या... जर्मनीला असते ती... तीपण स्टेटस्ला शिफ्ट होणार आहे. आणि ममा... मी लग्न करीन म्हणतोय.

स्त्री : म्हणजे?

मुलगा : म्हणजे हेच. कसं सांगू तुला? अजून दोन-तीन, नाही. तीन-चार वर्ष तरी घरी येण्यास मिळणार नाही.

स्त्री : बरं (अत्यंत सावकाशपणे फोन ठेवू पहातेय. तरीही संवाद साधत )

मुलगा : मी तुला 'विझा' पाठवून बोलावून घेईन. जरा धीर धर. (स्त्री मुलाच्या फोटोकडे बघत बसते.) (काळोख)

दृश्य २

स्त्री हतबलपणे बसलेली. तिची नजर टेबलाच्या खणाकडे जाते.

(दिग्द : खणावर प्रकाशझोत)

दृश्य ३

स्त्री उठून खणाजवळ जाते. परत माघारी येऊन खणाजवळ बसते. अस्वस्थ होऊन खण उघडते व एक जाडजूड पॅकेट बाहेर काढून छातीशी कवटाळते. पदराच्या कडेने हळूच डोळे टिपून, निर्धाराने, पॅकेटमधून फिल्म बाहेर काढते व प्रकाशाकडे धरते.

दृश्य ४

(गर्भातील मुलाच्या हालचालींचे पडद्यावर चलनवलन. अशावेळीच मल्याळी सुरात नर्सचा आश्वासक आवाज पडद्याआडून)

बेबी का पोझिशन अच्छा है। डरनेका नही हा।

**दृश्य ५**

स्त्री : (स्त्रीचा भयभीत चेहरा टेबलावर झोपलेली) बेबी का म्हणाली ती? बेबी म्हणजे? अहो, बेबी नको आहे आम्हाला. बाबा हवा आहे. म्हंजे मला नाही. सासुबाईंना वंशाचा दिवा हवा आहे. नवऱ्याला नवा सचिन तेंडुलकर जन्माला घालायचा आहे. बेबी नकोच. हे साऊथवाले काहीही बोलतात. बेबी म्हणजे काय? बाबा असेल तरी बेबीच म्हणतात का? (तिनं बेधडक तिला विचारलंच)
बेबी म्हणजे मुलगा? की मुलगी? अं?
आतून नर्सच्या पूर्वीच्याच अवस्थेत आवाज-
''हा ऽऽऽ, वैसा बोलनेका अलाऊड नै है. ऐसा पूछनेका नै है...''

दृश्य ६

(पडद्यावरचं दृश्य)

स्त्री : फिल्म हळूहळू खाली आणीत पॅकेट ठेवायला जाते. एवढ्यात दोन लहानसे हात फ्रेममध्ये येतात आणि त्या स्त्रीला मागून कवटाळतात खांद्याशी उष्ण श्वास जाणवला, म्हणून दचकून तिनं मागे पाहिलं तर...

दृश्य ७

(भास-आभासात्मक स्वप्नील - धूसर प्रकाशात)

एक ४-५ वर्षाची छोटी चिमुरडी फ्रेममध्ये दिसते. स्त्री (तिचा हात धरून समोर बसवते. मग त्यांचे संभाषण)

स्त्री : का आलीस तू?

बेबी : तुला माझी आठवण आली म्हणून... दादा येणार नाही ना... म्हणूनच माझी आठवण झाली ना?

(सूचना- स्तब्धता)

बेबी : सांगना... पण मी का नको होते गं तुला?

स्त्री : सांगितलं ना... सासुबाईंना वंशाचा दिवा, तुझ्या जन्मदात्याला सचिन, आजोबांना टग्या नातू असं सगळं हवं होतं. तू नको होतीस!

बेबी : हे तितकसं खरं नाही. तू मनात आणलं असतंस, तर माझा जन्म नक्की झाला असता. मुलगी वाढवायला खूप मजा येते असं तुम्ही लोक म्हणता ना? बेटी, धनाची पेटी वगैरे? मग तुला मी का नको झाले? तू जर निश्चय केला असतास, तर माझा जन्म नक्कीच झाला असता. मीही तुझ्यासारखी शाळा कॉलेजात जाऊन खूप शिकले असते. नोकरी केली असती. एक कर्तृत्ववान मुलगी होऊ शकली असती.. असं तुला एकटं पडू दिलं नसतं. अगं मी सांभाळलं असतं तुला... का नाही जन्म दिलास तू मला? मीही मोठी झाली असती. मदर तेरेसा, साधनाताई आमटयांसारखी गरीबांची सेवा केली असती. किरण बेदी, मीरा बोरवणकरप्रमाणे पोलीस अधिकारी बनून गुंडापासून समाजाचे रक्षण केले असते. बचिंद्र पालप्रमाणे हिमालय सर केला असता. काही नाही तरी तुझी मुलगी असते मी. आई, का तू असं केलंस? का? का?

दृश्य ८

पुन्हा अंधार. मग त्या खणावर परत तीव्र प्रकाशझोत. ती स्त्री रेडिऑलॉजी रिपोर्टस्चे कागद त्यातून हातात घेते. मग मोठ्यानं हंबरडा फोडत ती स्त्री- ''हा हा माझा मुलगा तिथेच लग्न करणार. माहित्येय मला. तिथ्थेच रहाणार. याच्यासाठी याच्यासाठी का मी माझ्या पोटची कळी खुडली? काळजावर दगड ठेवला?... आता मला पुन्हा एकदा काळजावर दगड ठेवत माझ्या मुलाशी संवाद तोडायचाय. दगड बनायचंय.''

दिग्द : विक्षिप्तपणे हातवारे करत शांत, निर्विकार होत जाते ती. त्याचक्षणी फोन परत परत किंचाळू लागतो. परत... परत..

(आधारित संकल्पना)

*

## स्वप्न

स्वप्नांतल्या कळ्यांना
का आज जाग आली?
उमलूनी भावसुमने
सुगंध उधळण झाली।।धृ.।।

स्वप्नांतल्या सुरांनी
हे हर्षगीत फुलले
बेभान संगीताने
मन धुंद धुंद झाले
त्या धुंदीनेच का ही
पहाट आज फुलली?।।१।।

स्वप्नामधील रेषा
का आज सजीव झाल्या
स्वर्गीय कुंचल्याने
जणू त्याच रंगलेल्या
त्या रंगपंचमीने
प्राचीच आज न्हाली।।२।।

कितीदा उराशी जपले
ते स्वप्न भंगलेले
हे स्वप्न की खरे ते
नाही अजून कळले
स्वप्नात सत्य लपुनी
फसगत कशी जहाली।।३।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

कथा

# लेखिका

**✶ उज्ज्वल र ब्रह्मांडकर ✶**

टेबलावर कागदांची चळत ठेवून मी बसले होते. डोक्यातली चक्रं भराभरा फिरू लागली होती. एक कथानक आकार घेऊ लागलं होतं. विचारांचे उलटसुलट प्रवाह थैमान घालीत होते. त्या मंथनातून नेमके शब्द वर येत होते.

मी पेन सरसावलं. लिहायला सुरुवात केली. आज महत्प्रयासानं वेळ मिळाला होता. पान, दोन पानं लिहून झाली होती. प्रास्ताविक संपत आलं होतं. आता कुठं कथानक वेग घेऊ लागलं होतं. डोक्यातून कथानकाचा ओघ हाताच्या बोटापर्यंत झंझावाती वेगानं वाहात होता. त्या ओघाच्या वेगानं लिहिणं मुष्किल होत होतं. कथा हवी तशी मनपसंत जमत चालली होती, आणि....

नेमक्या ह्याच वेळेला बेल वाजली. एकदा, दोनदा आणि मग अखंडपणे... नक्कीच सतेज व सोनल शाळेतून आले होते.

मुकाट्यानं पेन ठेवून उठले. मन खूप निराश झालं होतं. पण मनातली निराशा लपवत मी दार उघडलं - चेहऱ्यावर हसू आणलं.

मुलं आत आली. नेहमीप्रमाणेच त्यांचा धुमाकूळ चालू झाला होता. दोघांनीही स्कूल बॅग्ज टेबलावर एकामागोमाग दाणदाण आपटल्या. वॉटर बॅग्जमधलं उरलं सुरलं पाणी एकमेकांच्या अंगावर उडवण्याची खोटी धमकी दिली. नंतर दोघं कपडे बदलायला पळाली.

एकाच क्षणानंतर सोनलचं रडणं, सतेजचं चिडवून हसणं, गळ्यात गळा घालून माझ्या भेटीला आलं.

जाऊन पाहिलं तर सोनलनं फ्रॉक उलटा घातला होता. तो घालताना खांद्यावर घट्ट अडकल्यासारखा झाला होता. बटणं केसात गुंतल्यामुळे तिला तो पटकन काढताही येत नव्हता. नी सतेज ते पाहून जोरजोरात हसत होता. तिला चिडवत होता.

मी पुढे होत सतेजला दम दिला -

'काय रे हे? कशाला चिडवतोयस तिला? तू सुद्धा लहानपणी असेच गोंधळ करायचास.''

नी नंतर दोघांनाही संयुक्तपणे सुनावलं - ''चला बघू, लवकर आटपा.''

पण माझ्या बोलण्याकडे सतेजचं लक्षच नव्हतं. माझा हात पकडून नेहमीप्रमाणे वर्गातल्या मुलांच्या त्याच्या दृष्टीनं असलेल्या गंमती जमती सांगत होता-

''ए मम्मी, आज नं वर्गात काय झालं माहीतंय...?'' त्याला मध्येच अडवून सोनलनं सूर लावला.

''ए मम्मी गऽऽ, आज माझ्या मैत्रिणीनं नंऽऽ....''

दोघांच्याही बोलण्याकडे अर्थातच माझं लक्ष नव्हतं. मी नुसतंच 'हं हं' करीत होते.

मध्येच सतेजनं काहीतरी प्रश्न विचारला.

माझं लक्ष नव्हतंच.

''एऽऽमम्मीऽऽ मी काय विचारतोय? तू कधीसुद्धा आमच्याकडे लक्षच देत नाहीस.''

''नाहीतर काय? आज केवढी मजा आली ती मी सांगितली तर ऐकतच नाही'' - सोनलनं री ओढली.

''कळलं रे. काय नवीन असणाराय तुमचं? नेहमीचंच ते'' - मी करवादले. तशी सोनल हिरमुसली.

सतेजनं इकडे तिकडे शोधक नजरेनं बघितलं नी एकदम डोळे मोठे करीत तो सोनलला म्हणाला-

''एऽऽ गडबड करू नकोस. आई कामात आहे.''

''म्हंजेऽऽ?'' सतेज मोठेपणाचा आवा आणीत तिला समजावू लागला - ''आई किनई गोष्ट लिहितेय.''

''अय्या? खरंच? गोष्ट? मम्मी मला सांग नं...''

''तुला कशी सांगणार? समजणार नाही गं.''

माझा समजावणीचा प्रयत्न

''अं.... अं... समजेल. मला गोष्ट पायजे...''

सोनलनं सूर काढला.

''गप्प गं'' - आता मात्र मी कातावले....

''जा. मुकाट्यानं हात पाय धुवा नी दूध घ्या.''

''मम्मी, आज खायला काय केलंयस?''

सोनल नवीन खाऊच्या आशेनं गोष्ट विसरली.

''काहीच नाही. भाजीपोळी नाहीतर ब्रेडजाम खा. काय देऊ?''

''काहीही नको-'' सतेजनंच परस्पर उत्तर दिलं.

''काय नेहमी नेहमी भाजीपोळी नाहीतर ब्रेड जाम खायचा? मला शिरा करून दे'' - सतेजची गोड फर्माइश.

''मला बटाटे पोहे दे'' - सोनलला गोड आवडत नाही. दादानं त्याच्या आवडीचा पदार्थ सांगितला तर मी का नको? या थाटात सोनलनंसुद्धा आपली आवड फर्मावली.

''हे बघा, मी काहीही करणार नाही. सांगितलंय ते खायचं तर खा नाहीतर नको'' - मी थोडसं दटावूनच सांगितलं. दोघांच्या चेहऱ्याकडे बघितलं तर दोघांच्याही चेहऱ्यावर ठेवणीतल्या अस्त्राची चाहूल लागली नी त्यांचे रडण्याचे सूर टिपेला पोहोचण्याच्या आधीच मी माझा टिपेला पोहोचलेला आवाज खाली आणला. गोडीगुलाबीनं त्यांना समजावलं नी खायला घालून खेळायला पाठवलं. आता निदान सात वाजेपर्यंत तरी वेळ मिळणार होता लिहायला. सात वाजता हे आले असते म्हणून मी पुन्हा लिहायला सुरुवात केली.

जेमतेम पंधरा मिनिटं झाली असतील नी परत बेल वाजली. एकदाच पण खणखणीतपणे. आता कोण आलं मध्येच? असं पुटपुटत मी दार उघडलं. दारात हे उभे होते.

'आ? तुम्ही आता कसे?''

''का? येऊ नये?''

''च. तसं नव्हे हो. पण नेहमी उशीरा येता.''

''हीच तक्रार असते तुझी नेहमी! म्हणून तर आज तुला चकीत करायचं ठरवलं. आता तरी खूष ना राणी सरकार?'' - घरात कुणाची चाहूल लागत

## हास्यचित्र



नाही हे पाहून ह्यांनी पटकन् मला मिठीत घेतलं नी...

खरं तर माझ्या कथानायिकेच्या आयुष्यातले प्रेमाचे क्षण मी त्यावेळी कल्पनेनं रंगवीत होते. इथं प्रात्यक्षिक होत होतं. पण माझं मन व्यापून बसली होती माझी कथानायिका. त्यामुळं माझ्याकडून नकळतच प्रतिसाद दिला गेला नाही. त्याचा अर्थ ह्यांनी मात्र वेगळाच लावला. नी मला अधिकच खूष करावं म्हणून म्हणाले -

''तू नेहमी कंटाळतेस नं स्वयंपाक करायला, म्हणून आज आपण जेवावयास बाहेरच जाऊ.''

माझं मन एकदम आनंदलं - चला तेवढाच जास्त वेळ मिळेल लिहायला. तेवढ्यात पुढच्या वाक्याच्या प्रहाराने माझ्या प्रतिभेचे पंखच छाटले गेले - ते म्हणत होते -

''चल लवकर तयारी कर. मुलांना बोलाव. मी सिनेमाची तिकीटं काढलीयत. सहाच्या शोला जाऊ या नी परस्पर जेऊनच येऊ या.''

''झाऽऽलं -म्हणजे आजही दिवस फुकट गेला-''

''फुकट?'' हे आश्चर्याने ओरडले, ''माझ्याबरोबर सिनेमाला येणं म्हणजे तुला दिवस फुकट जाणं वाटतं?-''

''नाही नाही - तसं नाही हो - माझी कथा किनई अर्धी झालीय. ती पुरी करायची होती...''

''लिहिशील गं नंतर. उद्या लिही हं-''

''उद्या काय जमणार कपाळ? जसा आजचा दिवस गेला तसा उद्याचा पण जाणार...''

''जाऊ दे. त्यात काय?''

''तुम्ही असं म्हणणारच! तुम्हाला बायकोचं कौतुकच नाही. बायको एवढी लेखिका आहे. पण....''

''अगं पण ती कथा ताबडतोब एखाद्या संपादकांनी मागितली तर नाहीय ना? तशी तेवढी प्रसिद्ध लेखिका व्हायला वेळ आहे अजून तुला...''

''म्हणजे? मी प्रसिद्ध नाही असं म्हणायचंय की काय तुम्हाला?''

''अगं एक कादंबरी आणि काही कथा झाल्यात प्रसिद्ध... पण..''

''हूं:! तुम्हाला मुळी कौतुकच नाही माझं आणि शिवाय माझा वेळ सगळा घरकाम, रांधा वाढा, उष्टी काढा यातच जातो. मला वेळच कुठे मिळतोय लिहायला? ती वर्षा कुलकर्णी पहा..''

**वात्रटिका**

**डिग्री**

इथे डिग्री विकत मिळते  
कोणती तेवढंच बोला राव.  
डिग्री जितकी वरची.  
तितक्या उंचीची थप्पी लाव.

**-डॉ. सुमन नवलकर**

''कोण वर्षा कुळकर्णी?''

''अय्या! तुम्हाला वर्षा कुळकर्णी माहीत नाही?''

आता माझ्यासमोर अज्ञान कशाला दाखवा म्हणून ह्यांनी म्हटलं -

''हां हां ! ती काल तुझी मैत्रीण आली होती ती?''

''छे हो! वर्षा कुळकर्णी माझी मैत्रीण नाही. सुप्रसिद्ध लेखिका आहे म्हटलं - ! आहा! काय सुरेख लिहिते! कितीतरी पुस्तकं आहेत तिच्या नावावर. ती काय उगीच?''

''म्हणजे! मी नाही समजलो तुला काय म्हणायचं ते.''

''नाहीच समजायचं. मी सांगते समजावून. तिच्या एवढ्या कादंबऱ्या प्रसिद्ध होतात त्या उगीच नाही. तिला घरात काडीचंही काम करावं लागत नसेल. तिच्या मिस्टरांचं तिला पूर्ण सहकार्य असेल. मस्त एक निवांत खोली तिची स्वत:ची असेल! त्यात एक लिहिण्याचं टेबल, टेबलावर एक सुंदर दिवा, वर पंखा, समोर खिडकी, खिडकीतून डोकावणारा निसर्ग...''

''अहो म्हटलं बाईसाहेबऽऽ मुंबईत निसर्ग खिडकीतून दिसतो तरी कितीसा?''

''ऐका हो. मी काय सांगत होते की, अशी वातावरण निर्मिती असेल तिच्या घरात. मनात येईल तेव्हा ती लिहीत असेल. नाहीतर आम्ही बसलोय आपलं चहाखाणं, स्वयंपाक ह्या वर्तुळात घुमत...''

''हो, बरी आठवण झाली - खायला काय केलयंस ते दे नी तयार हो बघू चटकन.''

''हेच ते! त्या वर्षाचे मिस्टर तिला असं भावसमाधीतून ओढून बाहेर काढीत नसतील.''

''तुझी भावसमाधी लागली असेल, पण मला इतकी भूक लागलीय की, खरोखरची समाधी... जाऊ दे... खायला देतेस ना? चहा पण कर.''

''खायला ब्रेड जाम किंवा पोळी भाजी आहे.''

''हंऽऽ! द्या ब्रेड जाम - तेवढं तरी ठेवताय पुढ्यात! उपकार म्हणायचे. नी आता वाद पुरे. पावणेसहा वाजलेत. तुझ्या आवडीच्या हिरोचा सिनेमा आहे. चल लवकर....''

मग मात्र मी नाईलाजानं का होईना पण मुलांना हाका मारल्या नी एकदाचे आम्ही वेळेवर सिनेमाला निघालो आणि वेळेवर पोहोचलो.

ह्या घटनेला काही दिवस लोटले. एक दिवस मी संध्याकाळी नेहमीप्रमाणे भाजी आणायला बाजारात गेले. थोडी फार बाजारहाट करून घरी परतत असताना समोरून येणारी बाई मध्येच थबकली. ती मला निरखीत होती - म्हणून मी बघितलं. तेवढ्यात ती म्हणाली -

''तू.... तुम्ही निमा काळे का?''

''हो - माझं माहेरचं नाव निमा काळेच, पण मी नाही ओळखलं तुम्हाला - ''

यावर ती खळखळून हसली. तिचे कुंदकळ्यांसारखे दात दिसले नी चटकन ओळख पटली.

''अगं तू सुधा - सुधा देशपांडे ना? सांगलीला आमच्या शेजारी होतीस...''

माझ्या खांद्यावर चापट मारीत ती म्हणाली - ''पूर्वीसारखीच आहेस हं.... विसराळू!''

''ए, नाही गंऽऽ तुझ्यात खूप बदल झालाय आता. म्हणून ओळखलं नाही मी तुला. खूप बारीक झालीयस, तुम्ही सांगली सोडल्यानंतर काहीच कळलं नाही तुझ्याबद्दल. लग्नालाही बोलावलं नाहीस.''

''वा बाईसाहेबऽऽ! कमाल झाली तुमची. अगं नंतर तुम्ही सांगली सोडताना मुंबईचा पत्ता पाठवला होतास का मला? कुठे कळवणार होते मी तुला?''

## हास्यचित्र



''अय्या खरंच की! पण ते जाऊ दे. आता सांग घरी कोण कोण असतं? मिस्टर काय करतात? मुलं किती?''

''सांगते. सगळं सांगते - माझे मिस्टर एका खाजगी कंपनीत अकाऊंटंट आहेत. पगार तसा ठीक आहे. पण पुरत नाही म्हणून मी नोकरी करते. घरी सासू सासरे आहेत. एक धाकटा दीर व नणंद आहे. कॉलेजमध्ये जाणारे. दोन मुलं आहेत.''

''छान की गं! मुलांना सासू सांभाळीत असेल.''

''नाही गं. सध्या त्यांना मोतीबिंदुमुळे दिसत नाही.''

''मग मोलकरीण ठेवलीयस का?''

''नाही. तशी मोठी झालीयत आता. करून घेतात आपली आपण. मी सकाळी सगळा स्वयंपाक करून जाते. सासऱ्यांच्या मदतीनं सासूबाई जेवतात. हे माझ्याबरोबरच निघतात. संध्याकाळी घरी आल्यावर पुन्हा संध्याकाळचा चहा, खाणं, स्वयंपाक, भाजी आणणं. शिवाय मुलांचा अभ्यास असतोच.''

''बाई गंऽऽ एवढं सगळं करतेस?''

''आतां सवय झाली गं. काही वाटत नाही ह्याचं.''

''एऽऽ एकदा घरी ये ना. मी येथून जवळच राहते. कोपऱ्यावरची ती निळी इमारत दिसतेय ना, तिथून वळलं की चौथी बिल्डिंग. माझं आताचं नाव नीलम जोशी.''

''खरं सांगू! तूच ये आमच्याकडे. माझा दिवस कसा जातो ते मी सांगितलंच तुला. त्यातून कधी वेळ मिळणार? तुला भरपूर वेळ असेल. नोकरी करीत नसशीलच. चेहराच सांगतोय तुझा. शिवाय तू जी बिल्डिंग सांगितलीस, तिथं सगळे बडे बडे लोक राहातात.''

''अगं कसले बडे? मला सुद्धा सगळी घरची कामं करावी लागतात. शिवाय... मी लिहिते नं! माझी एक कादंबरी प्रसिद्ध झालीय नी नेहमीच कथा येतात मासिकांमधून. नीलम जोशी नाव बघ. मीच ती'' - मी थोडंसं गर्वानं, थोडंसं लाजत सांगितलं.

तिनंही कौतुक केलं - ''हो कां? अरे वा! मला माहितीच नव्हतं. आता वाचेन हं तुझ्या कथा. कादंबरी सुद्धा वाचेन. दुकानात असेल नं?''

''हो हो. वाचनालयातही असेल. नाहीतर मीच घेऊन येईन तुझ्याकडे. कुठे राहतेस तू?''

''मी पलीकडच्या त्या शाळेजवळच्या चाळीत राहाते. भवानजी यशपाल चाळीत. दोन खोल्या आहेत आमच्या. गरीबाचं घर आहे हो आमचं.''

''इश्श्य! सुधा, काहीतरीच बोलतेस बघ. अगं बालपणीच्या मैत्रिणी आपण. मी नक्की येईन हं माझं पुस्तक घेऊन. बघ तरी मी कशी लिहिते ते. खरं सांगू का? माझं मलाच नवल वाटतंय की मी लेखिका कशी झाले त्याचं. एऽऽपणं तुझं आताच नाव काय? नाहीतर मी आपली 'सुधा देशपांडे'च शोधेन.''

''हो, बरं केलंस विचारलंस ते. माझं आताचं नाव- वर्षा कुळकर्णी''

''वर्षा कुळकर्णी-?'' मी क्षणभर दचकलेच, पण असतात नावासारखी नावं. म्हणून मी पुढं काही

## देव बोले मानवाला

कर्म करून वाकडे, नका घालू हो साकडे
करूनिया घातपात नका जोडू दोन्ही हात
दाखवून मन, हिरावून धन
नका घालू माझ्या पायी लोटांगण
खुपसून आणि कुणा पाठीमध्ये सुरा
रक्ताळले हात नका जोडू नमस्कारा
भ्रष्ट केल्या ज्यांनी कुलवन्त लेकी सुना
मागावे ना त्यांनी कधी माझ्या वरदाना
धनासाठी गुप्त दिले बळी अर्भकांना
शिवणार नाही त्यांच्या नैवेद्याच्या पाना
एकाकी ते वृद्ध आणि अश्रापांचा घात
करू नये गाभाऱ्यात त्यांनी तेलवात
कुणावर घालुनीया अवचित घाला
नका घालू माझ्या गळा सुमनांच्या माळा
माझ्याहून वाटे ज्यांना पैसा परमेश
मिळणार नाही त्यांना राऊळी प्रवेश
देऊनिया बुद्धी तुम्हां चुकलो का मीच?
नसतात सारखीच कधी बोटे पांच
कोटी पापभीरू त्यात असतील देवभोळे
न्याय तुम्हा मानवांचा सुक्यासंगे ओले जळे
माझ्याकडे आहे पापपुण्याची ती नोंद
मनमन्दिराची माझ्या तुम्हांसाठी दारे बन्द

**- नलिनी तळपदे**

## 'पहाटेचे स्वप्न'

चालत होते भरभर भरभर
जरा न कुरकुरले ते सांधे
रस्ते होते सरळसोट नि
बुजले होते सारे खड्डे
ज्येष्ठ नागरिक म्हणुनी होते
मदत कराया तत्पर सारे
गर्दीमध्ये म्हणती, आधी
आजींना त्या जागा द्या रे
भरभरूनी पण वेळेवरती
धावत होत्या साऱ्या गाड्या
'रुपसंगमी' पैठणीसह
स्वस्तच होत्या साऱ्या साड्या.
कुठे न दिसली झोपडपट्टी
घेता आला श्वास मोकळा
'रचना' मधुनी घेऊनी आले
इडली आणि मस्त ढोकळा
ज्येष्ठ नागरिक म्हणुनी मिळे तो
मान आणखी सन्मान
भार न भुईला झाला म्हणूनी
जाहीर झाले पद्मविभुषण
जरी स्वच्छ ते होते रस्ते
तरी तरंगत हवेत होते
खरेच होईल माझे का पण
पडलेले हे स्वप्न पहाटे?

**- नलिनी तळपदे**

बोलले नाही, पण तिनंच विचारलं -

''का गं? दचकलीस?''

''नाही गं सहज. याच नवाची एक प्रसिद्ध लेखिका आहे.'' ती नुसतीच हसली.

तेवढ्यात बाजूनं जाणाऱ्या एका बाईनं तिला हटकलं नी म्हटलं - ''वर्षाबाई परवाच तुमची नवीन कादंबरी 'द्वैत' वाचली. नेहमीप्रमाणेच मस्त आहे हं. कसं बाई सुचतं तुम्हाला कोण जाणे...?''

मी आश्चर्यानं ऐकतच राहिले. ती बाई निघून जाताच मी विचारलं -

''सुधा, ... म्हणजे ... म्हणजे ती प्रसिद्ध लेखिका म्हणजे तूच?..''

''हो... नी प्रसिद्ध कसली? आहेत आपल्या पन्नास एक कादंबऱ्या माझ्या नावावर...''

''पन्नासऽऽ?'' हो- सहज तेवढ्या असतील म्हणा.. पण.. पण काय गं, तू मघाशी कामाचा एवढा पाढा वाचलास ह्यात लेखनाचं काम केव्हा करतेस?.''

''कधीही वेळ मिळेल तसं... कधी कधी रात्री दहा ते दोनपर्यंत तर कधी सुट्टीच्या दिवशी दुपारी वेळ मिळालाच तर. बहुधा रात्रीच लिहिते. सुट्टीचा दिवस हा जास्त कामाचा दिवस असतो.''

''तुझ्यासाठी वेगळी खोली घेऊन ठेवलीयस का?''

''नाही बाई - ती कशासाठी?''

''अगं तुला निवांतपणा, वातावरणनिर्मिती लागत असेल ना?''

''निवांतपणा लागतो, पण बाकी काही लागत नाही - सगळे झोपले की स्वयंपाकघरात पाय पसरून खाली एखादं मासिक धरून त्यावर कागद ठेवून लिहित बसते...''

''कम्माल गं बाई तुझ्यापुढे! केवढा उरक आहे तुला!''

''कसलं ग! आमचं आपलं काहीच धड नाही आम्ही जॅक ऑफ ऑल - मास्टर ऑफ आर्टस् ही पदवी 'मास्टर की' पण ना धड संसार, ना धड नोकरी, ना करिअर, ना लेखन! कुठेच नीट न्याय देता येत नाही. सगळ्याच भाराभर चिंध्या. ऑफीसात असताना घर आठवतं. घरी असताना काम करताना लेखन डोक्यात घोळतं. लिहिताना मुलांचा अभ्यास आठवतो नी त्यांचा अभ्यास घेताना ऑफीसमधलं उरलेलं काम, सहकाऱ्यांच्या वागण्याच्या तऱ्हा, स्वभाव डोक्यात घोळतात. त्यातूनच एखादं व्यक्तिमत्त्व तयार होतं. सगळं कसंतरी रेटायचं.''

''अगंपण, त्यातचतर तुझी खरी करामत आहे. एवढी व्यवधानं तू सांभाळते आहेस. ती सुद्धा समर्थपणे!''

''जाऊ दे ते. ये एकदा घरी - अच्छा... खूप उशीर झालाय. घरी काम खोळंबलीत...''

...ती निघूनही गेली. मी मात्र कितीतरी वेळ खुळावल्यागत तिथंच उभी होते. माझं फक्त एकच पुस्तक प्रसिद्ध झालं होतं नी मी स्वतःला प्रसिद्धीच्या शिखरावर उभी असल्यागत समाजात वागत होते. घरादाराला नाचवीत होते. पण ही खरी प्रसिद्ध देवता घरच्यांना संतुष्ट ठेवून मगच आपलं कार्य करीत होती.

तिची लहानखुरी, दूरवर ठिपक्यागत दिसणारी मूर्ती खूपखूप उंच वाटत होती नी मी तिच्यापुढं अधिकच खुजी वाटू लागले होते.

## हास्यचित्र



लेख

# गानहिरा: हिराबाई बडोदेकर

★ **पं. सुजन राणे** न्यू जर्सी, यु.एस.ए. ★



यावर्षी २० नव्हेम्बरला गानहिरा हिराबाई बडोदेकर यांची पुण्यतिथी आहे. त्या २० नव्हेंबर १९८९ साली स्वर्गवासी झाल्या. तेव्हा अशा नावाजलेल्या शास्त्रीय गायिकेवर लेख लिहीण्याचा मोह आवरत नाही. या लेखाद्वारे सर्वसाधारण वाचकांना व सध्याच्या तरुण पिढीतल्या गायकाना या गायिकेबद्दल थोडक्यात माहिती मिळावी हा उद्देश आहे. शिवाय मी एक किराणा घराण्याचा गायक असल्यामुळे व त्या घराण्याचे प्रसिद्ध गवयी पं. फिरोज दस्तूर यांचा जेष्ठ शिष्य असल्यामुळे मला हिराबाईंसारख्या या घराण्याच्या थोर गायिकेबद्दल अभिमान असणं साहजिक आहे. हिराबाईंचा जन्म बडोद्यात ३० मे १९०५ साली झाला. त्यांचे वडील किराणा घराण्याचे अजरामर गवयी खांसाहेब अब्दुल करीमखान होते तर; आई ताराबाई होत्या. लहानपणी त्या चम्पाकली म्हणून ओळखल्या जात होत्या. खानसाहेब बडोद्याचे दरबारी गवयी होते व ताराबाई बडोद्याच्या सरदार माने ( राजमातेचे भाऊ) यांच्या कन्या होत्या. बडोद्याच्या महाराजांनी खानसाहेबांना राजदरबारी मैफिली सादर करण्यासाठी पदरी ठेवले होते म्हणून ते शिकवण्या करत नसत. परंतु सरदार मानेंच्या सांगण्यावरून त्यांना ताराबाईंची शिकवणी पत्करावी लागली. शिकताशिकता ताराबाई खानसाहेबांच्या प्रेमात पडल्या परंतु सरदार मानेंच्या विक्षिप्त स्वभावामुळे खानसाहेबाना व ताराबाईन्ना बडोद्यात राहणं कठीण होत गेलं व शेवटी नाईलाजाने त्या दोघांनी आपला मुक्काम मुंबईला हलवला. एक मुसलमान गवयी व त्यांची एक हिंदू शिष्या एकत्र राहाणं हे त्या काळच्या सामाजिक प्रवृत्तीला धरून नसल्याकारणाने त्याना विवाहाच्या बंधनाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. लवकरच त्यांचा विवाह होऊन त्याना कालांतराने सुरेशबाबू, कृष्णराव, कमलाबाई, हिराबाई व सरस्वतीबाई अशी पाच मुलं झाली. काही वैयक्तिक गैरसमजामुळे खानसाहेब व ताराबाई मुंबईत फार दिवस एकत्र राहू शकले नाहीत व निराळे झाले.

ताराबाई स्वभावानी मोठ्या खंबीर होत्या. त्यांनी पाचही मुलांना संगीतापासून वंचित केलं नाही.

सुरेशबाबुंना खानसाहेबांकडून चागली तालीम मिळाली होती व त्यांचा आवाज जात्याच आपल्या वडिलांसारखा होता. त्यांची तिलंग रागातली ध्वनिमुद्रिका ‘देखे बिना नाही चैन’ ह्या विधानाची सत्यता पटवते. हिराबाईंना त्यांच्या वडिलांकडून तालीम मिळण्याचं भाग्य लाभलं नाही परंतु ताराबाईने न खचता खानसाहेबांचे पुतणे वहीदखान यांना गाठून हिराबाईंसाठी त्यांची नियमित तालीम

चालू ठेवली. वहीदखान एखाद्या रागाची बढत कशी करावी हे शिकवण्यात कुशल होते. ह्या बाबतीत एक किस्सा मनोरंजक आहे. जयपूर घराण्याचे विद्वान गवयी अल्लादिया खान यांचे पुत्र भुर्जी खान एके दिवशी मुद्दाम वाहीदखांची तालीम ऐकायला गेले असताना त्याना ते एखाद्या रागाचं जाळं कसं विणत असत हे ऐकून थक्क झाले. थोडक्यात वाहीदखानांच्या तालमीत हिराबाई चांगल्याच तयार झाल्या. अशी आख्यायिका आहे की हिराबाई जन्मल्यावर रडल्या नाहीत, पण असं म्हणावं लागेल की त्या जेंव्हा गायला लागल्या तेंव्हा त्यांच्या जीवघेण्या सुरांतून श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू आल्याशिवाय राहत नसत. अशी त्यांच्या सुरांची किमया होती. सौभद्र नाटकाच्या ध्वनिमुद्रिका- 'व्यर्थ मी जन्मले थोर कुळी', 'वद जाउ कुणाला शरणा ग' 'किती किती सांगू तुला' ऐकताना या करुण भावाचा भरपूर पुरावा मिळतो.

हिराबाईंचा जन्म ३० मे १९०५ साली बडोद्यात झाला अशी नोंद आहे. वयात आल्यावरसुद्धा त्या अतिशय बारीक व रंगाने सावळ्या होत्या. त्यामुळे तारुण्यात त्यांच्या रुपात एखाद्याला आकर्षित करण्याचं सामर्थ्य नव्हतं, पण त्यांच्या सुरांत ऐकणाऱ्यांना कायमच बंदिस्त करण्याची ईश्वरी देणगी होती. १९२३ साली त्या प्रथम मंचावर आल्या व त्या तिकीट लावून गाण्याचे कार्यक्रम सादर करू लागल्या. या बाबतीत त्या पहिल्या स्त्री कलाकार होत्या असं नमूद केलं गेलं आहे.

हिराबाईंच्या आवाजाबद्दल बोलायचं तर असा सुरेल आवाज क्वचितच एखाद्या अन्य गायिकेच्या गळ्यात सापडतो. अत्यंत मृदू, भावनाप्रधान व मुलायम असा त्यांचा आवाज होता . त्यांचा तार सप्तकातला ठसा शास्त्रीय संगीताच्या जगतात प्रसिद्ध होताच परंतु सर्वसामान्य संगीताच्या रसिकांनासुद्धा चांगला परिचयाचा होता. तो तंबोऱ्याच्या सुरांत असा काही मिसळायचा की तो त्यांच्या गळ्यातून निघायचा की तंबोऱ्यातून निघायचा हे श्रोत्यांना कळणं कठीण होतं. मुंबईच्या व्यास संगीतालयाचे तज्ञ वसंतराव राजोपाध्ये यांनी आपल्या पुस्तकात याचा खास उल्लेख केला आहे. तार सप्तकाच्या ठसा ठ ला भिडताना त्या तंबोऱ्यावरील षड्जाची तार जरा मोठ्यानी अशा काही दिमाखानी छेडायच्या की 'क्या बात है' असं वाटायचं. त्यांच्या सुरेलपणाबद्दल माझा स्वत:चा अनुभव सांगायचा तर कित्येक वर्षापूर्वी मी त्यांचं गाणं मुंबईच्या दादर भागातील छबिलदास शाळेत ऐकलं होतं. तबल्यावर प्रसिद्ध तबलानवाझ शमसुद्दीन खानसाहेब होते,. हॉलमधलं सबंध वातावरण हिराबाईंच्या सुरांनी जणुकाय न्हावून निघत होतं. रात्री गाणं संपल्यावर, मी गुणगुणत घरी जात होतो, त्यांच्या सुरांची पकड माझ्या तरुण मनावर येवढी जबर होती की ती अजून कायम आहे, माझं वय त्यावेळी १८ होतं. त्यांचं एक वैशिष्ट्य सांगितल्याशिवाय राहवत नाही. ते म्हणजे गाताना त्या अत्यंत विनयशीलरित्या, खांद्यावरचा पदरसुद्धा नीट करून, डोकं खाली वाकवून आपलं गाणं सादर करीत असत. त्यांत चेहरा वेडावाकडा किंवा हातवारे करण्याकडे कल बिलकूल नसायचा.

'सौभद्र' आणि 'मानापमान' अशा काही गाजलेल्या नाटकांत त्यांनी कामं केलीच परंतु 'सुवर्ण मंदिर', 'प्रतिभा' व 'जनाबाई' या बोलपटांतसुद्धा आपल्या भूमिका गाजवल्या. १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्यदिनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर त्यांना राष्ट्रगीत 'वन्दे मातरम्' गायचा मान मिळाला होता. संगीत नाटक अकादमी (१९५५) पद्मभूषण (१९७०) विष्णुदास भावे सन्मान, सरोजिनी नायडूने दिलेला 'गान कोकिला' असे अनेक सन्मान त्याना लाभले होते. त्यांच्या नावाजलेल्या शिष्या म्हणजे त्यांची बहीण छोटुताई- सरस्वती राणे, माणिक वर्मा, प्रभा अत्रे, मालती पांडे, जानकी अय्यर अशा आहेत.

हिराबाईंचा पक्का सूर व त्यांच्या गाण्यांतली थोरवी ज्यांना ऐकायची असेल त्यांनी त्यांच्या ह्या ध्वनिमुद्रिका जरूर ऐकाव्यात -- राग -यमन, मुलतानी, चन्द्रकौंस, रामकली, बागेश्री, पटदीप, देसकार. ठुमरी --काहे पिया बिन चैन,

होरी-- होरी खेलो मोसे नंद .

असं वाटते हिराबाई गेल्या आणि त्यांच्याबरोबर त्यांचासारखा अद्वितीय सूर कायमचा गेला. तसा परत ऐकण्याचं भाग्य कठीण आहे.

*

लेख

# एकदा काय झालं

**✶ सौ. कल्पना सुभाष कोठारे ✶**

*(सौ. कल्पना सुभाष कोठारे या आमच्या सदरलेखिका. त्यांना विडंबन काव्यस्पर्धेत तिसरे पारितोषिक लाभले; याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. पारितोषिक वितरण सोहळ्याचा हा वृत्तांत त्यांच्याच शब्दात-*

*-संपादक)*

'बयोऽ म.टा.ला जाहिरात आहे गं विडंबन काव्य स्पर्धेची! तुझी ती मैत्रिण छान करते नं विडंबन कविता!' 'अहो त्यांच्याकडे म.टा. येत नाही. लोकसत्ता घेतात! 'फोन कर नं मग तू तिला!' 'बरं! नंतर करते सावकाश'!

'हॅलो, कल्पनाताई, ऐका नं! आजच्या म.टा.त विडंबन काव्य स्पर्धेचं आलंय.' 'अगं, पण माझ्या कविता तर 'कुसुमाकर' मध्ये वर्षभर छापून आलेल्याच आहेत.' 'नवीन लिहाल हो तुम्ही! वाचून दाखवू का मी जाहिरात?' 'नको गं! आणीन मी समोरच्यांकडून!' 'स्मिता, जरा आजचा म.टा. देतेस का?' 'न्या नं, काकी! नाहीतरी मी रात्रीच वाचते पेपर! सावकाश परत करा.' ३० जून म.टा. - 'कुटुंब रंगलंय काव्यात'च्या व्हॉट्स अप् ग्रुपतर्फे, जगभरातील मराठी कवी, कवयित्रींसाठी विडंबन काव्यस्पर्धा आयोजित केलेली आहे. प्र. के. अत्रे जयंतीनिमित्त ही स्पर्धा असून पुढील पत्त्यावर कविता पाठवाव्यात. अंतीम तारीख जुलै २४

'अहो, उद्या तेरा ऑगस्ट! निमंत्रण आलंय बरं का! रविंद्र नाट्यमंदिरातील 'पु.लं.' सभागृहात कार्यक्रम आहे.' 'साडेतीनला पोचायचं प्रभादेवीला म्हणजे लवकर निघायला हवं. ट्रॅफिक असतो. टॅक्सीनेच जाऊया!'

विनोदाच्या बादशहाने हॉलबाहेरच आमचे स्वागत केले. 'जरा सिरीअस वाटताहेत नाही का हो पु.ल. या चित्रात?' - प्रा. विसुभाऊ बापट कोणते? दारावरच्या स्वयंसेवकास हळूच विचारून घेत आम्ही हॉलमध्ये शिरलो. 'नमस्कार! मी कल्पना कोठारे!' या! या! विसुभाऊंनी प्रसन्न मुद्रेने स्वागत केले.' प्रेक्षागृहातील चढत्या उंचीवरील अर्धगोलाकार रचनेतील आसने पाहून मला एकदम शाळेतील सायन्स रूमच आठवून गेली. जेमतेम एक फूट उंचीवर व्यासपीठ असूनही, समारंभ सर्वांनाच माना न उंचावता दिसणार होता. छोट्याशा स्टेडियममध्येच जणु आम्ही बसलो होतो. सरस्वती व प्र. के. अत्रे यांचे फोटो पिवळ्या चाफ्याच्या हाराने सजवून व्यासपीठावर ठेवलेले होते. उंच समईंसमोर गुडघे टेकून दोन मुली फुलांची रांगोळी काढीत होत्या. अल्लाउद्दिनच्या दिव्यासारखा दिसणारा दीप, (मेणबत्तीऐवजी) समई प्रज्वलित करण्यासाठी ठेवलेला होता. व्यासपीठाच्या दुसऱ्या कोपऱ्यात पोडियम झेंडूच्या माळांनी सजविले होते. मुळीच भपका नसलेल्या परंतु व्यवस्थित साडीधारी स्त्रिया, व्यासपीठावर लगबगत होत्या. 'अगं उमा!' मध्येच विसुभाऊंनी हाक मारली व त्यांच्या पत्नीचे नाव आम्हाला कळले. येणारा प्रेक्षक विसुभाऊंना प्रेमाने भेटून मगच स्थानापन्न होत होता. थर्माकोलच्या पांढऱ्या शुभ्र वाडग्यात पिवळी चाफ्यांची फुले जणु वरणभाताची मूदच घेऊन प्रत्येक प्रेक्षकास, विसुभाऊंची मुलगी सुगंधित चाफ्यांचे फूल देत होती. (पर्समध्ये पिन असल्याने मी लगेच माळलेही)

हळूहळू प्रेक्षागृह भरू लागले. 'आले! आले! प्रमुख पाहुणे आले! कुणीतरी म्हणाले व नकळत सारेजण, यशवंत देवांचे आगमन होताच उभे

राहिलो. उमा बापट निवेदिकेच्या भूमिकेत शिरल्या. मान्यवरांना व्यासपीठावरील खुर्च्यांत स्थानापन्न होण्याची त्यांनी विनंती केली. नंतर प्रा. विसुभाऊ बापटांनी पोडियमजवळ जाऊन सरस्वती वंदना म्हटली. दीप प्रज्ज्वलनाचा सोहळा पार पडला. रिटायर्ड पोलीस कमिशनर, परिवहन मंत्री, अशोक बागवे (परीक्षक व कवी) यशवंत देव, कौशल इनामदार (गायक, संगीतकार) आणि शिरीष पैंचे सुपुत्र, अत्र्यांचे नातू अशी मोजकीच मान्यवर मंडळी व्यासपीठावर होती. प्रत्येकाचे नाव घेऊन, उमाताई थोडक्यात ओळख करून देत व एकेकास भाषणास पाचारण करीत. प्रा. विसुभाऊ मान्यवरांना पिवळ्या चाफ्याने भरलेला वाडगा व भेटवस्तू देत. प्रेक्षकातील मान्यवरांचेही असेच स्वागत करण्यात आले.

अनेकजणांनी आपल्या भाषणातून अत्र्यांच्या आठवणी जागवल्या. एकाने प्रा. विसुभाऊंचे भरभरून कौतुक केले. 'गाव तेथे एसटी' असे एस.टी. बसवर लिहिलेले असते ते बदलून आता 'एस.टी. तेथे विसुभाऊ' असे लिहावे लागणार असे परिवहन मंत्री म्हणाले. स्वतः कवी नसूनही हजारोंनी कविता पाठ असणारे मा. विसुभाऊ बापट, गावोगावी जाऊन जमविलेल्या इतरांच्या कवितांचे कार्यक्रम करीत असतात. याशिवाय दरवर्षी वेगवेगळ्या समाजथरातील लोकांसाठी ते योजना राबवितात. कॉलेजच्या मुलामुलींसाठी काव्यस्पर्धा, महिलांसाठी स्पर्धा वगैरेंचा त्यात समावेश असतो. यंदाची विडंबन काव्यस्पर्धाही शिरीष पै यांनी प्रायोजित केलेली असून उत्तेजनार्थ चौथे व पाचवे पारितोषिक 'कुटुंब रंगलय काव्यात' या संस्थेच्या व्हॉट्स अप ग्रुपकडील आहे- असे उमाताई बापटांनी निवेदनात आवर्जून सांगितले. प्रत्येक वक्त्याच्या भाषणावर मजेशीर भाष्य करून निवेदिका स्वतःचे कौशल्य दाखवीत होतीच. अशोक बागवे या एकमेव परीक्षकाने एकूण आलेल्या दोनशे कवितांतून तीन पुरस्कारप्राप्त कविता कशा निवडल्या ते सांगितले. ते म्हणाले की ''कोणतेही बक्षीस 'विभागून' देणे मला आवडत नाही.''

शिरीष पैंचे पुत्र 'राजू' यांना उमाताईंनी दोन शब्द बोलण्याची विनंती केली तेव्हा ते म्हणाले, 'मघापासून उमाताई मला 'राजू' म्हणताहेत हे आजोबांना मुळीच रुचले नसते. कारण त्यांनी माझे नाव 'राजेंद्र प्रसाद' असे ठेवले होते. माझ्या भावाचे नाव 'हर्षवर्धन' हेही आजोबांनीच ठेवले व बहिणीचे 'प्रियदर्शिनी'. आईने आजोबांना विचारले की इतकी लांबलचक नावे का ठेवता? तर ते लगेच म्हणाले 'अगं तुझं आडनाव एवढुसं - मग नाव मोठं नको का?'

मान्यवरांच्या भाषणानंतर यशवंत देवांच्या हस्ते, विडंबन काव्य स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र व पुरस्कार देण्यात आले. यानंतर हास्यकवी संमेलनाचा बहारदार कार्यक्रम अल्पशा विश्रांती नंतर झाला. या कवीसंमेलनाची निवेदनसूत्रे उमाताईंनी नलेश सोनार या कवीकडे सोपविली. ते सॅम टीव्हीवर कार्यरत आहेत. व्यासपीठावरील मान्यवरांप्रमाणेच, प्रेक्षकांतील मान्यवर कवींचीही नावे घेतली जात होती. प्रत्येक कवीच्या हास्य कवितेवर निवेदक नलेश खुसखुशीत विनोद, शेरो शायरी करीत कार्यक्रमात रंग भरीत होते. स्वतः यशवंत देवांनीही काही विडंबन काव्ये सादर केली. स्वतः नलेश सोनारांचे विडंबनकाव्य प्रसारमाध्यमा-वरच बेतलेले होते. अत्र्यांची सुप्रसिद्ध विडंबन कविता 'परिटा येशिल कधी परतुन' ही दरबारी कानडा रागात गाऊन, पार्श्वसंगीताच्या जागी तोंडानेच टन्-टन्-टन् गाऊन, कौशल इनामदार या संगीतकाराने वाद्यवृंद नसतानाही बहार उडवून दिली.

विडंबनकाव्यस्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळविणाऱ्या सौ. दिवेकर मिरजेहून आल्या होत्या. वाङ्मयचौर्य या विषयावर 'उघड दार देवा आता' या कवितेचे विडंबन त्यांनी सुमधूर स्वरात गाईले. तसेच आदेशभाओजी निवडणुकीला उभे होते. त्या प्रसंगावरही त्यांनी छान विडंबनगीत लिहले होते. दुसरा पुरस्कार प्राप्त झालेल्या दादरच्या सौ. पेठे या पतीसमवेत व्यासपीठावर गेल्या.

'तुझ्या गोळ्या, माझ्या गोळ्या, गुंफू गोळ्यांच्या माळा

तुझी हिरवी - माझी पिवळी, आणखी लाल कोणाला...!

असे द्वंद्वगीत साभिनय गाऊन, एकमेकांच्या गळ्यात गोळ्यांचे हार घातले. प्रेक्षकांनी त्यांना चांगलीच दाद दिली. 'हास्याचे मळे पिकणे' म्हणजे

काय ते प्रत्यक्ष अनुभविता आले. माझे नाव पुकारल्यानंतर मंगेश पाडगांवकरांची क्षमा मागून मी ‘या पाण्यावर, या नळावर, शतदा प्रेम करावे’ हे गीत सादर केले. एका महिलेच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. जवळजवळ अडीच तास चाललेला सुनियोजित हास्यसोहळा पार पडून घरी पोचण्यास साडे आठ वाजले. घरी येताच प्रमाणपत्र नीट वाचले. पत्रकावर खरे एक रुपयाचे नाणे कुयरीच्या नक्षीवर चिकटवलेले सुंदरसे पाकीट होते. पाकीट उघडताच, सुंदर अक्षरातील माझे नाव व तृतीय पुरस्कार रु. २००० ही अक्षरे वाचताना मनोमनी ‘बयो’च्या नवऱ्याचे आभार मानले. चकाकत्या कागदातील भेटवस्तू म्हणजे काचेचा सुंदर लामणदिवा पाहिला. पुरस्कार प्राप्त झाल्याचा हर्ष, आणि पिवळ्या चाफ्यांचा सुगंधी दरवळ हा सोहळादिनाचा परमोच्च बिंदू!

## माझी विडंबन कविता अशी होती-

**या जगण्यावर शतदा प्रेम करावे**

-पद्मभूषण कविवर्य मंगेश पाडगांवकर

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे

चंचल वारा, या जलधारा, भिजली काळी माती
हिरवे हिरवे प्राण तशी ही रुजून आली पाती
फुले लाजरी बघुन कुणाचे हळवे ओठ स्मरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

रंगांचा उघडुनिया पंखा सांज कुणी ही केली?
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली
सहा ऋतुंचे सहा सोहळे, येथे भान हरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे.

बाळाच्या चिमण्या ओठातून हांक बोबडी येते
वेलीवरती प्रेम प्रियेचे जन्म फुलांनी घेते
नदिच्या काठी, सजणासाठी गाणे गात झुरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे.

या ओठांनी चुंबुनि घेईन हजारदा ही माती
अनंत मरणे झेलुन घ्यावी इथल्या जगण्यासाठी
इथल्या पिंपळपानावरती, अवघे विश्व तरावे
या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे

**या पाण्यावर शतदा प्रेम करावे**

(मंगेश पाडगांवकरांची क्षमा मागून)

-कल्पना सुभाष कोठारे

या पाण्यावर, या नळावर शतदा प्रेम करावे.

चंचल वेळा, या नळधारा, भिजली मोरी काळी
हिरवे, हिरवे, शेवाळ बघूनी जमल्या पोरीबाळी
नळ येता क्षणी, पाणी बघुनी, डोळे त्यांचे भरावे
या पाण्यावर, या नळावर, शतदा प्रेम करावे

भांड्यांचा मांडुनिया पसारा, रांग कुणीही केली?
काळोखाच्या रात्री मधुनी, हंडे घागरी रचिली
दहा घरचे, दहा जणींचे, येथे ध्यान लागावे
या पाण्यावर, या नळावर शतदा प्रेम करावे.

नळाच्या चिमण्या तोटीतून, धार इवली येते
पाणी कपातीच्या भीतीतून, एकेक बालदी भरते
गावाकडची नदी आठवून, शहरी येथ झुरावे
या पाण्यावर, या नळावर शतदा प्रेम करावे

या हातानी भरून घेईन हजारदा ही तपेली
अनंत भांडणे झेलून घ्यावी इथल्या स्नानासाठी
इथल्या नळाच्या धारेवरती, अवघी चाळ तरावी
या पाण्यावर, या नळावर, शतदा प्रेम करावे.

कथा

# श्रावणसरी

## ✶ सौ. अलका मिनलकुमार तळपदे ✶

सकाळी सकाळी मोबाईलच्या वाजण्याने जाग आली. एवढ्या सकाळी कुणाचा बरे असेल?'' थोड्या काळजीनेच पाहिले तर श्रीचाच (माझ्या लेकाचा) होता. एवढ्या सकाळी आज ह्याला आईची आठवण का बरं झाली? थोड्या चिंतेतच 'हॅलो' केले.

''काय रे, आज आईची आठवण तुला?''

माझा कुत्सित प्रश्न अर्धवट कापत म्हणाला,

''आई, तुझं नेहमीचं पुराण नको, मी काय सांगतो ते जरा नीट ऐक.''

''बरं बोल.''

''हे बघ, येत्या रविवारी आपण पाच जण 'फाय-स्टार' हॉटेलमध्ये लंचला जातोय. तेव्हा दुसरा काही प्रोग्रॅम ठेवू नकोस.''

''अरे! पण बाबांचं तुला माहीत आहे नं?''

''त्यांच्याच पंचाहत्तराव्या वाढदिवसाचं गिफ्ट आहे हे. सांग त्यांना आणि आता त्यांना तयार करण्याची जबाबदारी तुझी.''

''अरे! पण...''

''चल, चल ठेवतो. ऑफीसला निघालोय. बाय... बाय..''

''माझ्याशी बोलायला ह्याला कधीच वेळ नसतो.'' असं मनाशी म्हणत मोबाईल बंद केला. चला, हा 'फाय-स्टार'चा भुंगा मला स्वस्थ बसू देणार नव्हता. ह्यांना तयार करण्याचे मोठे काम अगोदर करायचे होते. असा विचार करते न करते तोच ह्यांचा प्रश्न आला, ''सकाळी सकाळी कुणाचा गं फोन होता?''

''श्रीचा होता. ह्या रविवारी आपल्याला 'फाय-स्टार'मध्ये लंचला घेऊन जाणार आहे.''

''त्याला काय वेड लागलंय?''

''अहो तुमच्या वाढदिवसाचेच गिफ्ट आहे ते.''

''काही गरज नाही. त्याला म्हणावं आपल्या नेहमीच्या हॉटेलमध्ये जाऊया फार तर.''

''अहो, एवढ्या हौसेने नेतोय तर नाहीतरी कसं सांगायचं?''

''हे बरं आहे, वाढदिवस माझा आणि हौस त्याची पुरवायची?''

माझे शब्दच खुंटले. ह्यांना तयार करणं तेवढं सोप नव्हतं. ''अजून आठ दिवस आहेत.'' असे मनाशी म्हणत मी तो विचार मागे टाकला तरी 'फाय-स्टार'च्या भुंग्यानी माझी झोप पुरती उडवली. चहा करता करता विचारचक्र सुरू झाले. कधी जाण्याचा योग आला नव्हता. फार तर कुणाच्या रिसेप्शनला, पण ते ओपन लॉनवर, आत हॉटेलमध्ये कधी गेलो नव्हतो. चहा पिता-पिता ह्यांना गुगली टाकली.

''हाय-फाय लोकं येत असतील नाही हो तिथे?''

''कुठे?''

''अहो कुठे काय? 'फाय-स्टार' हॉटेलमध्ये''

''झाली का तुझी तयारी सुरू? तुम्ही बायका म्हणजे!''

ह्या विषयावर ह्यांच्याशी आता जास्त बोलण्यात अर्थ नव्हता. माझ्या मैत्रिणी, किंवा नातलगांपैकी 'फाय-स्टार'ला नेहमी जाणारे कुणी आठवत नव्हते. कुणाला विचारु म्हणजे मला योग्य माहिती मिळेल बरं? परत अशा रितीने विचारायला हवे की माझा अडाणीपणा दिसता कामा नये, शिवाय जवळच्या कुणाला विचारले तर दहा प्रश्न येणार. कोण? कधी? कुठे? वगैरे.

विचारांच्या ओघात एक मैत्रीण आठवली, सतत

## जरा हसा

संभूराव- मेरे पास बंगला आहे, कार आहे, फार्महौस आहे. तेरे पास क्या है? बोलो, बोलो.

बेबूराव- अरे जाव, जाव. बंगला, कार क्या करनेका? मेरे पास दहा किलो तूरडाळ आहे. समझ्या क्या?

'फाय-स्टार' 'फाय-स्टार' करणारी. तिलाच फोन लावला.

'हॅलो! अगं निमा तू नेहमी 'फाय-स्टार' ला जातेस नं?

'अगं नाही ना, हे रिटायर झाल्यापासून गेलोच नाही. पण का गं?

'नाही गं, मला जायचे होते. एक अनुभव घ्यायचा होता म्हणून म्हटले तुला चांगल्या 'फाय-स्टार'चे नाव विचारावे.''

''अगं कुठल्याही 'फाय-स्टार'ला जा. पण पर्समध्ये पंचवीस हजार तरी ठेव. आणि थोडे टेबल-मॅनर्सही शिकून जा.''

''बापरे! हो कां? बरं चल, ठेवते.'' हिचा कुचकट सल्ला नसता घेतला तर बरे झाले असते आणि आता हे जर ह्यांना सांगीतले तर? नको रे बाबा.

शेवटी कुणालाही विचारण्याच्या भानगडीत न पडता श्रीलाच विचारावे असे ठरवले आणि हे घरात नसताना एकदा फोन लावला. फोन घेतल्या घेतल्या म्हणाला ''सांगीतलेस बाबांना? झाले का तयार?

''अरे होतील, पण मला अगोदर सांग कशी माणसं येतात तिकडे आणि कपडे...''

नेहमीप्रमाणे माझं बोलणं तोडत म्हणाला, ''आई, तू एवढा विचार करू नकोस. फक्त जरा भारीतील साडी नेस आणि बाबांना ठेवणीतले पँट शर्ट काढायला सांग बस! जास्त काही नको. फक्त बाजारात निघाल्यासारखे येऊ नका म्हणजे झालं.'' लेकाने असे तारे तोडल्यावर तर मी माझ्या डोक्यातल्या त्या 'फाय-स्टार'च्या भुंग्यांला अगदी चपलेने मारले आणि तयारीला लागले. माझी साडी आणि ज्युवेलरी ठरल्यावर मी मोर्चा ह्यांच्याकडे वळवला.

''अहो, ऐकलं का? तुम्ही 'फाय-स्टार'ला जाताना शोभाताईंनी भाऊ-बीजेला दिलेला ब्ल्यू शर्ट घाला. तुम्हाला अगदी शोभून दिसतो.'' मी दोन दगडात एक पक्षी मारला. लाडक्या बहिणीने दिलेला शर्ट आणि वर शोभून दिसतो.' असा माझा शेरा! ह्यांच्या चेहऱ्यावर हलकीशी हास्यरेषा उमटली. चला, म्हणजे हे तयार झाले होते. माझी एक काळजी मिटली होती. दोन पिढ्यांना एका ठिकाणी धरून ठेवण्याचे काम म्हणजे एक कसरत आणि ती घरातल्या मोठ्या बाईलाच करावी लागते. खरं म्हणजे श्रीने स्वत:चे घर घेऊन जेव्हा वेगळा संसार थाटला तेव्हाच ही कसरत मी हरले होते. पण त्यातही देवाची मर्जी असावी अशी मनाची समजूत घालून कधीही न भरणाऱ्या जखमेवर पट्टी लावली होती. देव करतो ते भल्यासाठीच करत असतो ह्याची प्रचिती आज येत होती.

आठ दिवस भुरकन गेले आणि तो दिवस उगवला. श्री चा फोन आला, ''आई ११ वाजेपर्यंत तयार रहा. मी गाडी घेऊन येतोय'' ठरल्याप्रमाणे तो आला; पण एकटाच. गाडीत बसता बसता मी विचारले,

''अरे जान्हवी आणि पूर्वी कुठे आहेत?''

''अगं जान्हवीचा प्रोग्रॅम आहे. तिथूनच त्या दोघींना घेऊया.'' त्यांनी गाडी हॉलच्या दारात उभी केली आणि वर फोन लावला. प्रोग्रॅम संपला नव्हता म्हणून म्हणाला, ''आपण वर जाऊया, इथे पार्किंग नाही आहे.''

आम्ही तिघं गाडीतून उतरून वर गेलो. हॉलमध्ये प्रवेश करताच पाय जागच्याजागी थबकले. आम्ही दोघंही 'आ'वासून पहात राहिलो. हॉलमध्ये आमचे सर्व नातेवाईक, लेकी-सुना, मुलाबाळासहीत, मित्रपरिवार, फॅमिली फ्रेंडस्, श्रीचा सर्व मित्रपरिवार आमच्या स्वागताला दुतर्फा उभा होता. आम्ही प्रवेश करताच आमच्यावर फुलांचा वर्षाव झाला आणि

'हॅपी बर्थ-डे'ची कॅसेट चालू झाली. ह्या सुरेल धूनवर फुलांच्या वर्षावात आमचा लेक आम्हा दोघांना सजवलेल्या स्टेजपाशी घेऊन गेला. आश्चर्याचा एवढा मोठा धक्का आम्हाला दिला होता की दरवाज्यात उघडलेला 'आ' स्टेजपाशी पोहोचलो तरीही उघडाच होता. यांना खुर्चीवर बसवून पंचाहत्तर दिव्यांच्या ताटांनी काही सवाष्णींनी ओवाळले. त्यावेळी लेकाने यांना नवीन कपड्यांचा आहेर केला आणि त्याच्या आग्रहाखातर यांनीही आत जाऊन कपडे बदलले. आज बाप-लेकाची दिलजमाई पाहून मी मात्र तृप्त झाले. नंतर केक कापण्यात आला. गिफ्टचा वर्षाव होत होता म्हणजे इथे उपस्थित सर्व नातेवाईक-मित्र परीवार श्रीला सामील होता. सस्पेन्स होता तो फक्त आमच्या दोघांसाठीच.

पुढचा प्रश्नोत्तराचा प्रोग्रॅम आमच्या सूनबाईंनी आणि नातीने मनोरंजकपणे सादर केला. बरोबर उत्तराला बक्षिसे दिली. कुणी भाषणे, कुणी कविता, तर कुणी दोन वाक्यात आपली मनोगते व्यक्त केली. सर्व पाहुण्यांना लंच आणि रिटर्न गिफ्टस् देण्यात आली. हसत खेळत कार्यक्रम पार पडला. एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन; पण कुणीही आम्हा दोघांना थांगपत्ता लागू दिला नव्हता. आलेला प्रत्येक पाहुणा जाताना माझ्या लेकाचे, सुनेचे, नातीचे कौतुक करीत होता. आनंद- अभिमान अशा संमिश्र भावनांनी मन भरून येत होते. वाहू पाहणाऱ्या आनंदाश्रूंना रुमालाचा बांध लावून कसंबसं अडवून ठेवले होते.

सहज खिडकीबाहेर लक्ष गेलं तर श्रावणधारा कोसळत होत्या आणि सर्व पाला-पाचोळा वाहून नेत होत्या. मीही माझ्या डोळ्यातल्या श्रावणसरींना वाट करून दिली. माझे मनही लख्ख ऊन्हासारखे साफ झाले. दूर राहूनही नाती जोपासता येतात ही देवाची मर्जी आज मला कळत होती.

(सत्यघटनेवर आधारीत)

## हास्यचित्र



# Vihang Nayak & Achievements….

**-Gunjarav Nayak**



Mr.Vihang Nayak did his engineering from the university of pune, after which he joined Telco, and then came his long stint with API, where he moved on to become the GM-Design within few years, he was a great design engineer…He has risen from a simple Design executive to the GM's post with sheer focus,passion and love for this subject-design,He won the Best Employee Award from then API President Mr Chidambaram in 1989.

Mr.Vihang Nayak was a fantastic actor, the most versatile performer I have ever seen. During his college days he won many accolades for his performances in his youth festivals. I remember him telling me that he had once won the Best Actor award for one such Youth Festival in which there were great stalwarts competing with him like Nasserudin Shah, Om Puri, & Amrish Puri. He did Marathi theatre with all the popular artists on the Marathi stage, some of the most famous amongst them were Municipality, Camp, Paheje Jatiche, Gharaat Hasre Tare etc. He also did experimental theater with Statyadev Dubey for a while, they were non-commercial plays. I remember for one of these shows one day there was absolutely no one in the audience except for all of us in the family, but given the artist that he was he still went ahead and performed the show. For all his work he won many Natyadarpan Awards like

- The Best Actor in a Comedy Role-Play-Mithu Mithu Popat-1982
- The Best Actor in a Lead Role-Play-Pahje Jatiche-1977

but Marathi stage would require huge time and commitment which unfortunately he didn't have, so for quite a few years he was away from this glamour world until he met Bharat Dabholkar. Harish Patel his good friend was about to travel overseas and his role was vacant. He was recommended for the role it was the main role, but he insisted that he needs to see the play and then decide. He saw the play but decided against it, however after keen persuasion by Bharat uncle he joined the show after which they all became a part of our family.

He started his second innings in this field when he got his chance to act as a main lead in "Avghachi Sansar" it was a serious role , I had expressed my doubts to him , but he accepted it and he delivered a fabulous performance. He got the Zee Marathi Award 2007 as the Best Actor for this one. His performance in his last play "Stal-Sneha Mandir" was his most fantastic work till date, I believe that he was the life of that show. He won many awards (Mazaa Puraskar'2008 was his last award) and accolades for this one also. He was also nominated (Zee Gaurav 2007) for the best supporting actor for his performance in the Marathi Feature film "Anandache Zhaad" and for the play Stal-Sneh Mandir.

Ad commercials were always like an icing on the cake for him, he used to enjoy doing commercials. Titan was his best work; Piyush Pandey the most respectable name in the advertising world describes him as a phenomenon in the industry's most respectable newsletter 'Campaign India".

I happen to be in the same industry which he left apart from they knowing me as my father's son. They shower the same respect that each one of them would have given him..to the extent that once the veteran actor Nana Patekar told me that if Vihang would have carried on his acting carrier instead of taking a break to pursue his professional/engineering commitments in their early days the brand Nana Patekar would be non-existent. What more can be any bigger achievement than this…..


# Remembering my father-
# Solicitor Motiram V.Jayakar

**Solicitor Rajan Motiram Jayakar**

If I stretch my memory, I think I remember my father Motiram Vinayak Jayakar from about 1957 when I was 9 years old. Then he was 58 years old , having been born on 3rd December 1899. As I went through his certificates I find that he did his matriculation from St. Xavier's High School and he passed his B.A. Exam from Elphinstone College. Thereafter he opted to take up law. Dilip Raghunandan Kothare, Balaram Ramrao Jayakar and Mohamed Currim Chagla( who later on became the Chief Justice of the Bombay High Court) were his contemporaries. After doing law from Government Law College it could have been logical for him to sign articles for his Solicitors from M/s. Nanu Hormasjee & Co under Raghunandan Nanu Kothare. However he opted to sign articles with M/s. Craigie Blunt & Caroe under Mr. Caroe as his master. He passed his Solicitor's exam in 1927 and started practicing in Bombay High Court with M/s. Nanu Hormasjee & Co.

Born to Ahilyabai and Vinayak Anandrao Jayakar, I understand that he was one of the 13 siblings out of which only 7 survived and lived past 70 years. His eldest brother Gajanan was in service. Next one was Dr.Nagesh, who had his medical practice and his younger brother Keshav was also in service. His sister Champubai married Sumantrao Mankar and his other two sisters were spinsters namely Kamalabai and Yamunabai.

My father was a family man although not the eldest but was the Karta of Hindu undivided family consisting of Gajanan and his wife Bablibai and their two daughters Meenaxi and Rajani, my father's own family consisting of my mother Pramilabai, my elder sister Mrudula, myself and my younger brother



Mohan and two unmarried sisters, Kamala and Yamuna. Since he was well educated he wanted to marry an educated girl, who would be orthodox as regards culture and traditions of Pathare Prabhus but also modern and outgoing and would give him support in his social work. He could not have found any better choice than my mother Miss Pramila Balaram Ajinkya, who was the first lady from Pathare Prabhu community to do her Masters and that too in English literature and French. I understand that my father saw and rejected quite a few girls before zeroing on my mother. They got married in 1937. Surprisingly for those times both my parents were quite past their youth when they got married so naturally there was a big age gap between my parents and we their children.

My father was a hard working Solicitor throughout the week but during weekends he was a social worker. He was associated with many institutions viz Swastik League from its inception, Servants of India Society, Vishwa Hindu Parishad, Chimaya Mission, Jan Sangh, Bombay Incorporated Law Society etc. He however spent most of his non-professional

time serving Swastik League of which he was President for about 40 years. Every Sunday morning he was up early at 5 a.m. dressed up in Khaki Shorts, white half sleaves shirt, khaki cap and a short stick in hand, he attended the parade at Swastik league. It used to amaze me immensely as to why on earth would a person wake up on a Sunday morning at 5a.m.! One of the major activity of Swastik

League was volunteer Corp. and running the ambulance. I remember once he received a call from Khandala, where Justice Rege had fallen down and fractured his leg and had to be brought to Bombay urgently. It was night time and the volunteers were not available to go with the ambulance at that hour. My father, President of the institution, went with the ambulance to Khandala at night and lifted the stretcher with Justice Rege in pain and got him to hospital in Bombay before the day break. This was his dedication to Swastik League. By 1960's he was the Senior Vice Presidents of Vishwa Hindu Parishad. On sudden death of the then President Bhagwat Singhji, Maharana of Mewar, he became President till the next elections since he was the senior most among the Vice Presidents. I remember the Lok Sabha election in 1962. My father was a Jan Sangh candidate from South Central Constituency opposing Comrade Dange and Mr.Shantilal Shah of Congress. Being a good public speaker with command over Sanskrit, he used to make his election speeches interesting. However Jansangh then was not Bharatiya Janata Party of today. He succeeded in eating into the votes of Dange and ultimately Shantilal Shah of Congress won and communists were defeated. He was also the President of Bombay Incorporated Law Society, which is a Solicitor's Society, which regulates the Solicitor's profession. He was also part of Pathare Prabhu Charities during the controversial period of 1940's to 1960's when the two groups were at war with each other.

In fact my birth in 1948 was considered to be auspicious for my father as immediately he received communication from the Union Law Minister Barrister B.R. Ambedkar that he was appointed as Solicitor to Central Government in Bombay. It was rumoured that because of his close contact with Rt. Hon'ble M.R. Jayakar and Barrister Ambedkar, he may be invited to join the Government but because of his association with right wing organizations that did not happen. This became amply clear when during emergency there was a rumour that he would be detained because of his past association with Jan Sangh. For a few days he went into hiding also. But luckily nothing untoward happened.

He separated from Nanu Hormasjee & Co.and started his own in Solicitor firm M.V.Jayakar & Co. in 1958. One of the landmark cases in which he was associated was the famous Talpade Case where he was lead by Senior Counsel Mr. Motilal Setalvad and they won the case. He was hard working and prepared the Case in Court. Justice Vidyaranya D. Tulzapurkar, one of the top most Judges of Bombay High Court and Supreme Court, was articled clerk to my father and after becoming Solicitor Mr. Tulzapurkar decided to practice as Advocate and was elevated initially to the Bench of Bombay City Civil and Sessions Court and then to the High Court and finally to the Supreme Court. Mr. Tulzapurkar has always paid glowing tributes to my father both in public and in private.

At home he was always calm and composed . Being a follower of Swami Chinmayanand, he used to meditate, also did exercises for keeping himself fit. He had a very disciplined life, would wake up at 4.30 a.m. read his case papers for the days proceedings, then go to Grant Road fish market daily, return, have a bath, then did his Sandhya wearing his silk dhoti (sovle). I still remember his prayer

"Kailas rana Shiv Chandra mauli, Fanindra matha Mukutu zalali, karunya Sindhu Bhav dukkha hari, tuz win Shambho maj kon taari". Lunch at 9.30 and in office at Flora Fountain by 10.30 a.m. travelling by Bus No:127 from Prarthana Samaj to Fountain. After courts closed, he would return home by about 6.30 p.m. and again sit before the Devhara and recite the ramraksha and the sweet thing about the whole thing of the evening prayers was that he would call out every family member's name and pray for each individual. No wonder all of us were so well protected. Surely it was his prayers which had a lion's share in making us what we are today. He

## - उत्तरे -

असोशीच्या कंठामधुनी
तानांची किरणे निघाली
भावनांचे रंग लेवुनी
सुरांची फुलपाखरे उडाली।।धृ.।।
मुक्तसुरांना साथ देते
मधुर शीळ वाऱ्याची
मनींच्या चंचल विचारांना
जणू गती चपळ पाऱ्याची
स्वरांतला हुंकार कसा हा
गगनाला गवसणी घाली।।१।।
हळुच स्पर्शूनी फुलाफुलांना
सूर फुलविती रंग फुलोरा
सुरांमधला गंध लेवुनी
केशराचा फुलत पिसारा
दिव्य गंधाने त्या अवघी
बाग लज्जित झाली।।२।।
शब्द होते ओठी अडले
सुचत नव्हते कैसे सांगावे
एक मागणे मुक्या मनाचे
कुणाकडे कैसे मागावे
आर्ततेच्या त्या पत्राला
उत्तरे स्वरांनी दिधली।।३।।

**सौ. उज्ज्वल र. ब्रम्हांडकर**

had no attraction for ostentious living, he lived a very low profile life, when he could have afforded to enjoy the luxuries of life, but the responsibility thrown on his tender shoulders by the sudden death of his father at a very young age, had made him self sacrificing and always thinking of the family first. He was a strict disciplinarian as far as eating habbits were concerned. He was a non-smoker and tee totaller and ate his meals on time.

He was very particular about resting as well as took the entire family for summer vacations for change of climate. Those were the days of going to cool places in India. I have seen most of India with my father and our entire family. I still remember his daily walk after dinner when he used to go to Chowpatty and sit in the sand and return home by 11p.m. Although as a young bachelor he has gunned down a couple of tigers in the jungles of China creek, he was not a hardcore Shikari. His only sporting activity which I remember and even saw him indulge in was volley ball at Swastik League.

In our house we used to celebrate all the Hindu festivals in Pathare Prabhu tradition. My father was an artist and I recently discovered his Elementary and Intermediate drawing exam certificates. At times he used to draw the Rangoli during diwali. However the art which the public did not see was his drawing the Ganpati out of measured rice grains on Ganesh Chaturthi day. This used to be a family affair but my mother started holding a ladies function when ladies used to come for haldi kunkoo and darshan of Gauri on the 2$^{nd}$ day of Gauri festival. His Ganesha drawing was excellent and his dressing up the Gauri idol made out of balsam branches, was exquisite. I am continuing with the rice Ganesha tradition since 1964 and my younger brother Mohan has taken over the Gauri tradition.

My father used to do charity anonymously. His charity began at home. He, ably supported by my mother, got my orphaned cousins married and settled without any fanfare or publicity. Their blessings must have been partly responsible for his long and healthy life. He was in active practice till the age of 85 years but unfortunately he fell at home and broke his hip bone and was confined to bed for a long time. Coupled with the untimely demise of my elder sister Mrudula, he lost interest in life and finally the call came on 25$^{th}$ April 1988 at the ripe of age of 89. He and my mother left behind culture, heritage and traditions, which we brothers, Ketaki, Smita and our children are trying to preserve and follow to the best of our abilities.

*

# स्वातंत्र्यसैनिक नारायण आनंदराव अजिंक्य

-विश्वास अजिंक्य



माझे वडील श्री. नारायण आनंदराव अजिंक्य यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९११ रोजी मुंबईत परळ येथे झाला. ते मॅट्रिकला असताना महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांची भाषणे ऐकून देशकार्य करण्यास प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे शाळा सोडून इंग्रजांच्या जुलमी कारभाराच्या विरोधात आंदोलनात उतरले. त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन देशासाठी काहीतरी करणे येवढेच माहीत होते. त्यामुळे देशभक्तीपर गाणी म्हणत 'प्रभात फेरी'मध्ये सहभागी होऊन, वेळोवेळी खादीचा प्रचार करायला त्यांनी सुरूवात केली.

'सविनय कायदेभंग' म्हणून ओळखले जाणारे जनआंदोलन १९३० साली सुरू झाले. मीठाचे कायदे, जंगल कायदे यासारखे अन्याय्य कायदे तोडण्याचा या आंदोलनाचा हेतू होता. गांधीजींनी कायदेभंगासाठी भारतीयांना आवाहन केले. त्यावेळी नारायण अजिंक्य यांनी १९३० साली 'जंगल सत्याग्रहात' नाशिकला भाग घेतला. तेव्हा इंग्रज शिपायांनी कठोरपणे लाठीमार करून सर्व आंदोलकांना झोडपून काढले व पकडले. नारायण अजिंक्य यांना 'ब' वर्गाचे राजकीय कैदी म्हणून ४ महिने कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी ते फक्त १९ वर्षांचे होते. त्यांना पहिल्यांदा अहमदनगरमध्ये तुरूंगात ठेवले. नंतर पुण्यामधील येरवडा येथे हलविले. नंतर नाशिक येथील तुरूंगात रवानगी केली. तुरूंगात असतानासुद्धा कैद्यांना क्षुल्लक कारणांवरून बेदम मारहाण करीत असत. तुरूंगवासातून सुटका झाल्यावरसुद्धा जे लोक तुरूंगातून सुटले नव्हते त्यांच्या कुटुंबाला ते हस्ते - परहस्ते मदत करीत राहिले.

कारावासातून सुटका झाल्यावर नारायण अजिंक्य यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली व सिद्धार्थ महाविद्यालयात वाणिज्य शाखेत प्रवेश घेऊन 'अकाऊंटसी'चे कोर्सेस पूर्ण करून 'मॅकिनॉन मॅकेन्झी' या कंपनीत नोकरीस लागले. ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते अधिकारी म्हणून निवृत्त झाले. नोकरीत असतानाच त्यांनी फोटोग्राफी, सुतारकाम इत्यादी छंद जोपासले होते. वाचनाची त्यांना अत्यंत आवड होती. निवृत्तीनंतर त्यांनी मराठीतील उत्तमोत्तम साहित्य स्वखर्चाने विकत घेऊन संग्रही ठेवले होते. श्री. नारायण आनंदराव अजिंक्य यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ महाराष्ट्र शासनातर्फे निवृत्तीवेतन व सन्मानपत्र देण्यात आले होते. श्री. नारायण आनंदराव अजिंक्य यांचे २८ मे २००५ रोजी त्यांच्या दादर येथील निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. माझ्या वडिलांचा मला खूप अभिमान वाटतो. आपल्या ज्ञातीत हे असे जीवन विरळाच.

*

# आठवणीतले बाबा

**-मृदुला प्रभुराम जोशी**



आमच्या आगासकर घराण्याला किती पिढ्यांचा तेज:पुंज वारसा मिळालेला आहे हे लक्षात घेतलं तर थक्क व्हायला होतं. माझे वडील म्हणजे गोविंद भगवंतराव आगासकर. कधी कधी ते गंमतीत आमच्या पूर्वजांच्या पिढ्यांची उजळणी करत. ते म्हणत, ‘मृदुल, तुझं संपूर्ण नाव तुला माहीत आहे का? नसेल तर मी सांगतो. ते आहे मृदुला गोविंद भगवंत रघुनाथ जनार्दन वासुदेव गणेश माणकोजी धनकोजी आगासकर.’ मी तोंडाचा ‘आ’ वासून त्यांच्याकडे बघतच राहायची. मग ते त्यांच्या वडिलांबद्दल, आजोबा, पणजोबा आणि खापरपणजोबांबद्दल त्यांना ठाऊक असलेली सर्व माहिती आम्हाला सांगायचे. लहान असताना तेवढंसं कळायचं नाही, पण जसजशी मी मोठी होत गेले तसतसं मला या पूर्वजांच्या दिव्यत्वाचं महत्त्व कळत गेलं आणि अशा थोर घराण्यात आपण जन्माला आलो आहोत याचा अभिमान वृद्धिंगत होत गेला.

फार पूर्वीचं माहीत नाही, पण एकोणिसाव्या शतकांपासूनच्या नोंदींवरून आणि लिखित इतिहासावरून एवढं नक्कीच सांगता येतं की आमचे एक पूर्वज जनार्दन वासुदेवजी हे अव्वल इंग्रजीच्या काळात प्रख्यात न्यायाधीश म्हणून गाजलेले होते. तत्कालीन मुंबई हायकोर्टाचे ते पहिले हिंदी (इंडियन) न्यायाधीश होते आणि हे पद त्यांनी त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर मिळवलं होतं. त्यांचेच सख्खे भाऊ विनायक वासुदेवजी हे पहिले ‘ओरिएंटल ट्रान्सलेटर’ होते; आणि व्हिक्टोरिया ‘राणीचा जाहीरनामा’ त्यांनीच टाऊन हॉलच्या पायऱ्यांवर उभं राहून जनतेला वाचून दाखवला होता. अशा बुद्धिमंतांच्या कुळात माझ्या वडिलांचा जन्म झाला. त्यांचे वडील प्रा. भगवंतराव आगासकर हे देखील असेच तैलबुद्धी लाभलेले प्रज्ञावंत. गणित, संस्कृत, मराठी आणि इंग्रजीचे प्रकांडपंडित. असं सांगतात की रँग्लर परांजपे, रँग्लर महाजनी यांच्याबरोबरच इंग्लंडला जाऊन गणिताचा ट्रायपॉस/रँग्लर ही पदवी मिळविण्यासाठी त्यांची निवड झाली होती, पण निव्वळ बोटीचं तिकिट काढण्याइतक्या पैशांची जमवाजमव करता न आल्यामुळे त्यांना इंग्लंडला जायचा बेत रहित करावा लागला आणि आपल्या महत्त्वाकांक्षेवर पाणी सोडावं लागलं. नंतर त्यांनी आयुष्यभर व्ही.जे.टी.आय.मध्ये गणिताचे आणि पदार्थ विज्ञानाचे (फिजिक्स) प्राध्यापक म्हणून असंख्य विद्यार्थ्यांना शिकवलं आणि उदंड कीर्ती मिळवली. त्यांना चौफेर बुद्धिमत्तेचं वरदान मिळालेलं होतं. त्यामुळे गणिताबरोबरच त्यांना वाङ्मयव्यवहारातही गती होती. ते उत्तम कविता करत असत, गाणी लिहीत असत आणि त्यांच्या लघुकथा ‘मासिक मनोरंजन’ मध्ये छापून येत असत. मराठी लघुकथांच्या जनकांपैकी एक असण्याचा मान त्यांना मिळालेला आहे. (संदर्भ : सर्वोत्कृष्ट मराठी कथा : खंड १ - संपा. राम कोलारकर)

## हास्यचित्र




असे हे बुद्धिमान भगवंतराव आगासकर आणि त्यांच्या साध्वी पत्नी पिरोजबाई यांच्या पोटी गोविंदरावांचा २१ ऑगस्ट १९१८ रोजी जन्म झाला. या दिवशी तिथीने नारळीपौर्णिमा होती. गोविंदराव हे आठवे अपत्य असल्यामुळे कृष्णावताराप्रमाणे त्यांचे नाव गोविंद ठेवले गेले. मात्र व्यवहारात त्यांना सर्वजण 'बाबुराव' म्हणत असत. नाकीडोळी रेखीव असल्यामुळे आणि तीव्र बुद्धिमत्तेचं वरदान लाभलेलं असल्यामुळे ते आईवडिलांबरोबरच इतर अनेकांचे लाडके झालेले होते. त्यांचं बालपण ठाकुरद्वारात गेलं आणि मॅट्रिक (१९३६) पर्यंतचं शिक्षण विल्सन हायस्कूलमधून झालं. शालेय शिक्षणात त्यांनी कधीच पहिला नंबर सोडला नाही. पुस्तकांच्या अभ्यासाबरोबरच इतर अनेक कलांचा अभ्यास करून त्यात त्यांनी लहान वयातच प्राविण्य मिळवलं होतं. त्यांच्या बोटांत अशी काही जादू होती की चित्रं काढली की हुबेहूब देखावा किंवा हुबेहूब व्यक्ती कागदावर उमटायची. तसंच कोणतंही वाद्य वाजवणं त्यांना सहज जमायचं. हार्मोनियम, ऑर्गन (पायपेटी), पियानो यांवर त्यांचे दोन्ही हात सहज फिरायचे. तशीच बासरीही. त्यांनी वाजवलेली बासरी ऐकून श्रोते मंत्रमुग्ध व्हायचे. कुठल्याही क्लासला न जाता त्यांनी शास्त्रीय संगीताचा एवढा अभ्यास केला होता की भल्याभल्यांनीही कान धरावे. ही त्यांना मिळालेली दैवदत्त देणगी होती.

मॅट्रिकनंतर एल्फिन्स्टन कॉलेजमधून इंटर सायन्स करून ते पुढे इंजिनियरिंग शिकण्यासाठी पुण्याच्या गव्हर्न्मेंट इंजिनियरिंग कॉलेजमध्ये गेले. १९४१ मध्ये ते सिव्हिल इंजिनियरिंग विषयात बी.ई. झाले. पदवीपरीक्षेत ते ड्रॉइंग विषयात विद्यापीठात पहिले आले आणि त्यांना 'नायगामवाला गोल्ड मेडल' मिळाले. पुण्याच्या कॉलेजात होस्टेलमध्ये राहत असताना त्यांनी जे मित्र जोडले, त्यांची मैत्री साठाहून अधिक वर्षे अबाधित राहिली, याचं कारण त्यांचा मनमिळाऊ स्वभाव.

बी.ई. झाल्यावर त्यांनी पहिली नोकरी घेतली ती तत्कालीन जी.आय.पी. (ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वे ऊर्फ आताची मध्य रेल्वे) रेल्वेमध्ये त्यांची पहिली नेमणूक जबलपूरला 'डेप्युटी इंजिनियर' म्हणून झाली आणि इथे असताना त्यांनी नागदा, मथुरा रेल्वेमार्गाची पायाभरणी केली. नंतर त्यांची बदली

भुसावळला झाली. त्यानंतर मात्र त्यांनी मार्ग बदलला आणि त्या वेळच्या मुंबई प्रांताच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात (पी.डब्ल्यू.डी.) डेप्युटी इंजिनियर म्हणून प्रवेश केला. ब्रिटिश आमदानीतला मुंबई प्रांत हा फार विस्तृत म्हणजे उत्तरेला कराचीपासून दक्षिणेला कारवारपर्यंत पसरलेला होता. त्यामुळे त्यांच्या ठिकठिकाणी बदल्या व्हायच्या. दर वर्षा-दोन वर्षांनी बदली ठरलेलीच. अशा प्रकारे ते १९७६ मध्ये निवृत्त होईपर्यंत त्यांच्या एकूण एकवीस बदल्या झाल्या होत्या.

सन १९४१ मध्ये त्यांचा कामिनी विजयकर हिच्याशी विवाह झाला. ही माझी आई म्हणजे एक विदुषी होती. संस्कृत, मराठी आणि इंग्रजीवर तिचं अकल्पनीय प्रभुत्व होतं. ती स्वत: १९३५ सालच्या मॅट्रिक परीक्षेत संस्कृत विषयात संपूर्ण मुंबई प्रांतात मुलींमध्ये पहिली आल्यामुळे तिला 'यमुनाबाई दळवी प्राइझ' व शिष्यवृत्ती मिळाली होती. नंतर तिने एल्फिन्स्टन कॉलेजमधून संस्कृत व मराठी विषय घेऊन प्रथम वर्गात बी.ए. व एम.ए. केले होते. अशा दोन बुद्धिमतांची ही जोडी जमली होती. त्यांच्या पोटी आम्हा तिघी बहिणींचा जन्म झाला हे आमचं भाग्य. विलोभना (जबलपूर), मी-मृदुला (भुसावळ) आणि उज्ज्वला (गोध्रा) असे तिघींचे जन्मदेखील मुंबईबाहेर झाले.

पी.डब्ल्यू.डी. खात्यात असताना त्यांना बढत्या मिळत गेल्या आणि डेप्युटी इंजिनियर पदापासून सुरूवात करून क्रमाने ते एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सुपरिंटेंडिग इंजिनियर आणि (थोड्या काळासाठी) चीफ इंजिनियर झाले. पी.डब्ल्यू.डी. खात्याची फारकत झाल्यावर सेवानिवृत्तीपर्यंत ते इरिगेशन अँड पॉवर डिपार्टमेंट (सिंचन विभाग) मध्ये होते. बराच काळ ते या खात्याचे डेप्युटी सेक्रेटरीही होते.

त्यांच्या बत्तीस वर्षांच्या नोकरीतला सर्वोत्तम काळ म्हणजे कोयना धरणाच्या प्रकल्पावर त्यांनी साडेसात वर्ष केलेलं काम. सुमारे १९५० पासून या प्रकल्पाची आखणी सुरू झाली. कोयना धरणाचं मूळ आरेखन (डिझाईन) करणाऱ्या गटात त्यांचा समावेश होता. मुंबईत फ्लोरा फाऊंटनसमोर असलेल्या मर्कंटाइल बँक बिल्डिंगमध्ये त्यांचं ऑफिस होतं. इथेच कोयना प्रोजेक्टला सुरूवात झाली आणि आज जगविख्यात झालेल्या कोयना धरणाचं पायाभूत काम माझ्या वडिलांनी केलं आहे याचा मला सहर्ष अभिमान वाटतो. ही गोष्ट मुद्दाम इथे सांगण्याचं कारण म्हणजे कोयना धरणाचा जो इतिहास आजवर लिहिला गेला आहे त्यात कुठेही गोविंदराव आगासकरांच्या नावाची नोंद नाही याचं

## भार

भार आपुलाचि
आपण वाही
माझे असे कोणी
जगती नाही। खरे तरी।

माझे, माझे म्हणे
एकलाचि परी
येतसे तू जगी
एकलाचि जाई। जगतातूनी।

सर्वा प्रेम करावे
हवे ते द्यावे
घेऊ नये काही
हाचि बोध घेई। म्हणूनिया।

अपेक्षांचा डोंगर
रचियेला जरी
होशिल खचित
निराश तूही। मायबापा।

म्हणुनिया गड्या
सांगतो ते ऐकी
माझे, माझे, म्हणणे
सोडूनिया देई। एकदाचे।

येथेच सर्व राही
वाट पाहे हरी
वर तो तूझी
खरा तोच मानी। सदासदा।

खरा एक तोचि
भार त्यावरी
टाकुनिया नित्य
आनंदित राही। सदोदित।

**- कल्पना सुभाष कोठारे**

प्रमुख कारण त्यांचा प्रसिद्धीविन्मुख स्वभाव. श्रेय घेण्यासाठी धडपड करायची नाही हीच मनाशी बांधलेली खूणगाठ. त्यांच्या कामाचं महत्त्व जाणणाऱ्या फक्त काही मोजक्या व्यक्तींनाच ही गोष्ट माहीत आहे.

सन १९५४ मध्ये कोयना धरणाची पूर्वतयारी सुरू झाली तेव्हा हेळवाक या गावात पहिली वसाहत उभी करण्याचं काम त्यांच्याकडे सोपवलं गेलं. साप, विंचू, अस्वलं आणि कधी कधी वाघसुद्धा त्या घनदाट जंगलात त्यांना सामोरे यायचे, पण सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देत त्यांनी ही वसाहत उत्तम प्रकारे उभी केली. तिथून त्यांची रवानगी कुंभार्ली घाटाच्या पायथ्याशी असलेल्या पोफळी या खेड्यात केली गेली. कोयना धरणावरून तयार झालेल्या जलाशयातून निघालेलं पाणी बोगद्यांतून डोंगराच्या पोटात खोदलेल्या जलविद्युतगृहात नेऊन सोडायचं अतिशय जोखमीचं काम त्यांच्यावर सोपवलं गेलं. या कामासाठी पोफळीत राहणाऱ्यांची वसाहत बांधणं, डोंगराच्या पोटात बोगदे खणणं ही सगळी कामं माझ्या वडिलांच्या कारकीर्दीत झालेली आहेत. या कालखंडात ते आपलं काम किती झोकून देऊन करत असत ते आम्ही प्रत्यक्ष अनुभवलं आहे. या प्रकल्पाला भेट द्यायला पंडित जवाहरलाल नेहरूंपासून यशवंतराव चव्हाणांपर्यंत सर्व बडीबडी मंडळी येत असत तेव्हा त्यांना सर्व ठिकाणी घेऊन जाण्याचं काम तेच करत असत, मात्र फोटो घेण्याची वेळ आली की ते मागे कुठेतरी जाऊन थांबत असत. त्यामुळे मिरवणारी माणसं कुणीतरी वेगळीच असत. आज मी विचार करते तेव्हा या गोष्टीचं दस्तावेजीकरण (डाक्युमेंटेशन) झालं नाही याची मला फार खंत वाटते, पण एकीकडे मला

## हास्यचित्र



त्यांच्यातल्या या दुर्मीळ गुणाविषयी फार अभिमान वाटतो.

असाच दुसरा गुण म्हणजे त्यांचं निष्कलंक चारित्र्य. आगासकर साहेब म्हणजे प्रामाणिकपणाची परिसीमा अशी त्यांची ख्याती होती; तीही भ्रष्टाचाराने लडबडलेल्या पी.डब्ल्यू.डी. खात्यात. आयुष्यभर त्यांनी चुकूनही हरामाच्या पैशाला हात लावला नाही; जगले ते केवळ निढळाच्या घामाच्या कमाईवर. काळा पैसा कुणाला दिला नाही. कुणाकडून घेतला नाही, त्यामुळे त्यांच्या शब्दाला फार वजन होतं आणि सर्वजण त्यांना वचकून असत. त्यांनी आपलं सर्व इमान आपल्या कामाला वाहिलेलं होतं. त्यांचे हेच संस्कार आमच्यावरही झाले आणि आजही त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून चालण्याची बुद्धीच आम्हाला प्रेरित करते.

त्यांच्यातल्या इतर अनेक गुणांचं संकीर्तन करण्याची मला इच्छा होत आहे. पाठारे प्रभू ज्ञातीच्या संदर्भात यातल्या एकदोन गोष्टींचा उल्लेख केला पाहिजे. माझे आजोबा भगवंतराव आगासकर यांनी त्यांच्या आयुष्यात ज्ञातीच्या वेगवेगळ्या 'डिरेक्टरीज' (नामकोश) बनवल्या होत्या आणि त्या स्वखर्चाने छापून वाटल्या होत्या. तोच वारसा पुढे माझ्या वडिलांनीही चालवला. अक्षरशः उन्हातान्हात भटकून, तहानभूक विसरून ते ज्ञातीयांची माहिती गोळा करीत असत. फॉर्म भरत असत आणि त्याचे संकलन करीत असत. याच पद्धतीने त्यांनी घरोघरी जाऊन, माहिती गोळा करून ज्ञातीतील अनेक कुटुंबांचे वंशवृक्ष बनवलेले आहेत. त्यांचा पुढच्या पिढ्यांना निश्चितच उपयोग होऊ शकेल. फक्त त्यांनी या प्रकारच्या इतिहासात रस घेतला पाहिजे.

माझ्या वडिलांना - आम्ही त्यांना 'दादा' म्हणत होतो - निरनिराळे छंद होते. त्यातला प्रमुख म्हणजे भ्रमंतीचा. नोकरीमुळे त्यांना गुजरातपासून कर्नाटकापर्यंत सगळीकडे फिरावं लागलं. यात महाराष्ट्र तर अक्षरशः कानाकोपऱ्यांतून पाहून झाला. त्यांना पायी प्रवास करण्याची आणि गडकिल्ले चढून जाण्याची प्रचंड ऊर्मी येत असे आणि ते आम्हा सर्वांना बरोबर घेऊनच बाहेर पडत असत. महाराष्ट्रातले एकूणएक गडकिल्ले, एकूणएक तीर्थस्थानं आम्ही त्यांच्याबरोबर पायाखाली घातलेली आहेत. निवृत्तीनंतर तर त्यांनी आसेतु हिमाचल भारत पायांनी चाळून काढला. पूर्व-पश्चिम-दक्षिण-उत्तर, काहीकाही बघायचं सोडलं नाही. कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त पर्यटन कसं करता येईल याचा अभ्यास करून ते अशा सहली काढत असत.

त्यांना जुन्या जुन्या गोष्टी जपण्याचाही खूप छंद होता. जवळपास ४५०० काडेपेट्यांची चित्र त्यांनी गोळा केली होती आणि त्यांचे कलात्मकरीत्या आल्बम्स तयार केले होते. वार्धक्यामुळे हा छंद जपणं जमेनासं झाल्यावर त्यांनी हा संग्रह आपल्या ज्ञातीतले संग्राहक राजन जयकर यांच्याकडे सोपवला.

समाजसेवेची ऊर्मी त्यांच्या रक्तातच होती. कुणालाही कसलीही मदत लागली तर ते अक्षरशः मध्यरात्रीही धावून जायचे. मोटार चालवण्याचा छंद असल्यामुळे आमच्याकडे १९४३ पासून १९७६ पर्यंत फोर्ड व्ही.एट, शेव्हरोलेट, प्लीमथ, फियाट सुपरसिलेक्ट अशा गाड्या वेळोवेळी असायच्या, पण त्यांचा उपयोग नेहमी इतरांच्या मदतीकरताच व्हायचा. दादा गाडी इतकी सुंदर चालवायचे की सुप्रसिद्ध लेखक वि. द. घाटे त्यांना एकदा म्हणाले होते, ''आगासकर, तुम्ही कार किती सुंदर चालवता! जणू सतारच वाजवत असावेत!'' कित्येक लोकांना त्यांनी अगदी विनामूल्य या गावाहून त्या गावाला नेऊन सोडलेलं आहे. त्यातच त्यांना आनंद असायचा.

आयुष्याच्या उतरणीला लागल्यावरही त्यांनी आपली ही समाजसेवेची वृत्ती सोडली नाही. 'पदरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजायच्या' याच वृत्तीने त्यांनी सदैव निष्काम कर्म सेवा केली. कदाचित हीच पुण्याई शेवटी त्यांच्या कामी आली असेल, कारण कुठलाही आजार न होता, फारशी कुणाची सेवा न घेता, अगदी शांतपणे त्यांना ३१ डिसेंबर २०१० रोजी झोपेतच देवाज्ञा झाली. त्यावेळी त्यांचं वय ९२ वर्षांचं होतं. हे दीर्घायुष्य त्यांनी इतर सर्वांची मन:पूर्वक सेवा करण्यातच व्यतीत केलं. कविवर्य बा. भ. बोरकरांच्या शब्दांत त्यांना भावांजली वाहायची तर

दिव्यत्वाची जेथ प्रचीती।<br>
तेथे कर माझे जुळती।।

✳

# बाबांना पत्र

-बागेश्री पारीख



सदाशिव धुरंधर

प्रिय बाबा,

आज बऱ्याच वर्षांनी तुम्हाला पत्र लिहिण्याची संधी मिळाली आहे. तुम्हाला खूप काही सांगायचं आहे.

न्यायाधीश होऊन, तुमची इच्छा पूर्ण केल्याचं समाधान आज गेली कित्येक वर्षे मी उपभोगते आहे.

मला कधीच न्यायाधीश व्हायचं नव्हतं. तुमची क्रिमिनल लॉ प्रॅक्टिससुद्धा सांभाळायची नव्हती. मी माझ्या मॅरेज कौन्सेलर व्यवसायात सुखी होते. मी यामध्ये बरेच काही साध्य केलं होतं. माझ्या हाताखाली चौदा मॅरेज कौन्सेलर्स होत्या. त्या सर्वांना मी सुरेख शिक्षित केलं होतं.

पण तुम्ही व न्यायमूर्ती सुजाता मनोहरांनी मला लॉ करण्याचा आग्रह केलात. ३ वर्षे संसार सांभाळून कॉलेज केलं. तुम्ही मला सतत लॉच्या नोटस् काढून देऊन मदत करीत होतात. देशपांडेकाकांचं म्हणजे पुलंचं 'ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी' पुस्तक व त्यांच्या नोट्स देऊन सतत उत्तेजन देत होतात.

मी न्यायाधीश होणं ही तुमची आयुष्याची मनिषा होती.

मी तीन वर्षे लॉची पूर्ण केली तेव्हा आपल्या सर्व नातेवाईकांना बोलावून तुम्ही माझा सत्कार केलात, तो अजूनही आठवतो आहे. तुम्ही तुमचा कोर्टातला गाऊन माझ्यावर चढवलात. तुमची हिऱ्याची अंगठी माझ्या बोटात चढवून आशीर्वाद दिलात; ''यशस्वी हो.''

आणि फक्त तुमच्या इच्छेसाठी मी न्यायाधीशाचा फॉर्म भरला आणि निवडलीही गेले. त्याचवेळी तुम्ही खूप आजारी झालात. रुग्णशय्येवर असतानाही तुम्ही मला 'युवर ऑनर' म्हणायचा. मी म्हणायची, ''मी कुठे अजून जज झालेय?'' तुमची इच्छाशक्ती अचाट होती.

मला आठवतं, शेवटचा श्वास घ्यायच्या आधी तुम्ही मला विचारलंत, ''झालीस का जज?'' मी म्हणाले, ''आता होईन. तुम्ही थोडं थांबा.'' पण नियतीपुढे काहीच चाललं नाही. जज होण्याच्या सीमेवर असतानाच तुम्ही आम्हाला सोडून गेलात.

माझं केवढं मोठं नुकसान होतं ते. ज्यादिवशी मी पदग्रहण केलं तेव्हा तुमचे खास मित्र गोटूकाका फुलांचा मोठा बुके घेऊन कोर्टात आले होते. मला म्हणाले, 'बाबांची इच्छा होती. त्यांनी मला सांगितलं होतं की, बागेश्री जेव्हा जज होईल तेव्हा मी नसेन, तर बाबा म्हणून तूच तिला आशीर्वाद दे,''

मी भर कोर्टात गोटूकाकांच्या पाया पडले व न्यायाधीशाच्या खुर्चीवर जाऊन बसले. खूप घाबरले होते मी तेव्हा; पण तुमची निर्भीडतेची व सचोटीच्या शिकवणीची शिदोरी जवळ होती.

न्यायदानाची १२ वर्षे खूप काटेकोर होती; पण ती सर्व यशस्वीरित्या पार पाडली. बाराही वर्षे मुंबईच्या कुटुंब न्यायालयात मी काम केलं आणि निवृत्त झाले. नेहमी वाटायचं, तुम्ही असायला हवे होता. तुमचा सर्वांना मदत करण्याचा स्वभाव व तुमच्यासारखीच चेहेरेपट्टी यामुळे खूप माणसं जोडली.

आता मी तुमच्या पार्ल्याला राहायला आले आहे. तुमच्याकडून समाजसेवेचे बाळकडू मिळालंच आहे. पार्ल्यात माझ्या कलागुणांना खूप वाव मिळाला आहे.

टिळक मंदिराच्या 'दिलासा' संस्थेत काम करून मी माझ्या अनुभवाचा व शिक्षणाचा उपयोग करून माझी समाजसेवेची आवड पूर्ण करीत आहे. ह्यात मला खूप खूप समाधान आहे. तुमच्या आशीर्वादाचा हात असाच सतत माझ्यावर राहू द्या.

तुमची
बागेश्री

*


**खास पाठारे प्रभूंचा ताशा**

मुंजी, लग्न, वरघोडा आणि
वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

*मोबाईल नं.:*
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९

*पत्ता:*
खोली क्र. ७, पहिला मजला,
(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४०००८


## वात्रटिका

### उपाय

संस्थाचालक आपापसात पुरस्कार घ्यायचे वाटून,
बाकी लेखक पुस्तकं पाठवून-पाठवून जायचे थकून.
ती मग ओळखून चुकली, प्रसंग आहे बाका,
आपल्या गावात संस्थेची मग तिने उघडली शाखा.

**-डॉ. सुमन नवलकर**

### नातं

दोन अक्षरी शब्द 'नातं'
जवळीक निर्माण करणारं!
प्रेमाने जोपासता
हवं हवंस वाटणारं।।१।।

फुला सारखे जपता
हळुवार फुलत जाणारं।
राग लोभ धरता
पुरतं कोलमडून पडणारं।।२।।

महागाईच्या काळातही
बिन भांडवल फोफावणारं।
आपुलकीच्या आधारावर
अलगद जखडत जाणारं।।३।।

श्रीमंतीच्या तुलनेतही
मौल्यवान ठरणारं।
जग सोडून जाता
दुसऱ्यांना आठवणीवर जगवणारं।।४।।

**-तन्वी विजयकर**

# DIARY OF A SOLDIER

✶ Capt. Ashwin Pradhan (Retd.) ✶

Today as I pen these few lines, I glance over my shoulder and see a path tread by a very few. A path strewn with challenges, sacrifices and opportunities. "The sacred path of a warrior". I chose to walk this path. Thanks to the support of my family and friends, who have borne silently the stress and strain associated with a soldier's life.

One of the fondest memories of my military career is when I served tenure as a young officer in the glacial heights of Siachen Glacier.

I was all of 24 yrs when I got posted to the glacier as a young dynamic officer, ready to take on the Pakis. However, as young lieutenant when I first stood at the base of Himalayas, I realized what an insignificant and fragile organism I was in comparison to the huge glacial mountain cape standing magnificently in front of me. The snow-white glacial heights appeared as a somber sage standing witness and narrating stories of the yore. A sole spectator to the victories and defeats and of valour. As I stood there at the base in the whispering silence of the glacial breeze, I was overcome with awe and humility by thought of scaling these very heights, which I had pledged to defend to the peril of my life.

I take this opportunity to acquaint our readers with this 'Heaven On Earth', where even the angels fear to tread. A place where only a few dare to inhabit and the only living organisms found in that place are the Officer's and Jawan's of the Indian Army

**Siachen Glacier the highest battlefield in the world.**

Siachen Glacier, here a war is on for the past thirty years. It is a conflict where records of human endurance, flying and technical competence are being set nearly everyday. Operation Meghdoot was launched on 13 April 1984 when the Indian Army and the Indian Air Force went into the Glacier. The Siachen area is awe inspiring and beautiful…..till the first few steps are taken! The challenges to human endurance that this beautiful and inspiring scenario imposes adequately negate the initial impression caused by its stark beauty.

The Siachen Glacier is awesome and it embodies one of the most inhospitable and glaciated environs in the world. The glacier runs down the valley in the Karakoram Range and is 76 kilometers long and varies in width between 2 to 8 kilometers. The mountains alongside the Siachen, range between 15,000 to 25,000 feet. The ridges are sharp, rugged and barren. Local resources are absent. The gradients are steep and precludes cross country movement and the glacier is highly crevassed.

Compounding the arduousness are the snow and blizzards. It receives 6 to 7 meters of the annual total of 10 meters of snow in winter alone. Blizzards can reach speeds up to 150 knots (nearly 300 kilometers per hour). The temperature drops routinely to 45 degrees C below zero, and the wind chill factor makes the temperature dip further with increase in wind velocity. The weather is fickle and can change without notice. It does not require imagination to realize the isolation and forbiddances of this place.

Such an environment makes conducting a war in this area an expensive proposition. An unending, undeclared war is worse still. Siachen, thus, is mind boggling, not only since a solution is elusive, but also in financial terms and in human lives.

The origin of the Siachen imbroglio can be traced to Karachi Agreement (27 July 1949) consequent to the first war over Kashmir after Partition. The terminology in the delineation beyond NJ 9842 was couched in the vague phrase 'thence moving northwards'. This 'northward moving line' was never physically demarcated or verified on ground. The Pakistani contention that Siachen is a part of Baltistan in the Northern Areas of Pakistan is faulty if viewed in the light of the Karachi Agreement. Every area would then be a part of the Northern Area of Pakistan so to say given this astounding logic. Therefore, the ground reality and the geopolitical situation demanded physical occupation and administrative control which India undertook in 1984. This gave concrete body to the vagueness of the delineation terminology of the Karachi Agreement and its successor Agreement at Suchetgarh (11 December 1972). The question of interpretation and exercising of this prerogative physically and administratively was thus resolved.

The question of the line 'thence moving northward' going North West or North East is of pertinence. Currently, the line moves from NJ 9842 through Bilafond, Saltoro Kangri, Sia La, Baltoro. It thus joins at the central segment of the Shaksgam area of Jammu-Kashmir which Pakistan illegally ceded to China.

A North Eastern demarcation of the line would join it to the Sino – Indian boundary between the eastern corner of Pakistani-ceded Shaksgam and the western corner of Chinese-occupied Aksai China. This is where the strategic Karakoram Pass is situated (a distance of 91.3 kilometres). The occupation of Siachen effectively separates Pakistan-occupied Kashmir (POK) from Aksai Chin, (the part of Kashmir claimed and Occupied by China) and hence precludes any outflanking moves to isolate Leh or even Kargil sectors. It also empowers India to keep a check on the Khunjarab Pass; as also is a positive factor to any negotiation with China on the border question.

Thus, the view that Siachen is an exercise in futility and too expensive an all encompassing burden is not valid given the geopolitical realities then and even now.

There is a view that India could withdraw from the Glacier. Unless there is an international assurance, which in any case, is not the worth in paper it is written on, there is no guarantee that Pakistan would not occupy the Glacier. In such a case, advantages that India currently enjoys would be negated. To imagine that holding a few major passes would suffice would also not be valid since moving troops in a High Altitude Area to an impending threat is laborious, time consuming, physically impossible given human adaptability limits and thus merely theoretical.

Pakistan occupies the southern slopes of the Saltoro Watershed, most of which is between 9000 to 10,000 feet at most places, whereas India occupies the northern slopes which are higher and reach up to 25000 feet. This makes operating in high altitudes compared to Pakistan more complex and difficult.

Pakistan's advantage is that it occupies lower heights giving it a positive inherent logistic supply continuum and fewer dependants on air supply. As Pakistan occupies lower heights its logistics are based on land routes while the same is not the case with India. This ensures that the cost of operations is much lower for Pakistan, especially in financial terms.

Occupation of commanding heights and passes is the crux to the defence of Siachen. Therefore, the flip side of the altitudinal disadvantage is that it provides tactical advantage. Given the altitude and the steep terrain it is immensely difficult to dislodge the defender as Pakistan has learnt at a high cost.

One could never have imagined that by 1984, when Op Meghdoot was launched, it would become a routine day in and day out procedure, braving enemy fire and that it would be continuing in 2016 too. The intervening Thirty years have seen the operations increase in size and intensity. The enemy has tried on very many occasions to dislodge our Jawans from the vantage positions occupied by them - but has had to beat a hasty retreat each and every time.

## वात्रटिका

### युक्ती

भाजणीचं पीठ मळून तिने घातलं साच्यात,
हात दुखून आले तरी चकली आपली तुटतात.
ती म्हणाली, इथून-तिथून जाणारच ना पोटात ?
बेत बदलून तिने घातला कडबोळ्यांचा घाट.

**-डॉ. सुमन नवलकर**

The Jawans stay in conditions that defy description - miserably cold, with temperatures going down to -60º C, where the weather clamps down for days at a stretch, preventing supplies from coming in. In such conditions the life-line to the outside world is the Indian Air Force.

Siachen air operations of today are a far cry from the "drawing water from the well" procedure of 1978. They are scientifically planned and executed meticulously - for both supplies and human lives are precious. Air maintenance starts from Chandigarh from where IL-76s and An-32s ferry in supplies and men to Leh and Thoise (The highest airstrip in the world). Thereafter, medium lift M-17 helicopters air drop loads on to lower level helipads on the glacier - by lower levels I mean helipads up to about 17,500 ft! Air dropping of supplies is also done by An-32s at special dropping zones. The Cheetahs then take over the challenging task of ferrying supplies and men to helipads situated up to about 25,00 feet.

All operational sorties have an element of risk involved in them, especially if they are over an inhospitable terrain like the Siachen Glacier. The pilots have to brave temperatures as low as -60º C, strong winds, lack of oxygen and flying in poor weather conditions in close proximity of hills. There is always the threat of powerful downdrafts that pull the helicopters down, if the pilots are not careful. Added to that is the fact that the helicopters are flying at the edge of their flight envelope where the power margin available is small, if not negligible. Any miscalculation or mishandling of controls can result in a catastrophic accident. Over and above, there is the omnipresent threat of enemy fire. The pilots fly fast and low to give the minimum reaction time to the enemy.

The landing and take off operations on the match box sized helipads is precise;

The Army Jawans opens the door of chopper, takes out the load, puts in the mail/ casualty and the pilot executes a take-off - in the reciprocal direction. The total time on the helipad does not exceed 2 to 30 seconds. The return to the Base Camp is fast, a quick turn around of the aircraft is done while the pilots have a cup of tea and the aircraft takes off for the next mission.

Pakistan however occupies certain areas which give them the advantage over the logistic routes.

The Base Camp for Indian forces is 12,000 feet above sea level. The altitude of some Indian forward bases on the Saltoro Ridge ranges from Kumar (16,000 feet) and Bila Top (18,600 feet) to Pahalwan (20,000 feet) and Indira Col (22,000 feet). Because of the steep gradient of the Saltoro Range, the area is also prone to avalanches. It is may be pertinent to mention that only 3 per cent of the Indian casualties were caused by hostile firing. The remaining 97 per cent have fallen prey to the altitude, weather, and terrain.

The greatest challenge is logistics. The maintenance chain is by fixed wing air drops, helicopters, porters, army mules or small donkeys. This is not only financially costly but also costly in terms of effort. As per an estimate, it costs between Rs 1,00,000 to Rs 1,50,000 per ton depending upon the aircraft/ helicopter employed.

The interesting fact is that Kerosene Oil required for heating and drying purpose constitutes about 40% of the tonnage lifted. As Kerosene freezes at -50 C, it is possible to use a pipeline to pump Kerosene. Much that it may astound those who have not operated at such attitudes and adverse weather conditions that Kerosene oil is more welcomed than foodstuff.

As is well known, food is not a problem

since these altitudes influence an aversion to food. The appetite is reduced. Tinned stuff is most unpalatable and this low intake in food seriously affects the operational efficiency, even though it is not apparent if one goes by the enthusiasm of all ranks in executing their tasks. 6000 calories are essential at these altitudes compared to 3000 to 4000 calories at lower heights. Health remains a problem. Pulmonary oedema is a killer. Acclimatization is the only way to ensure unnecessary deaths. At times, owing to operational imperatives, this is forgotten, but then the costs are high. Mental traumas of living on the edge practically and mentally are one of the major concerns.

The challenges to human endurance make the conduct of operations a challenge not only in military terms but also in human ingenuity. This is the sole factor that makes Siachen Glacier operations a keynote issue in the art or science of conducting warfare and thereby keeping it at the center of everyone's attention.

Our Officers and Jawans operating in the Glacier are the true unsung heroes of Operation Meghdoot. Siachen is where only one type of Soldier operates - the brave and a notch above the average; where only one type of Pilot succeeds - once again the brave and a step above the average. But what keeps these Soldiers and Pilots going in such harsh conditions? It is plain and true "JOSH" and the spirit to ensure that the enemy does not cast an evil eye on what is our Motherland.

I would like to end my treatment of the subject by quoting a few lines which we in the armed forces live by -

'We live by Chance, Love by choice & Kill by profession.'

## हास्यचित्र



कथा

# प्रारब्ध

## ✶ सौ. शुभांगी शैलेश धराधर ✶

आज श्रावणातला पहिलाच सोमवार. ओंकारेश्वराच्या देवळाच्या पायऱ्यांवर बसून सुनयना समोरच्या वाहत्या नदीकडे एकटक पहात होती. बरसणाऱ्या श्रावणसरींप्रमाणेच तिचे डोळेही अविरत बरसत होते. सभोवतालच्या दुनियेचे भान विसरून ती आपल्याच दु:खात चूर झाली होती. तितक्यात तिच्या गळ्याला चार चिमण्या हातांची मिठी पडली. दचकूनच ती भानावर आली. तर तिच्या दोन चिमण्या, मृगया आणि तनया केविलवाण्या नजरेने तिच्याकडे पहात होत्या. आपल्या आजीबरोबर ओंकारेश्वराचे दर्शन घेऊन आईला शोधताना त्यांना पायऱ्यांवर बसून अश्रू ढाळणारी आपली आई दिसली. त्या तिच्याकडे झेपावल्या. आपले अश्रू पुसून त्या दोघींना तिने उराशी कवटाळले आणि घरी आली.

कितीही दुखं आली तरी त्यातून सावरून आपली दैनंदिन कामे तर करावीच लागतात. तशीच यंत्रवत घरची कामे आटपून रात्री जेव्हा त्या मायलेकी अंथरुणावर पडल्या तेव्हा पुन्हा तिला हुंदका दाटून आला. तिचे रडताना गदगदणारे शरीर आपल्या कवेत घेऊन वत्सलाबाई तिची समजूत घालू लागल्या. ''नयन, पोरी, अगं जाणारा तर गेला. त्याला दोन वर्षे होत आली. अजून तू जर स्वत:ला सावरले नाहीस तर ह्या चिमण्यांनी कोणाकडे पहायचे? अगं तुला असे रडताना पाहून त्या केवढ्या कावऱ्या बावऱ्या होतात. त्यांनाही आपल्या बाबांची आठवण रडवेली करते. पण तुझ्यातच त्या आपली आई आणि बाबा शोधतात.''

''आई, मी काय करू? अगं, मी माझ्या जयला नाही विसरू शकत. जय, असा कसा मला एकटीला ह्या जगात सोडून गेलास रे?'' तिच्या नजरेसमोर तो दिवस पुन्हा उभा राहिला. तो त्यांच्या लग्नाचा पाचवा वाढदिवस होता. तिचा प्राणप्रिय जय तिला सरप्राईझ गिफ्ट म्हणून हिऱ्याच्या कुड्या आणण्यासाठी झवेरी बाझारला गेला होता. त्याने दुकानातून बाहेर पाय टाकायला आणि समोरच पार्क केलेल्या स्कूटरचा स्फोट व्हायला एकच गाठ पडली. क्षणात त्याच्या देहाच्या चिंधड्या उडाल्या. घरी आतुरतेने वाट पहाणारी नयन आणि बाबाच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या तीन वर्षाच्या तिच्या जुळ्या लेकी आता कासावीस झाल्या होत्या. कारण जयचा कुठेच पत्ता नव्हता. डोळ्यातील पाणी वाट पाहून सुकून गेले. अशुभाच्या विचाराने मनाची घालमेल होत असतानाच, जयला शोधणारे त्याचे मित्र त्याचा अचेतन छिन्न-विछिन्न देह घेऊन दारात उभे राहिले आणि तिची शुद्ध हरपली. त्यानंतर आज दोन वर्षे झाली तरी ती तिच्या जयला विसरूच शकत नव्हती.

......... कोणत्याही दु:खावर काळ हे मोठे औषध असते. बघता बघता जयला जाऊन चौदा वर्षे झाली. नयनच्या मृगया आणि तनया आता कॉलेजकन्यका झाल्या होत्या. त्यांच्या आणि त्यांच्या मैत्रिणींच्या किलबिलाटाने घर भरून जायचे. त्यांच्यामुळेच घराला घरपण आले होते. त्या दोघींकडे पाहूनच तर तिने आपले दु:ख आवरले, आता तर तिची आई (वत्सलाबाई) सुद्धा अल्पशा आजाराचे निमित्त होऊन देवाघरी गेली होती. काळ सरत होता. दिवसामागून दिवस जात होते. अशातच दोघींच्या भविष्याची सुंदर स्वप्ने रंगवत असतानाच पुन्हा एकदा दैवाने तिच्या सुखावर घाला घातला आणि कॉलेजमधून घरी परतणाऱ्या त्या दोघी लोकलच्या डब्यात झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्यूमुखी पडल्या. पुन्हा एकदा दहशतवाद्यांच्या क्रूर खेळात

तिच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली. नेहमी घर हसते खेळते ठेवणाऱ्या आपल्या दोन्ही मुलींचे ते छिन्न-भिन्न निष्प्राण देह पाहून तिने टाहो फोडला. तिचा तो आक्रोश ऐकणाऱ्यांच्या काळजाचे पाणी-पाणी करत होता. मुलींचे अंत्यसंस्कार आटपल्यावर तिने मनाशीच एक निर्णय घेतला. आपली सर्व संपत्ती, रहाते घर, दागदागिने, आयुष्यभराची जी काही मिळकत होती ते सर्व तिने शहरातल्या एका अनाथ आश्रमाला आपल्या मुलींच्या व जयच्या नावे दान दिले व त्याच अनाथ आश्रमात ती राहू लागली. आपली सर्व माया, ममता, प्रेम ती त्या अनाथ मुलांवर उधळू लागली. दैवाने तिचे जग वैराण केले तरी हार न मानता ती त्या अनाथ मुलांच्या जीवनात मायेचे नंदनवन फुलवू लागली. आईच्या मायेसाठी आसुसलेले ते अभागी जीव तिच्या मायेच्या पदराखाली विसावू लागले. ती सुद्धा त्यांच्यात रममाण होऊन आपले दु:ख विसरण्याचा प्रयत्न करू लागली, कारण ह्या जगात आता ती एकटीच होती. एकलेपणाच्या वेदना सहन करत, त्या अनाथ मुलांमध्येच रमत आपल्या जीवलगांच्या आठवणीत हरवत जगणे हेच तिचे 'प्रारब्ध' होते.

*

## जरा हसा-

कोजागिरी साजरी करायची तर मसाला दूध आणि भजी हवीतच. पण कांदाभजी? संभूराव म्हणाले, ''अगं हरकत नाही. कर कांदाभजी. मी माझी 'एफडी' मोडतो!''

## हास्यचित्र



## बालविभाग

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

कथा

# परी

**✶ डॉ. सुमन नवलकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

आई-बाबा ऑफीसला गेलेत. सिद्धू शाळेत गेलाय. सानिका एकटीच घरी. खरं तर सानिकाला सांभाळणाऱ्या शांतामावशीपण आहेत. पण त्या नेहमीसारख्याच डोलणाऱ्या खुर्चीत बसून डुलता-डुलता डुलक्या खाताहेत. मग सानिकाने ड्रेसिंग-टेबलच्या खणातून फणी काढली. छानपैकी केस विंचरले. अगदी आईपेक्षाही छान. मग टेबलावरच्या पावडरच्या डब्यातून थोडीशी पावडर घेतली. पण एवढा मोठा तो डबा. थोडी पावडर घेता-घेता एकदम खूपच पावडर हातावर पडली. हात छोटासा. त्यामुळे थोडी पावडर जमिनीवर सांडली. मग सानिकाने हातातली पावडर तोंडाला लावली. जमिनीवरची पावडरही उचलून तिने ती हाता पायांना चोळली. उगीच फुकट कशाला घालवायची? मग सानिकाने पुन्हा टेबलाच्या खणात वासका-वासक केली. एक मोठ्ठ्या टिकल्यांचं पाकीट सापडलं. ह्या आईच्या टिकल्या नसणारच. आई छोटुल्या टिकल्या लावते. मग हे पाकीट कोणाचं? कोणाचंही असलं तरी चालेल. आईचं नाहीये, म्हणजे आई ओरडणार नाही. एक टिकली काढून सानिकाने ती कपाळावर लावायचा प्रयत्न केला. पण कधी या बोटाला, तर कधी त्या बोटाला, टिकली आपली चिकटतेय. कपाळावर चिकटायचं मात्र नाव नाही. मधेच एकदा दोन बोटांना एकदम चिकटली ती टिकली. सुटता सुटेना. मग सानिकाने तशीच दोन्ही बोटं कपाळापाशी नेली. पण टिकली काही बोटांपासून सुटेना. मग दुसऱ्या हाताच्या बोटांनी सानिकाने टिकली काढायचा प्रयत्न केला. पुन्हा तेच. टिकली दुसऱ्या हाताच्या बोटाला चिकटली. कधी तळहाताला, कधी अंगठ्याला, तर कधी अंगठीच्या खड्यासारखी बोटाच्या वरच्या बाजूला. खूप वेळ इकडे-तिकडे चिकटून झाल्यावर एकदाची टिकली टेकली कपाळावर. पण तोपर्यंत टिकलीचा चिकटपणा खूप कमी झाला होता. कपाळावर अर्धवटच चिकटली ती. लंगडी घालताना एक पाय वर ठेवतात, तसा टिकलीचा एक पाय आपला वरच. शिवाय कपाळावर भलतीकडेच चिकटली होती ती. पण पुन्हा तिला जागेवर कोण सरकवणार? बरी आहे आपली आहे तिथेच.

मग पुन्हा खणात वासका-वासक केल्यावर सानिकाला आईची जुनी लिपस्टिक सापडली. तुटून झाकणाच्या आत पडली होती. झाकणाला आतून सगळीकडे चिकटली होती. मग सानिकाने झाकण टेबलावर आपटलं. लिपस्टिकचा तुकडा टेबलावर पडला. तो दोन बोटांच्या चिमटीत पकडून सानिकाने छानपैकी दोन्ही ओठ लालबुंद केले. लिपस्टिक पुन्हा झाकणात घालायचा प्रयत्न केला. पण ती झाकणात आडवीच अडकून बसली. शेवटी बोटाने दाबून घुसवली तिला झाकणात. दोन्ही हातांची बोटं लालबुंद. आता एवढी लिपस्टिक काय फुकट घालवायची? मग सानिकाने डाव्या हाताच्या बोटांनी उजव्या हाताची नखं रंगवली. उजव्या हाताच्या बोटांनी डाव्या हाताची नखं रंगवली.

मग सानिकाने इस्त्रीच्या कपड्यांमधून आईची एक ओढणी काढली. दोन्ही खांद्यावरून ओढणी टाकली. तर ओढणी आपली लोळतेय दोन्ही बाजूंनी. त्या दिवशी सानिका बाबांच्या ऑफीसातल्या थॉमस अंकलच्या लग्नाला गेली होती, तेव्हा नवरीची ओढणी अशीच तिच्यामागे लोळत होती. व्हेल का कायसं म्हणतात म्हणे त्या नवरीच्या ओढणीला. व्हेल नसेल, टेलच असणार. माऊसची असते तशी टेल.

मग सानिकाने गॅलेरीतल्या जुन्या सामानातून आईची जुनी पर्स आणली आणि खांद्यावर

अडकवली. ओढणी सारखी पायात येत होती. मग सानिकाने ओढणीचे गळ्याभोवती दोन-तीन फेरे घेतले. तरी पण ओढणी लोळायची थांबेना. शिवाय गुदमरल्यासारखं पण व्हायला लागलं. शेवटी ओढणी काढून पुन्हा दोन्ही खांद्यावरून टाकली. तिची दोन्ही टोकं पुढे घेऊन कमरेभोवती गुंडाळली. गाठ मारायचा प्रयत्न केला. गाठ सारखी सुटते, ओढणी लोळते, गाठ सुटते, ओढणी लोळते आपलं चालूच. शेवटी ओढणी काढून कॉटवर फेकून दिली. नुसत्या पर्सवरच भागवायचं ठरवलं.

एव्हाना शांतामावशींची खुर्ची डुलायची थांबली होती. शांता मावशींच्या डुलक्याही थांबल्या होत्या. शांतामावशी आणि खुर्ची, दोघींनाही शांत झोप लागली होती.

मग सानिकाने सिद्धूचा खण उघडला. आतून लाकडी पट्टी काढली. खडूचे दोन तुकडे दिसले, तेही काढले. टीचर-टीचर खेळायचं ठरवलं. पण मुलं कुठेत? मग झोपलेल्या शांतामावशींनाच शिकवायचं ठरवलं.

पुढल्या वर्षी सानिका दुपारच्या शाळेत जाईल. सिद्धूबरोबर शाळेत जाईल-येईल. मग तिला अशी एकट्याने खेळायची वेळ येणार नाही. तसा सिद्धूदेखील तिच्याशी खेळतो कुठे म्हणा? जास्ती भांडणं आणि मारामाऱ्याच होतात. पण शांता मावशींच्या डुलकीपेक्षा सिद्धूची मारामारी बरी.

''कोण मस्ती करतंय रे तिकडे?'' सानिकाने शांतामावशींच्या दिशेने पट्टी हलवत हळू आवाजात प्रश्न केला. खडूचा तुकडाही शांतामावशींच्या दिशेने फेकायचा विचार होता. पण मग शांतामावशी उठल्याच म्हणून समजायच्या. ''अभ्यास केला का सगळा? गणितं सोडवली? कविता पाठ झाली? म्हणून दाखवू पाहू?'' सगळं काही हळू आवाजात करावं लागतंय. नाहीतर शांतामावशी उठल्या की संपलं.

मग शांतामावशींऐवजी सानिकानेच शाळेत नवी शिकवलेली कविता म्हटली. अर्धी कविता म्हटल्यावर एका ओळीपाशी गाडी अडली. मधला शब्द आठवेना. शेवटी कंटाळून तिने कवितेचा नाद सोडला.

''हं! आता पी.टी.चा तास. हात पुढे - हात बाजुला - हात वर - हात खाली.

हात पुढे - हात बाजुला - हात वर - हात खाली.

मग पी.टी.चे आठवतात तेवढे सगळे प्रकार शांतामावशींऐवजी स्वत:च करून करून शेवटी सानिकाला पी.टी.च्या तासाचाही कंटाळा आला. खांद्यावर पर्स अडकवून पी.टी.चे प्रकार करणं तसं अवघडच. मग सानिकाने पर्सही ओढणीच्या दिशेने दिली भिरकावून.

मग चित्रकलेचा तास खेळायचा ठरवून सानिकाने चित्रं रंगवायचं आत्याने आणलेलं पुस्तक काढलं. रंगीत पेन्सिली काढल्या आणि चित्र रंगवायसाठी जमिनीवर सरंजाम मांडला. आधी मांडी घालून, मग एक पाय सोडून, मग दुसरा पाय सोडून, म्हणता-म्हणता पोटावर लोळण घेऊन डाव्या हाताच्या तळव्यावर डावा गाल पेलून चित्र रंगवता-रंगवता सानिया रंगून गेली. पेन्सिलींमध्ये सोनेरी रंगाची पेन्सिल नव्हती. म्हणून सानिकाने परीचे केस पिवळे केले. परीचा फ्रॉक लाल रंगवला. परीचे बूटपण लाल केले. पंखांना निळा रंग दिला. परी ज्या बागेत उभी होती, त्या बागेत फुलंच फुलं होती. फुलं रंगवायला खूप मजा आली. प्रत्येक फुलाचा रंग वेगळा. रंगवता-रंगवता सानिकाचे डोळे बंद व्हायला लागले. फुलांचे रंग पानांच्या रंगांत मिसळायला लागले. परीची जादूची काठी सिद्धूच्या पट्टीसारखी दिसायला लागली. परीचं तोंड थेट शांता मावशींसारखं दिसायला लागलं. मग पुन्हा परीचं तोंड आईच्या तोंडासारखं दिसायला लागलं. मग परीने सानिकाला मांडीवर घेऊन झोपवलं. आईसारख्या दिसणाऱ्या परीच्या मांडीवर सानिका गाढ झोपून गेली.

पण परीची मांडी अशी कडक का लागतेय? सानिकाला जाग आली. डाव्या कुशीवर झोपल्यामुळे डावी बाजू दुखत होती. मग सानिकाने आईसारखी दिसणारी परी कुठे दिसते का ते पाहिलं. कोणीच नाही. तेवढ्यात चित्रांच्या पुस्तकाकडे तिचं लक्ष गेलं. चित्रातली परी छानपैकी दिसत होती. छानपैकी हसत होती. पण तिचा चेहरा परीसारखाच होता. आईसारखा नव्हता. मग सानिकाला त्या परीसारख्या दिसणाऱ्या परीचा खूप राग आला. आधी गुलाबी रंग दिलेल्या परीच्या चेहऱ्यावर मग सानिकाने काळ्या रंगाने जोरजोरात रेघोट्या ओढल्या. आता तर परीचा चेहरा परीसारखाही दिसेना.

**जरा हसा**

सध्याच्या तूरडाळीचे भडकलेले भाव ऐकून संभूरावांचे झाले हार्टफेल.
डेथसर्टिफिकेटवर डॉक्टरांनी कारण लिहिले-
'नो पल्स!'

मग सानिकाला खूपच रडू यायला लागलं. आपण मोठ्याने रडलो तर शांतामावशींना जाग येईल याची आठवणही राहिली नाही तिला. आणि तसंच झालं. सानिकाचं रडणं ऐकून शांतामावशींना जाग आलीच. मग नेहमीचंच. शांतामावशींनी सानिकाचे डोळे पुसले. तिला बेसिनकडे नेऊन स्टुलावर उभं केलं. तिचं तोंड, हात साबण लावून स्वच्छ धुतले. तिचा फ्रॉक बदलला. तिला नको असलेलं दूध प्यायला लावलं. आणि मग खेळायसाठी बुडकुल्यांची टोपली काढली.

आता नेहमीचाच जेवण बनवायचा खेळ. शांता मावशींना हा एकच खेळ येतो. वरण भात करायचा, पोळ्या लाटायच्या, चहा बनवायचा. मग खोटं-खोटं जेवायचं. खोटा-खोटा चहा प्यायचा. मग भांडी खोटी-खोटी स्वच्छ धुवून पुसून ठेवायची. सानिकाला हा भातुकलीचा खेळ मुळीच आवडत नाही आणि तिला आवडणारे खेळ शांतामावशींना येत नाहीत.

'भातुकली नको.'

पलीकडे चित्रांचं पुस्तक पडलं होतं. बाजूला रंगही होते. सानिकाने काळ्या रेघोट्या ओढलेल्या परीच्या तोंडावर पुन्हा गुलाबी रंगाची पेन्सिल फिरवली. पण काळ्या रंगावर गुलाबी रंग चढेना. मग सानिकाने कंटाळून पान उलटलं. तर पुढल्या पानावर आणखी एक परीचं चित्र. यावेळी सानिकाने गुलाबी रंगाने न रंगवता तपकिरी रंगाने परीचं तोंड रंगवलं. परीचे हात-पाय - मान सारंकाही तपकिरी रंगाने रंगवलं. ही परी खूपशी शांतामावशींसारखीच दिसत होती. आज शांतामावशी निळ्या रंगाची साडी नेसल्या होत्या. मग परीचा झगाही निळाच रंगवला सानिकाने. आता तर परी हुबेहूब शांतामावशींसारखीच दिसायला लागली. पण सानिकाला तिचा राग आला नाही.

सिद्धू शाळेतून यायची वेळ झाली होती. मग सानिकाने घाई-घाईने सिद्धूची लाकडी-पट्टी, सिद्धूचे खडू त्याच्या खणात ठेवले. चित्रांचं पुस्तक, रंग आपल्या खणात ठेवले. सिद्धू येईल, मग लगेचच आईही येईल. आई... हो, आईची जुनी पर्स अजून कॉटवरच पडलीय. सानिकाने कॉटवरची पर्स उचलून, पुन्हा गॅलरीतल्या जुन्या सामानात नेऊन ठेवली. ओढणी पुन्हा इस्त्रीच्या कपड्यांमध्ये ठेवणार, तेवढ्यात शांतामावशींचं लक्ष ओढणीकडे गेलं.

''शानिका, ओढणीला हे लाल-लाल काय लागलंय? आईची नवी ओढणी ना ही?'' हातांची लिपस्टिक ओढणीला लागून ओढणीभर जिकडे-तिकडे लाल डाग पडले होते. 'आता?'

खरं तर सानिकाला 'शानिका' म्हटलेलं मुळीच आवडत नाही आणि शांतामावशींना 'सानिका' म्हणता येत नाही. पण ओढणीचे डाग पाहून 'शानिका' नावाचा राग येण्याचीसुद्धा तिला आठवण राहिली नाही. आई ओरडणार या विचारानेच घाबरून गेली ती. शांता मावशींनी तिच्या गालावरून हात फिरवला. खरखरीत हात. एरव्ही सानिकाने गाल जोरजोरात पुसला असता.

''घाबरू नकोस शानिका. आपण साफ करूया ती ओढणी.'' म्हणून शांतामावशी ओढणी घेऊन बाथरूममध्ये गेल्या. साबणाची वडी लावून ओढणी घासली. बाथरूमच्या दारात उभी राहून सानिका पाहात होती. एक-एक डाग पुसट होत होता, जात होता. मग शांतामावशींनी ओढणी नळाच्या पाण्याखाली धरली. जादू केल्यासारखे सगळे डाग गुल. मग शांतामावशींनी ओढणी नीट झटकून ग्रीलमध्ये सुकत घातली. अजून ऊन होतं. थोडा वाराही होता. आत्ता ओढणी सुकेल. आई यायच्या आधी ओढणी पुन्हा इस्त्रीच्या कपड्यांमध्ये जाऊन बसेल देखील.

शांतामावशींकडे त्या चित्रातल्या परीसारखी जादूची काठी नाही. पण त्यांच्या तर हातांतच जादू आहे. शांतामावशी खरंच परी आहेत. सानिकाची तपकिरी रंगाची परी!

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

व्यक्तिचित्र

# चौधरीचाचा

✶ मेघना उदय झावबा ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

आमच्या ह्यांच्या कंपनीमध्ये एक चौधरी नावाचे गृहस्थ होते. गृहस्थ मोठे हुशार होते. त्यांच्याकडे प्रत्येक अडचणीसाठी काहीना काही उपाय असे.

एकदा असेच झाले. ते त्यांच्या गावाला गेले असता त्यांच्या शेजारी जे वृद्ध जोडपे रहात होते ते रडत रडत आपली कर्मकहाणी ह्यांना सांगू लागले. झाले असे होते की त्या वृद्ध जोडप्याला तीन मुलगे होते. मुलगे शिकलेले होते. एक होता डॉक्टर, एक वकील, तर एक इंजीनीयर. त्या जोडप्यांनी त्यांच्या मुलांना पैसा पुरेसा नसताही कबाडकष्ट करून चांगले शिकून मोठे केले व त्यांची लग्नेही करून दिली. सुनाही मोठ्या शिकलेल्या बघून दिल्या. पण आता ते जोडपे वृद्ध झाल्यामुळे मुलांना आईवडिलांचे ओझे वाटायला लागले; मुले वेगळी राहू लागली. मुलांनी आईवडिलांना पैसे देणेही बंद केले. त्यामुळे त्या जोडप्याचे हाल व्हायला लागले. हे पाहून या आमच्या चौधरीचाचांना त्यांचे हाल बघवेना म्हणून त्यांनी त्यांना एक उपाय सुचवला. त्यांनी त्या जोडप्याला गावातील झाडाच्या पारावर बसून भीक मागायला सांगितले. ते जोडपे पारावर बसून भीक मागू लागले. ही गोष्ट त्यांच्या मुलांना समजली. त्यामुळे त्या मुलांची समाजात बदनामी झाली. प्रत्येक मुलगा त्या जोडप्याजवळ जाऊन त्यांची मनधरणी करून घरी चलण्याची विनंती करू लागला. पण हे जोडपे आपल्या निर्णयावर ठाम होते. ते त्या पारावर रात्रंदिवस राहू लागले. जेव्हा मुलांना कळले की ही आयडीया चौधरी चाचांची आहे तेव्हा त्यांनी त्यांच्याकडे येऊन आपण आईवडिलांना सांभाळायला तयार आहोत. त्यांचा सर्व पैसाअडकापण द्यायला तयार आहोत; पण ही बदनामी थांबवा अशी विनंती; केल्यावर चौधरीचाचांनी त्या जोडप्याला घरी जाण्यास सांगितले व मुलांकडून लिहून घेतले की आम्ही आमच्या आईवडिलांना सांभाळू.

आमच्या चौधरीचाचांची आणखी एक गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. त्यांच्या स्वतःच्या मुलाला अभ्यास न करता सिनेमा, नाटक, चैन करायला खूप आवडू लागले. त्यांनी त्याला एकदा जवळ बोलावले व ते म्हणाले, ''बाळा तू खूप चांगले काम करतोस. तू शाळेत जाऊ नकोस, अभ्यास करू नकोस. काहीही बिघडत नाही. मी तुला पोसीन. तुझ्या सगळ्या गरजा पूर्ण करीन. सिनेमा पाहायला, चैन करायला पैसा देईन, मोठा झाल्यावर तुझे लग्न करून देईन, लग्नानंतर तुला मुले होतील त्यांनाही मीच पोसीन.'' तेव्हा त्यांच्या बायकोने त्यांना विचारले की, ''यामुळे काय होईल?'' तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, ''एक तर मुलगा माझ्यावर अवलंबून राहील, त्याची बायको मुलेही मी जे सांगेन तशी वागतील, घरात याला कोणी विचारणार नाही, कुत्र्याचीही किंमत याला समाजात रहाणार नाही.'' हे ऐकून मुलाचे डोळे तर उघडलेच; पण दुसऱ्या दिवसापासून त्याने जोमाने अभ्यासाला सुरवात केली व आज घडीला तो मुलगा नावारुपाला आला आहे.

असे आहेत चौधरी चाचा आणि त्यांचे उपाय.

✳

कथा

# झाडावरील भूत

**✶ भाऊ पोरे ✶**

बेबीताई गेली दहा ते बारा वर्षे मराठी प्रायमरी शाळेत नोकरी करीत होत्या. बेबी म्हणजे बकुळा शांताराम वळसे. आता मराठी शाळा म्हणजे वर्षा दोन वर्षांनी बदली. तीसुद्धा गावागावात. ह्या वेळेला तासगावात बदली झाली होती. बदली झाली की त्या गावात घर शोधायचे. बरोबर एक दोन बाई असायच्या. या वेळेला भाऊसाहेब यांनी बांधलेल्या शाळेत बदली मिळाली होती. शाळा घरापासून दोन किलोमिटर लांब होती. शाळा सकाळी सात ते दुपारी बारापर्यंत होती. रविवारी इतर मुले सरावाकरता यायची. मुले गप्पा मारताना बोलत होती. 'अरे शांत्या, त्या पारावर भूत आहे का?'' ''हो रे. आई सांगत होती. दुपारच्या वेळेला त्या पाराखालून जाऊ नकोस. म्हणून त्या साईडला जात नाही.'' बेबीताई ऐकत होत्या. त्यांना घाम सुटला. त्या मनात विचार करीत होत्या. हे काय आणि नवीन? ''अरे शांता, कुठला रे पार?'' ''अहो बाई तुम्ही शाळेला जाता मारुतीच्या चौकापुढे.'' ''बापरे मला माहीत नव्हते.'' ''अहो काय करीत नाही. गुपचुप यायचे खाली मान घालून. दुपारी बारा आणि रात्री बारा त्याचा वेळ असतो.'' ''बरे झाले मला सांगितले. आता बेबीताई झाडावर बघत नसे. झाडाखालून पटापटा पाऊले उचलत पाच मिनिटाचा रस्ता; पण भीती वाटायला लागली.

आज रविवार. मुलांचा खेळाचा दिवस. सुट्टी असल्यामुळे बाई वेळ पहात नसे. अर्धा पाऊणतास इकडे तिकडे. इतक्यात ही जोडी आली. बाई म्हणाल्या, ''शांत्या आज उशीर?'' ''नाही बाई क्रिकेट संपवून आलो.'' ''ठीक. बसा.'' जरा वेळ जातो न जातो तोच शांत्या सांगू लागला, ''बाई उद्या आम्ही येणार नाही?'' ''का रे?'' बाई म्हणाल्या. ''अहो उद्या सोमवती अमावस्या असे आई म्हणाली. त्या झाडाखालून जाऊ नकोस म्हणून.'' ''तुम्ही येणार नाहीत पण मला शाळेत जायला हवे ना? नाही गेले तर नोकरी जायची. त्या भूताचे काय जातेय्?'' उद्याचा दिवस; पण बाईंना आता पासून घाम सुटला.

सोमवार सकाळचे आठ वाजले. जागा साफ करणारी मुलगी दमी हाक मारत होती. बाई उठा. उन्हे आली. वाजले बघा किती? आठ. बापरे दमी विचारू लागली, ''रात्री झोप लागली नाही का? घरची आठवण आली?'' ''नाही. भुताची आठवण आली.'' ''पुढे काही बोलू नकोस. आटपायला घे.''

दहा वाजले. बाई शाळेत जाऊ लागल्या. दुपारचे बारा काय; आताच खाली मान घालून झपाझप चालत होत्या. वर्गात आल्या टेबलावर ठेवलेला तांब्या गटागट अर्धा रिकामा केला. वर्गात लक्ष गेले. हजेरी कमी होती. पण त्याला उपाय नव्हता. कसाबसा दिवस भरला. बारा वाजायला आले आहेत. अगोदर जाऊ की उशीरा दोन वाजता जाऊ? हो पण त्या भुताने लिहून दिले नाही दोन वाजल्यानंतर मी नसतो. तो कितीही वेळ थांबू शकतो. देवाचे नाव घेऊ, बाई घरी निघाल्या. जसे

झाड जवळ आले तसे 'राम राम' करीत पटापट जात होत्या. दहा फूट पुढे गेल्यावर कानावर शब्द ऐकू लागले, 'बाई बाई ओ बाई बाई' आज स्वर प्रेमाने बोलावतो असा होता. पण प्रेमाने काय आणि रागाऊन काय; भूत ते भूत. लवकर पाय उचला. एक चप्पल राहिली. राहू दे. उद्या बघू. बाई घरी आल्या. एक संपूर्ण तांब्या रिकामा केला. पंखा लावून खाटेवर आडव्या झाल्या. दमी येऊन विचारू लागली, ''बाई आल्यात,'' ''हो आलो. मेलो नाही.'' ''असे का बोलता?'' ''अगं बोलते काय काय. भूत मला हाक मारत होते.'' ''काय?'' दमी. ''हो गं, पण प्रेमळ आवाज होता.''

आज मंगळवार. भीती कमी झाली होती. बाईंची पूजा झाली. दमी आवराआवर करीत होती. मधेच बोलत होती, ''बाई प्रेमाने बोलले तरी भूतच ना ते? कसेही आवाज काढू शकते.'' यांचे बोलणे सुरू असताना कानावर शब्द पडले, 'बाई.' बाहेरून आवाज येत होता. अगदी तोच भुतासारखा- भूत माझ्या घरापर्यंत पोहचले की काय? नंतर दमीचा आवाज, ''काय रे गंग्या वेड्या, सकाळीच काय पाहिजे?'' ''बाई,'' पुन्हा तोच आवाज.

बाई दरवाज्यात आल्या. ''कोण ग दमी?'' ''हा वेडा गंग्या.'' ''अगं, त्याला वेडा काय म्हणतेस?'' ''बाई तुमची चप्पल,'' गंग्या सांगू लागला, ''काल मी झाडावर बसलो होतो. तुम्हाला हाक मारली. तुम्ही पळाल्या. परत हाक मारली. तुमची चप्पल राहिली. तुम्हाला शाळेत जायला लागेल ना?'' ''बघ दमे, तुझ्यापेक्षा शहाणा आहे. त्याला चहा दे.'' ''बाई देतो. तुम्हाला सांगू का? तो १०वी पास आहे. आईवडील नदीत वाहून जाताना पाहिले आणि वेडा झाला. आणिक काय होणार? त्याला चिडऊ नका. तो चांगला मुलगा आहे. आपण सुधारु. गंग्या उद्यापासून शाळेत ये. मी चांगले कपडे देते. एकदा मला हाक मार, चहा पिऊन हाक मारत पळत सुटला, 'बाई, बाई.' बाईंच्या डोळ्यातून पाणी वाहत होते.

## हास्यचित्र



# The Abnormal Horror

⁎ Armaan Akshay Kothare ⁎
Std: IV Egret School : ( BLUE RIDGE PUBLIC SCHOOL)

In the year 1981, in an unexplored town, where nobody lived, an eerie incident took place.

On a new moon night, a king named John and his entourage, came to explore the town. He decided to stay there for the night and thought of building a castle over there.

At night, the villagers who had come along with the king heard strange sounds. However, they did not pay any attention and slept. In the morning, about 100 villagers were found dead. Who killed them, was the question.

King John and his soldiers went to explore more. Suddenly, they heard a loud cry for help. Help me! My king! Please help me! A roar interrupted the voice. Then, they saw in that direction and could guess the cause of it all. It was a blackish - purple creature with a black fur coat. It had sharp white canines and believe me, they were extremely sharp.

The sight of it was very scary. It disappeared in a second! It looked like a VAMPIRE. The following night, again another 40 odd villagers were found dead. King John had enough of it. He decided to look into the matter himself. Hence, in the night, he stood in a corner to watch who was the culprit. And, as expected, no one turned up. But, he could see some footprints. King John followed the footprints, which led him to a big tower hidden between the bushes, full of cobwebs and bats. Just a solitary candle dimly lit the place. There, he found a secret trap door. He was about to open the door when he heard a vampire screech. He immediately took out his sword but it was too late as the vampire had already bitten him, which turned the king into a vampire. The evil vampire’s name was Sahilare. Soon, it was dawn and as you know vampires cannot bear sunlight. So, the vampires got burnt into ashes, including the king. But, since the leader of the vampires Sahilare was cursed, his turning into ashes made all the vampires back to human beings. Thus, King John named the town as EVILINN. Everybody still remembers this incident as The Abnormal Horror.

(Imaginary Thriller)

व्यक्तिचित्र

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# पुरुषोथ्थमन

★ नंदकुमार कृ. विजयकर ★

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

संध्याकाळचे सहा वाजले होते.टेलिफोनची घंटा खणखणली,मी रिसिव्हर उचलला.पलीकडून काहीच हालचाल होईना. मी फोन ठेवला.परत घंटा वाजली.तोच नंबर होता.हॅलो! कोणीतरी रडल्याचा आवाज येत होता. अरे हा पुरुषोत्तम तर नाही? पुन्हा फोन बंद.बरं मी फोन लावला तर कोणी उत्तर देईना. मला कळेना हा पुरुषोत्तम आजारी तर नाही? का काही अपघात वगैरे.विचार करत होतो इतक्यात ही म्हणाली, ''अहो प्रियाचा सेलफोन लावा.'' मी लगेच संपर्क साधला. पलीकडून प्रियाची मैत्रीण बोलत होती. ''आम्ही नाशिकला आहोत, प्रियाला हॉस्पिटलात ठेवलंय, पुरुषोत्तमला घेऊन ताबडतोब निघा.'' ही प्रिया नाशिकला कधी गेली, तिची एवढी तब्येत काय बिघडली, सगळाच घोळ होता. मला पुरुची काळजी वाटत होती. हा इकडे एकटाच रडत बसला असणार. पुरू अगदी हळव्या मनाचा. सहा सात वर्षापूर्वी प्रियाला एका छोट्याशा ऑपरेशनसाठी नर्सिंगहोममध्ये दाखल केलं होतं. माझी पत्नी बरोबर होती. पण प्रियाला अचानक मायनर कार्डियाक अटॅक आला आणि मोठ्या हॉस्पिटलात नेण्याची वेळ आली. पण पुरू मात्र पार कोलमडून गेला. हिच्याकडे पैसे देऊन लहान मुलासारखा रडू लागला. माझ्या पत्नीला कळेना काय करावं ते. शेवटी पुरुषोत्तमला घरी पाठवून प्रियाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागलं. आता देखील तो असाच कोलमडला असेल. मी प्रवीणला सोबतीला घेऊन पुरुकडे गेलो. आम्हांला पाहून तो थोडा शांत झाला. आम्ही टॅक्सी घेऊन नाशिकला निघालो. निघेपर्यंत ९ वाजले. त्या अंधारात पुरू माझा हात घट्ट पकडून लहान मुलासारखा बसला होता. मला पुरुची पहिली भेट आठवली. पार्ल्याला आम्ही सर्वजण जमलो होतो. खरं म्हणजे प्रियानेच आम्हा सर्वांना बोलावलं होतं. म्हणाली, ''सर्वांना सरप्राईज देणार आहे.'' तिकडेच प्रियाने पुरुषोत्तमची ओळख करून दिली. ''आम्ही एकाच ठिकाणी काम करतो आणि लवकरच लग्न करणार आहोत.'' हे सरप्राईज चांगलंच धक्कादायक होतं. प्रियाचा निर्णय कुणालाच मानवणारा नव्हता. प्रथमदर्शनी ते दोघे एकमेकांना अनुरूप वाटत नव्हते. प्रिया गोरीपान, नाजूक, सुंदर, लहानश्या बांध्याची आणि हा उंच, वर्णाने सावळा आणि मुख्य म्हणजे केरळीय. पुरुने हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला तेव्हा मी अभावितपणे त्याला कोणताच प्रतिसाद दिला नाही. मग पुरुने नाईलाजाने आपला हात मागे घेतला. एवढी वर्षे झाली या गोष्टीला. आज मात्र पुरूच्या हातात माझा हात होता. काही माणसं प्रथमदर्शनी अनाकर्षक वाटतात, दिसायला साधारण आणि त्यांच्याशी काय बोलावं हा प्रश्न पडतो. पुरू असाच साधा आणि सरळ मनाचा, विशेष म्हणजे दुसऱ्याला वेळीच मदत करणारा. प्रियाला त्याच्या ह्याच स्वभावाची भुरळ पडली. तिचा निर्णय आम्हाला प्रथम कुणालाच रुचला नाही. पण 'प्रेम म्हणजे प्रेम असते, बाकी सगळं झूट असते' असाच सगळा मामला होता. आम्ही रात्री २ वाजता नाशिकला पोहोचलो. चार दिवस प्रियाचा जीवनमरणाचा संघर्ष चालू होता. शेवटी सर्व उपाय थकले आणि प्रियाने आम्हा सर्वांचा निरोप घेतला. मैत्रिणीबरोबर सापुताऱ्याला गेली होती. परत येताना वाटेत नाशिकला थांबून तिने वणीच्या देवीचे दर्शन घ्यायचं ठरवलं. तिकडे जाण्याचं आधी ठरलं नव्हतं. पण म्हणतात ना, 'माता का बुलावा आया है' तसलाच काहीसा प्रकार झाला. मोठ्या उत्साहात ती

वर दर्शनाला गेली. दर्शन घेऊन बाहेर आली. तिकडेच चक्कर येऊन पडली. तिच्या मैत्रिणींनी मोठ्या जिकिरीने तिला हॉस्पिटलात दाखल केलं. पुरुवर हा मोठा आघात होता. हमसाहमशी रडू लागला. दोन्ही मुलं परदेशी होती. त्यांना बोलावून घेतलं. ती काही दिवस इकडे राहिली आणि परत आपापल्या गावी गेली. पुरू मात्र एकाकीच राहिला. आपला साथीदार, दोघांपैकी एक आधी जाणार हे ठरलेलं असतं, पण प्रत्यक्ष वेळ येते तेव्हा त्यातून निभावून जाणं फार अवघड असतं. पुरू आणि प्रिया यांचं सहजीवन तसं संघर्षात गेलं. त्यांच्या लग्नाला फारसा विरोध नव्हता. पण मनापासून पसंती नव्हती. पुरूच्या घरचे कोणी नव्हते, आर्थिक बाजू बेताचीच; पण दोघांनी जिद्दीने संसार उभारला. दोन्ही मुलं उच्चशिक्षित होऊन संसार थाटून परदेशी स्थायिक झाली. आयुष्यात मातापित्यांना आणखी काय हवं असतं? सुरुवातीला आम्ही पुरुबरोबर थोडं तुटकपणे वागत होतो. हळूहळू ओळख वाढू लागली आणि ओळख पटू लागली. 'पुरुषोत्तम'चा 'पुरू' कधी झाला हे आमचं आम्हालाच कळलं नाही. पुरू आमचा झाला. कुठलाही सभारंभ असो, लग्नकार्य असो किंवा एखादा घरगुती कार्यक्रम असो पुरू 'नारायणाला लाजवील' अशा जोमाने सगळी कामं करायचा. आम्ही त्याला पुरू म्हणून हाक मारायचो. प्रिया मात्र 'पुरुषोत्तम' म्हणायची. एकदा तो मला म्हणाला, ''चंदू मेरा करेक्ट नाम 'पुरुषोथ्थमन' ऐसा है. पुरुषोत्तम गुजराती हो गया.'' कागदोपत्री आपलं नाव 'पुरुषोथ्थमन' असायला हवं यासाठी तो आग्रही असायचा. आता गम्मत म्हणजे माझं नाव नंदू असून सुरवातीपासून तो मला चंदू म्हणूनच हाक मारायचा. पुरुने एक दिवस फोन करून त्याच्या घरी बोलावून घेतलं. वरच्या मजल्यावर फ्लॅट असल्यामुळे आत पावसाचं पाणी झिरपायचं. तात्पुरता उपाय म्हणून वरून ताडपत्री टाकण्याची त्याची योजना होती. दोन वॉचमन ताडपत्री घेऊन आले. ''चंदू, तू घरपे रेहना, हमलोग उपर जाते है.'' असं म्हणून ते तिघे टेरेसवर गेले. अर्धातास उलटला. अजून वर काय करतात हे पाहायला मी गेलो तर ते दोघे वॉचमन पानतंबाखू खात सावलीत आरामात बसले होते आणि पुरू मात्र भर उन्हात टेरेसच्या बांधावर चढून ताडपत्री टाकत होता. ''पुरू, अरे काय हे? तू कशाला हे करतोयस? त्या दोघांना सांगायचं करायला'' ''चंदू, अरे वो दो बेचारे, कही पैर फिसल गया तो आफत आयेगी. बालबच्चेवाले है.'' पुरुचे हे अजब तर्कशास्त्र. त्याला सर्व लोक बिचारे, गरीब वाटायचे. दूधवाला, नोकरचाकर, इलेक्ट्रिशियन, सुतार कोणीही असो, पुरू सर्वांना सढळ हाती पैसा देणार, जरुरीपेक्षा जास्त. साधा माणूस, सवयीही साध्याच. घरी कधी जेवायला आला तर कितीही पंचपक्वान्न असो त्याच्यासाठी दोन गोष्टींची सोय करून ठेवायची. एक दही आणि दुसर ॲश ट्रे. तो फक्त दही-भात आवडीने खाणार. पण या साध्या सवयीला अखंड धुम्रपानाने छेद जायचा. या गोष्टीपासून प्रियाही त्याला परावृत्त करू शकली नाही. सुरवातीला हा मलादेखील सिगारेट द्यायचा. नको म्हटलं, तर त्याला फार वाईट वाटायचं. समोर कोणीही असो, अगदी कचरेवाला असो का गवंडी असो मोठ्या अदबीने तो त्याला सिगारेट देणार. एवढा चांगला माणूस, पण ह्याबाबतीत कोणी काहीच करू शकत नव्हतो. साधा आणि सरळ मनाचा. घरी जाऊन पहा, लुंगी बनियन चढवून कसली न कसली साफसफाई चालू असायची. त्याचे छंद दोन. स्पोर्टस् चॅनेल आणि मल्याळी सिनेमा. प्रियाच्यामागे हा सैरभैर झाला. मुळात प्रिया गेली हे मानायलाच तयार नव्हता. एकदा असाच त्याला भेटायला गेलो. ''चंदू, अच्छा हुआ तुम आया तो, ये दो चीजोंसे मै परेशान हू. एक 'कुकर' और दुसरा 'वॉकर'-'' मग कळलं, कुकर म्हणजे जेवण बनवणारी बाई. ''अरे ओ आती है, पहिला फॅन चालू करेगी और सोफापर बैठेगी. कितना बार उसे कहा खुर्सिपर बैठो. सोफापर प्रिया है उसे तकलीफ मत देना.'' ''आणि हा वॉकर कोण?'' मी विचारलं. ''वो अपना इव्हिनिंग वॉक पार्टनर. कभीभी देखो 'पुरू आज पेट बराबर नही', पुरू थोडा सर दुखता है','पुरू बस्स, घर जायेंगे' क्या आदमी है. कभी ये नही सोचता, पुरू तू अकेला है कुछ तकलीफ है क्या, तुझे किस काममे मदद् चाहिये क्या, कुछ नही. सिर्फ अपनीही चलाता है.'' मी पुरूला म्हणालो, ''मग तू एकटाच फिरायला का जात नाही?'' ''चंदू, प्रिया बोली अकेले घुमने मत जाना. और ये वॉकर गरीब है बेचारा. बराबर सात

बजे मेरी राह देखता है.'' एक दिवस पुरूचा फोन आला. त्याला लंडन व्हिसासाठी माझी मदत हवी होती. घरी गेलो. सगळी कागदपत्रे व्यवस्थित लावली. व्हिसाऑफिसला त्याच्याबरोबर गेलो. व्हिसा मिळाला आणि पुरुची लंडनला जाण्याची तयारी सुरू झाली. मी सहार एअरपोर्टला त्याच्याबरोबर होतो. टॅक्सीतून आम्ही दोन बॅगा काढल्या. टॅक्सी गेली आणि पुरू मोठ्याने ओरडत टॅक्सीमागून धावत सुटला. बॅगा इकडे, पुरू तिकडे. क्षणभर मी एकाजागीच खिळून होतो.दुसऱ्याच क्षणी मी पुरूला ओढून मागे आणलं. पुरू थरथरत होता. ''चंदू, टॅक्सीमें मेरा हँडबॅग रह गया. उसमे मेरा पासपोर्ट, फॉरेक्स, एअरतिकेट सब था.'' बापरे, आता मीच थरथरायला लागलो. ''पुरू, तो टॅक्सीवाला ओळखीचा आहे कां?'' '' हा, मैने फोन करके बुलाया था.'' ''ठीक, मग फोन करून बोलवून घेऊ या.'' मी त्याचा सेलफोन घेतला. ''चंदू, लँडलाईनसे फोन किया था.'' मग त्याची डायरी पाहिली तर त्यात नंबर नव्हता. ''चंदू, नंबर कॅलेंडरपपर लिखा है.'' पुरूच्या शेजाऱ्याकडे एक किल्ली होती. त्याला फोन करून नंबर मागवून घेतला. अर्ध्या तासाने टॅक्सी आली आणि आतल्या सर्व वस्तूंसह बॅग सुखरूप मिळाली. पुरुने टॅक्सीवाल्याच्या हातावर ५००ची नोट ठेवली. ''गरीब है बेचारा!!'' गेटमधून आत जाण्याआधी पुरुने माझ्या हातात त्याचा सेलफोन ठेवला. म्हणाला, ''चंदू, मेरा फोन थोडा थोडा वापरो.बॅटरी चार्ज करो.टॉकटाईम रिचार्ज करो. नही तो ये नंबर चला जायेगा. लास्ट टाईम फोन बंद करके अमेरिका गया था. आने के बाद जुना नंबर गया और चालू करनेको बहोत झंझट करनी पडी. चलो बाय. फोन युज करना.'' लंडनहून पुरुने दोनतीनदा फोन केला. दरवेळेला चंदू फोन रीचार्ज करो म्हणून आठवण करून द्यायचा. तेथून तो अमेरिकेला मोठ्या मुलाकडे गेला. नातवंडात रमला. त्यादिवशी मी पुण्याला होतो. पंच्याहत्तरीनिमित्त जेष्ठ नागरिक संघातर्फे माझा सत्कार होता. मला पुरुची आठवण झाली. ''चंदू, अगले बरस मै सेवंटीफाईव कम्प्लीट करनेवाला हुं, फिर मेराभी पेन्शन रिस्टोरड होगा.'' मी या विचारात गर्क होतो आणि रोमाचा अमेरिकेहून फोन आला. मी उठून बाहेर आलो.

## वात्रटिका

### निबंध

'मोठेपणी कोण होणार ?' निबंधाचा होता विषय.
बाळूने निबंधात लिहिलं, ''मला मंत्री व्हायचंय.'
बाईंनी विचारलं, ''कारण काय ?''
बाळू म्हणाला, ''सोप्पंय. भाषणं ठोकून, सह्या
ठोकून सारं साध्य होतंय.''

**-डॉ. सुमन नवलकर**

'बाबा' तिचा आवाज रडवेला वाटत होता. ''काय गं, काय झालं?'' '' बाबा,पुरुषोत्तम भावोजी गेले.'' बापरे! आठवड्यापूर्वी आम्ही बोललो होतो. ब्रेनक्लॉट आला, ताबडतोब सर्जरी झाली. पण काही उपयोग झाला नाही. वर्षभराच्या अवधीतच तो प्रियाला भेटायला गेला. पुरूच्या शेवटच्या भागदौडीचा मी साक्षीदार होतो. अनेक आठवणी उफाळून आल्या. अनेक आनंदाचे क्षण आठवले. क्रिकेटचा मोसम सुरू झाला की पुरुचे सारखे फोन यायचे. प्रत्येक फोर आणि सिक्सला फोन ठणठणायचा. ''चंदू, इंडिया जितनेवाली है. अरे उत्तप्पा क्या खेलता है.'' युवीने लागोपाठ सहा सिक्सर मारल्या तेव्हा तर पुरुने हलकल्लोळ केला. माझ्या विनोदाला खळाळून दाद देणारा एकमेव प्राणी म्हणजे पुरू. तो असा फोनवर खिदळायला लागला की प्रिया ओळखायची, पुरू माझ्याबरोबर बोलतोय म्हणून. पुरू माझा मित्र, पुरू माझा सखा, पुरू माझा सोबती. त्याच्या असंख्य आठवणी डोक्यात पिंगा घालू लागल्या. माझ्या हातात पुरूचा सेलफोन होता. मोठ्या विश्वासाने तो माझ्याकडे सुपूर्द केला होता. मी सेलफोनकडे पाहत होतो. पाहाता पाहता डोळे भरून आले. ' अरे यार पुरू, तुझे इतनी क्या जल्दी थी? तू बार बार तेरे सेलफोनका जिक्र करता रहा और मै तुझे बार बार समझाता रहा, पुरू फोनकी फिक्र मत कर. मै उसका अच्छी तरहसे खयाल रखता हू. पुरू तुझे नंबर जानेकी चिंता थी, पर यार तूही चल बसा. अब इस खोखले फोनका मै क्या करू? ना रहा नंबर ना तू, पीछे रह गयी सिर्फ यादे.

*

लेख

# While Away From Mother Land...

**✶ Achala Desai ✶**

Celebrating ''Mother's Day'' in Auckland - New Zealand. The big day was scheduled for 9th of May but the preparations started way ahead. Big posters, great discounts, beautiful gift hampers and much more was displayed all over. The whole of the city and the suburbs wore a festive look as though there was a big festival round the corner.

The local newspaper had a story of a kiwi family who lost their mother six months back but all the same were fully geared up to celebrate mother's Day in her Memory! This lady had eleven children who in turn had a big brood of young ones and of course they two had their offsprings by now. this huge family now scattered all over, were to meet over breakfast on the 9th of May to celebrate Mother's Day, in memory of their late mother - grandmother and great grandmother. A wonderful tribute to the departed soul who must have really toiled to put such a huge family in place!

Sometimes I wonder why do we celebrate just one day in the whole calendar as Mother's Day? Isn't every day Her Day? We say that the world we live in belongs to Mother Earth or Dharti Mata. We say that the country where we are born is our motherland or Bharat Mata. It is because of this Dharti and her abundant nature, that mankind has survived; it is at her mercy that we thrive. Just a shiver of an earthquake or a vomit of a volcano or about of dehydration can leave this mother's brood of mankind lost to adverse conditions. On the other hand, in her youthful and progressive endevours, this Mother Earth and Mother Nature have brought up the whole of mankind as one big family. Don't we owe any obeisance to this Mother who has given us so much? Ofcourse we do! Let's get to work then!

I feel, every day of the calendar is Mother's Day. Every mother or a Mother figure is the pirot of the family. The essence of life rotates around her, she is the caretaker of all the members of the family in more than a hundred ways. She is there for you physically, mentally and emotionally. She is the mother we perceive after the abstract figure of Mother Earth. A Mother is addressed differently as Aai, Maa, Baa, Avaa, Mummy, Mom, Amma etc. but the feeling in that address in universal. It is one person with the same character - that of love, caring and patient bearing. A Mother always walks along with her children in life and death - this cannot be explained but one must experience it.

The least we can do is give due respect to mother and hurt her in the least possible way. let us remember that it is because of mother that we are here today and are able to enjoy the wonderful creation of the Almighty. Let us pray that every mother gets the strength and courage to bring up good human beings in order to make the world a better place to live in and thereby relieve Mother Earth of this burden.

From one Mother to all the Mother Figures - Wish you Happy Mother's Day - today and everyday!

**वात्रटिका**

**चिक्की**

एक आहे ठकी
तिने खाल्ली चिकी
म्हणे कशी, ''खायचं आता
काही नाही बाकी.''

**-डॉ. सुमन नवलकर**

# पूर्वांचल सप्तभगिनी

## (North East India - Seven Sisters)

**✶ अपर्णा उदय कीर्तिकर. ✶**

भारत देशात उगवत्या सूर्याचे प्रथम किरण 'पूर्वेचा आंचल' असलेल्या पूर्वांचलच्या भूमीवर पडतात.

श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी अरुणाचलची, भीमाची पत्नी हिडिंबा नागालँडची, अर्जुनाची पत्नी उलुपी आणि इरावती या नागभूमीच्या तर; प्रमिला आणि चित्रांगदा मणिपुरच्या. अशा महाभारत कालापासून परिचित असलेल्या या प्रदेशात निसर्ग, वन्यजीवन, अमाप जलसंपदा, उत्सव, भाषा, चालीरीती यांच्या वैविध्याचा मनोहर संगम आपल्याला येथे पहावयास मिळतो. संपूर्ण पूर्वांचलमध्ये १५०-२०० पेक्षाही अधिक जातीजमाती असून प्रत्येक जमातीची भाषा वेगळी, घरे वेगळी, पोषाख वेगळे आकर्षक आणि बहुरंगी आहेत.

१९४७ साली भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा या भूभागावर आसाम हे मोठे राज्य व मणिपूर आणि त्रिपुरा ही दोन छोटी संस्थाने होती. पुढे हळुहळू आसामच्या मोठ्या भूभागाचे वेगवेगळ्या राज्यात रुपांतर करण्यात आले. या सर्वांचा उल्लेख कौतुकाने 'सप्त भगिनी' म्हणून करण्यात येतो. खरोखरच ही एकमेकाला बिलगून असलेली राज्ये बघितल्यावर एकमेकींच्या आधाराने कोंडाळं करून बसलेल्या बहिणींचं चित्रच डोळ्यासमोर येतं.

पूर्वांचलच्या डोंगर उतारावर भरपूर पावसामुळे मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जाते. सर्वत्र पसरलेल्या जलाशयामुळे मासे भरपूर. त्यामुळे भात व मासे त्यांचे प्रमुख अन्न.

पूर्वांचलची जमीन बांबुच्या बनांनी समृद्ध आहे. विविध प्रकारचे बांबू, लहान-मोठे, जाड-बारीक येथे उगवतात. घरे बांधण्यासाठी, पाणी भरण्यासाठी, अन्न शिजविण्यासाठी, भाजी करण्यासाठी, घरे सजविण्यासाठी सर्वत्र बांबुचा वापर कल्पकतेने केलेला आढळतो. बांबुच्या गवतापासून विविध अलंकार केले जातात.

पाचूसारखे हिरवेगार लांबलचक गालीच्यासारखे पसरलेले चहाचे मळे म्हणजे पूर्वांचलच्या सौंदर्याला 'चार चाँद'.

शाळेत भूगोल शिकताना 'ब्रम्हपुत्रेला आसामचे अश्रू म्हणतात.' ब्रम्हपुत्रा नदी नसून 'नद' आहे. फक्त आसाममध्ये एकशिंगी गेंडे आढळतात.आसाममध्ये चहाचे मळे आढळतात. 'भारतात (तेव्हा) फक्त आसाममध्येच खनीज तेल आढळते, अशी माहिती मिळाली होती. नंतर नॅशनल जिऑग्राफी व ॲनिमल प्लॅनेटवर तेथील वन्यजीवन व वन्यप्राणी यांची माहिती मिळाल्याने, आपल्या भारताचाच एक भाग असलेल्या पण मुख्य भूमीपासून थोडा तुटलेला असा हा प्रदेश पाहाण्याची उत्सुकता होती. त्यामुळे मी या सहलीत सहभागी झाले.

तेथे जाण्यासाठी विमानाने एकंदर ७-७।। तासांचा प्रवास करून प्रथम कोलकाता व नंतर अगरतळा येथे गेलो. अतिपूर्वेकडील प्रदेश असल्याने तेथे सूर्योदय व सूर्यास्त लवकर होतो, त्याचा अनुभव पहिल्याच दिवशी आला. संध्याकाळचे ५ वाजले होते पण सर्वत्र अंधार झाला होता. फेब्रुवारी महिना असल्याने रात्री थोडी थंडी जाणवली.

'त्रिपुरा'ची राजधानी असलेले अगरतळा हे ईशान्य भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. येथील मुख्य आकर्षण म्हणजे एका तलावाच्या काठावर सुमारे ८०० एकर परिसरात पसरलेला 'उज्जयंता पॅलेस'. त्रिपुराच्या भूतपूर्व

राजवाड्याचे आता म्युझियम केले आहे. त्या दिवशी ते बंद असल्याने आम्ही तो लांबूनच पाहिला. दुमजली वाड्याचे तीन भव्य घुमट अतिशय आकर्षक दिसत होते.

भारत व बांगलादेशच्या सीमेवर असलेले 'कमला सागर' तलाव व काठावरील 'कसबेश्वरी काली मातेचे' मंदिर पहाण्यासारखे आहे. तळ्यातील पांढऱ्या गुलाबी कमळांमुळे कमलासागर. तलावाच्या तीन बाजुंना बांगला देशची सीमा असून एका बाजूस भारताची सीमा आहे. सीमेवर साधे तारेचे कुंपण असून बांगलादेशातील हिंदू सर्रास देवीच्या दर्शनासाठी मंदिरात येतात. आम्ही तेथे असताना बांगलादेशातील मालगाडी, तेथून जाताना दिसली.

अगरतळा येथील Sepanijala Wildlife Sanctuary म्हणजे अभयारण्य नसून केवळ प्राणीसंग्रहालय (झू) आहे. काळे अस्वल, बंगाली वाघ, बिबळ्या, पाणघोडे, माकडे, लंगूर तेथे पहाण्यास मिळाले.

आगरतळापासून सुमारे ५० कि.मी. वर 'रुद्रसागर' हा शांत निळसर, खूप मोठा तलाव असून त्यात 'नीर महाल' हा तेथील राजाचा उन्हाळी 'जल महाल' आहे. तो पहाण्यासाठी स्पीड बोटीने तेथपर्यंत जाता येते. शुभ्र रंगाचा हा जलमहाल म्हणजे हिंदु व मुघल स्थापत्याचा सुंदर मिलाफ असून सुंदरता व ऐश्वर्य यांचे ते प्रतीक आहे.

आगरतळापासून सुमारे ६ कि.मी. अंतरावरील Border Gul Chhakkar येथील भारत व बांगलादेश सरहद्दीवर Change of Guard पहाण्यासाठी संध्याकाळी दोन्ही देशातील पर्यटकांची गर्दी असते. बरोबर सं. ४.४५ वाजता सीमा सुरक्षा दलाचे गार्डस बिगुल वाजवून आपआपल्या ध्वजाला वंदन करून कवायत करून मानवंदना देऊन ध्वज उतरवतात. हा सुमारे १५ मिनिटे चालणारा सोहळा बघण्यासारखा असतो.

आगरतळा (त्रिपुरा) येथून 'मिझोराम'ची राजधानी 'ऐझॉल (Aizawl) येथे जाण्यासाठी आसाममधील सिल्चर मार्गे जावे लागते. हे अंतर सुमारे ३१७ कि.मी. असून सबंध दिवस प्रवासातच जाणार होता. त्रिपुरा व आसामचा सीमेवरील सुमारे १० कि.मी.चा रस्ता डोंगराळ असून वळणावळणाचे रस्ते अतिशय खराब अवस्थेत होते. शरीराची सर्व हाडे खिळखिळी करणारा हा प्रवास कसाबसा संपवून रात्री ८.३० वाजता सिल्चरला पोहोचलो. दुसरे दिवशी सकाळी १८० कि.मी अंतरावर असलेल्या एझॉलसाठी परत दिवसभराचा प्रवास करून सं. ५.०० वाजता ऐझॉलला पोहोचलो. मिझोराममध्ये प्रवेश करण्यासाठी Inner Line Pass लागतो.

सप्त भगिनीपैकी सगळ्यात दक्षिणेकडील राज्य म्हणजे मिझोराम. येथे प्रामुख्याने ख्रिस्ती धर्म असला तरी तेथील स्थानिक नेपाळी हिंदु कुटुंबांनी एका छोट्याशा टेकडीवर एक सुंदर शिवमंदिर बांधलेले आहे. आज महाशिवरात्र असल्याने प्रथम शिवदर्शन घेतले.

ऐझॉलमधील ताजमहाल म्हणजे K.V. Paradise एका उद्योजकाने आपल्या पत्नीच्या अपघाती निधनानंतर तिच्या स्मरणार्थ उभारलेले एका टेकडीवरचे पांढऱ्या दगडातले स्मारक.

मिझोराममध्ये सर्वत्र मिझो भाषाच बोलली जाते. पण त्या भाषेला स्वत:ची लिपी नसल्याने इंग्रजांनी त्यांना आपली रोमन लिपी दिली. त्यामुळे त्यांचे वर्तमानपत्र इंग्रजीत असले तरी आपण वाचू शकत नाही, कारण त्याची भाषा मिझो असते. (जसे काही वेळा आपण रोमन लिपीत मराठी भाषा लिहितो.) शहरातील एका भागात मुख्य रस्त्यावरच समोरासमोर, जवळजवळ मिझोरामची असेंब्ली, मंत्रालय, राजभवन व इतर खाती असलेल्या इमारती आहेत. आपल्या फोर्टमधील सर्वसाधारण कार्यालयांसारख्याच यांच्या इमारती असून फारसा बंदोबस्तही कोठे आढळला नाही.

तेथून जवळच त्यांचा दिवंगत नेता सुप्रसिद्ध लाल डेंगा ह्या शहिदाचे स्मारक असून बाजुलाच युद्धात शहीद झालेल्यांचे स्मारक आहे. त्या हुतात्मा स्मारकावर कोरलेले वचन वाचून मन भारावले. ते वचन असे. "When you go home, tell them of us and say, for your tomorrow, we gave our today."

येथून जवळच सुमारे ७ फूट व्यासाचा खूप मोठा ढोल असून पूर्वी डोंगरदऱ्यात वसलेल्या या गावांना वर्दी देण्यासाठी त्याचा वापर केला जाई.

मिझोराम अतिशय स्वच्छ, शिस्तप्रिय व नीटनेटके आहे. घरे बांबुची पण व्यवस्थित बांधलेली असून खिडक्या काचेच्या व त्यांना सर्वत्र पांढरे शुभ्र

जाळीदार नक्षीचे लेसचे पडदे लावलेले आढळतात. येथे रहदारीचे नियम काटेकोरपणे पाळले जातात.

ऐझॉलमधून कर्कवृत्ताची रेषा जात असून डोंगराळ प्रदेशामुळे हवामान आल्हाददायक असते. मिझोरामचे 'बांबू नृत्य' प्रसिद्ध असून पारंपारिक पोषाख घालून स्त्री-पुरुष एकत्रच ते नृत्य करतात.

ऐझॉल ते मणिपूरमधील इम्फाळ हे अंतर खूप असल्याने आम्ही हवाईमार्गे इम्फाळला गेलो. त्यासाठी आधी सुमारे ३ तास रस्त्याने प्रवास करून विमानतळ व अर्ध्या तासाच्या हवाई प्रवासानंतर इम्फाळला पोहोचलो.

मणिपूर म्हटले म्हणजे मोठा फुगीर घागरा घालून केलेले मणिपुरी नृत्य व आझाद हिंद सेना आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आठवण येते. तसेच आधुनिक काळात ते प्रसिद्ध आहे ते जागतिक मुष्टीयुद्धपटू मेरी कोमचे राज्य म्हणून.

मणिपूर हे संपूर्ण राज्य जरी पर्वतमय असले तरी राजधानी इम्फाळ मात्र खोऱ्यात वसलेले आहे. मणिपूरमध्ये आपल्याला पारंपारिक आणि थोडा आधुनिक संस्कृतीचा संगम झालेला दिसतो.

मणिपूरमध्ये स्त्रीप्रधान संस्कृती आढळते. स्त्री शक्तीचा अनुभव देणारे येथील प्रमुख ठिकाण म्हणजे ५० वर्षांहून अधिक जुने असलेले 'इमा बझार'. तीन हजारांहून अधिक स्टॉल्स असलेले हे मार्केट फक्त स्त्रियाच चालवतात. दोन भागात असलेल्या या मार्केटमध्ये एका भागात भाजीपाला, फळे, मासे मिळतात तर दुसऱ्या भागात स्त्रियांनीच हातमागावर घरीच विणलेल्या चादरी, शाली, पांघरुणे, पारंपारीक कपडे, अलंकार, पूजा, साहित्य व सजावटीच्या इतर वस्तू मिळतात.(आम्ही तेथे असतानाच जवळ दोन बॉम्बस्फोट झाले व सर्वत्र पळापळ झाली. हे दृश्य तेथील नेहमीचेच आहे.)

भारतीय स्वातंत्र्य युद्धाच्या दृष्टीने इम्फाळ हे शहर महत्त्वाचे आहे. येथील रेड हिल भागात दुसऱ्या महायुद्धकालात ब्रिटिश सैन्याचे आझाद हिंद सेना व जपानी सेनेशी घनघोर युद्ध झाले होते. या ठिकाणी भारतातर्फे व जपानतर्फे दोन वेगवेगळी 'शांती स्मारके' (पीस मेमोरीयल) उभारलेली आहेत.

इम्फाळपासून सुमारे ४५ कि.मी. अंतरावर मोईरांग हे ऐतिहासिक महत्त्वाचे स्थळ आहे. १४ एप्रिल १९४४ रोजी इंडियन नॅशनल आर्मीने प्रथमच भारताचा तिरंगा या पवित्र मातीत फडकावला. (आम्ही तेथे राष्ट्रगीत म्हणून त्याला मानवंदना दिली) नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याच नेतृत्वाखाली आझाद हिंद सेनेने स्वातंत्र्याच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. तेथेच INA war memorial हे म्युझियम व नेताजींचे स्मारक उभारण्यात आले

## दुःख / सुख

दुःखाची आणि सुखाची
लागली एकदा चुरस
श्रेष्टत्व सिद्ध करण्याची
जुगलबंदी सरस।।१।।

'माझ्यामुळे देव आठवतो'
असे म्हणतो दुःख।
'तो तर माझ्याबरोबरच असतो
असे म्हणतो सुख।।२।।

'माझ्यामुळे सहनशील बनतात'
असे म्हणतो दुःख
'त्याची मला गरजच नाही'
असे म्हणतो सुख।।३।।

'खरे हितचिंतक मी दाखवतो'
असे म्हणतो दुःख।
'माझ्यासाठी सर्वच मित्र,
असे म्हणतो सुख।।४।।

दुःखास पाहुन हिरमुसलेला
देव प्रगटतो।
'बाळांनो मला दोघेही सारखे'
सांगुन त्यांना समजावतो।।५।।

फक्त दुःख दिले, तर मानव कोलमडेल
फक्त सुख दिले, तर त्याला माज चढेल।
म्हणूनच आलटुन पालटुन दोघांना मी वाटतो
मानव पचवु शकेल इतकेच प्रमाण ठेवतो।।६।।

**-तन्वी विजयकर**

आहे. ते पहाताना आझाद हिंद सेनेचा स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास नजरेसमारे उभा राहिला.

मोईरांगपासून जवळच मणिपूरच्या मुकुटातला नीलमणी शोभावं असे ''लोकट सरोवर'' (Loktak Lake) आहे. सुमारे २२ चौ. कि.मी. पसरलेल्या ह्या सरोवराच्या निळ्याशार पाण्यात हिरवीगार तरंगती शेती केली जाते. वाऱ्याबरोबर हलणारी शेती पाहून मजा वाटते. ईशान्य भारतातील हे सर्वात मोठे गोड्या पाण्याचे सरोवर आहे.

इम्फाळमध्ये सुमारे एक हजार वर्ष जुने असे दोन सोनेरी कळस असलेले 'श्री गोविंदजी मंदिर' हे सुंदर मंदिर आहे. मुख्य गाभाऱ्यात राधाकृष्णाची रासक्रीडा करणारी सुंदर मूर्ती असून डाव्या बाजुच्या गाभाऱ्यात बलराम-कृष्णाची तर उजव्या गाभाऱ्यात बलराम, जगन्नाथ (कृष्ण) व सुभद्रेच्या पुरीच्या मंदिरातील सुंदर प्रतिकृती आहेत.

यानंतरचा प्रवास 'नागालँड'च्या दिशेने. नागालँड म्हणजे महाभारतातील 'नागभूमी' १९६३ मध्ये नागालँड भारताचे १६ वे राज्य म्हणून घोषित करण्यात आले. ईशान्य भारतातील हे सर्वात लहान राज्य असून कोहिमा ही राजधानी समुद्रसपाटीपासून १४४४.१२ मी. उंचीवर असल्याने थंड हवेचे ठिकाणी आहे. दिमापूर हे महत्त्वाचे मोठे गाव आहे.

हा संपूर्ण प्रदेश पहाडी (Naga Hills) असून येथे भरपूर जंगले व वन्यपशू आहेत. नागांमध्ये ३२ जनजाती आहेत. नागालँड सरकारने एका डोंगरावर विविध नागा जमातींची घरे तयार करून एक गावच उभे केलेले आहे. Naga Heritage Village तेथे प्रत्यक्षात कोणीही राहात नसून दरवर्षी होणाऱ्या Horn bill Festival मध्ये सर्व जमातींचे लोक तेथे येऊन आपआपल्या संस्कृतीचे दर्शन पर्यटकांना घडवतात. प्रत्येक जमातीचे घर वैशिष्ट्यपूर्ण असून उतरत्या छपराच्या बांबुच्या या घरांच्या प्रवेशद्वारावर सूर्य, चंद्र, नाग, अजगर, मगर, ड्रॅगन, मासे, वन्यपशू-पक्षी ३० चे सुंदर कोरीवकाम केलेले आढळते.

दुसऱ्या महायुद्धात जे ब्रिटीश सैन्य व भारतीय सैनिक येथे शहीद झाले त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ येथे The war cemetery उभारण्यात आलेली आहे. हे हुतात्मा स्मारक एका टेकडीवर सात पातळ्यांवर असून इंग्रज व मुस्लिम शहिदांची थडगी असून प्रत्येकावर त्यांच्या धर्माचा सुविचार, त्यांचे नाव, गाव कोरलेले आहे. ज्या हिंदुंच्या अस्थिंचे दफन करण्यात आले त्यावर गीतेतील सुविचार लिहिलेले आहेत. फुलझाडे व हिरवळ लावून तेथे सुंदर उद्यान करण्यात आले आहे. सर्वात वरच्या पातळीवर इतर शहीद जवानांचा एक मोठा नामफलक असून त्यात काही मराठी जवानांची नावे आढळल्याने उर अभिमानाने भरून आला.

Naga Art and craft Museum मध्ये नागा जमातीं कपडे, भांडी, दागिने, शस्त्रे यांचे सुंदर नेटके असे वस्तुसंग्रहालय पहाण्यासारखे आहे.

येथून दिमापूरमार्गे आसाममध्ये प्रवेश करून रात्री काझीरंगा अभयारण्याजवळील रिसॉर्टवर पोहोचलो. ४३० चौ. कि.मी. परिसरात परसलेल्या त्या 'काझीरंगा राष्ट्रीय उद्यानाला जागतिक वारसा यादीत world Heritage list स्थान मिळाले आहे. हे राष्ट्रीय उद्यान एक शिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असून त्यासोबत वाघ, हत्ती, पाणम्हशी, हरणे, बंगाली वाघ, रानरेडे, गवे, अजगर, विविध कासवे, ससे, मुंगुस, बंगाली कोल्हे देखील येथे आढळतात. नोव्हेंबर-डिसेंबरच्या सुमारास पाणवठ्याच्या काठावर स्थलांतरीत पक्षीदेखील आढळतात. येथे हत्ती, जीप अगर मिनिबसने सफारी करता येते.

आम्ही पहाटे लवकर उठून अभयारण्याच्या पश्चिम भागात हत्तीवरून सफारी केली. काझीरंगाच्या उंच उंच गवताने भरलेल्या कुरणामध्ये हत्तीच्या पाठीवर बसून डुलत डुलत फेरी मारत गेंडे व हरणे बघण्याचा अनुभव संस्मरणीय होता. आसपासचा प्रदेश सपाट व सकाळची वेळ यामुळे सूर्योदयाचे मनोहरी दर्शनही झाले.

आम्ही परत संध्याकाळी ऐच्छिक जीप सफारी केली. आता अभयारण्याच्या मध्य भागात जीपने फिरलो. तेव्हा परत एकशिंगी, गेंडे, रानटी हत्ती, सांबर, हरिणे, रानडुक्कर, जंगली म्हशी, घोरपड व संध्याकाळ असल्याने परतलेले असंख्य स्थानिक व स्थलांतरीत पक्षी पहावयास मिळाले. रात्री सुप्रसिद्ध स्थानिक 'बिहु' नृत्याचा आस्वाद घेतला

दुसऱ्या दिवशी तेजपूरला जाण्यासाठी निघालो. 'आसाममध्ये' ब्रम्हपुत्रेच्या उत्तर काठावर हे शहर बसले असून तेथे जाण्यासाठी आम्हाला ब्रम्हपुत्रेचे विशाल पात्र पार करून जावे लागले. त्यासाठी

Kaliabhomora हा एकमेव पूल असून तो सुमारे ३ कि.मी. लांब आहे. ब्रम्हपुत्रेच्या काठावर एका डोंगरावर महाभारतकालीन 'अग्नीगृह' असून आसाम सरकारने या ठिकाणी अनिरुद्ध-उषा यांच्या पुराणकथेतील प्रेम कथेवर आधारीत सुंदर म्युरल्स व लँडस्केपींग केले आहे. येथून ब्रम्हपुत्रेच्या विशाल पात्राचे विहंगम दृश्य दिसते.

ब्रम्हपुत्रा! जगातील पाचव्या क्रमांकाची, भारतातील प्रथम क्रमांकाची मोठी नदी-नव्हे नद! मानसरोवरात उगम पावलेल्या या नदीला पुढे सांगपो नदी मिळते. त्याचां संयुक्त प्रवाह पुढे भारतातून वहात जाऊन पद्मा नावाने बांगला देशातून वहात जाऊन बंगालच्या उपसागरात समर्पित होतो. म्हणजे जन्म तिबेटमध्ये, तारुण्य भारतात तर; विलीन होणे बांगला देशात. ब्रम्हपुत्रेचे पात्र इतके मोठे व रुंद आहे की त्याचे दोन्ही किनारे एकदम असे दिसतच नाहीत. या तिच्या विशाल पात्रात अनेक मोठी बेटे तयार झाली असून तिच्या आसपासच्या शेकडो मैलांचा परिसर घनदाट जंगलांनी व्यापलेला असून त्यात वन्यपशू पक्षी मुक्तपणे विहरत असतात.

तेजपूरहून आम्ही 'अरुणाचलची' राजधानी ईटानगर येथे जाण्यास निघालो. त्यासाठी लागणारे Inner line pass आम्हाला सं.५ च्या सुमारास मिळाल्यानंतर सर्वानुमते लगेचच ईटानगरसाठी प्रयाण केले. २१० कि.मी.चा खडतर प्रवास करून रात्री १२.०० वाजता ईटानगरला पोहोचलो.

अरुणाचल ही उगवत्या सूर्याची भूमी आहे. भारतातील उगवत्या किरणांचा प्रथम स्पर्श होणारी ही भूमी. उष:काली सूर्य जेव्हा सात घोड्यांच्या रथामधून भारतमातेकडे येतो तेव्हा तिला प्रथम दर्शन सूर्याचा सारथी 'अरुण' ह्याचे होते. जो प्रदेश अरुणाला प्रथम पहातो तो अरुणाचल.

१९८७ साली चोविसावे राज्य म्हणून अरुणाचल घोषित झाले. पूर्वी ह्या भागाला नेफा North East Frontiar Agency असे म्हणत असत. सप्तभगिनींमध्ये हे सर्वात मोठे राज्य असून ईटानगर ही त्याची राजधानी. हिमालयाच्या पायथ्याशी हे राज्य असून उत्तुंग पर्वत, घनदाट जंगल, बर्फाच्छादित पर्वत यांना व्याप्त ह्या प्रदेशाला अमाप जलसंपदा लाभलेली आहे. प्रदेश खनिजतेल, कोळसा, चहा-कॉफी, लाकूड आणि बांबूने समृद्ध आहे.

राजधानीच्या शहराजवळ बौद्धधर्मीय संस्कृतीचे एक केंद्र असून त्यात सिद्धार्थ विहार व बाजूलाच बोधी वृक्ष आहे. येथील Gamgu Lake पहाण्यासारखा आहे.

ईटानगरहून तेजपूरला परत जाऊन २८० कि.मी. अंतर पार करून 'मेघालय'ची राजधानी शिलाँग येथे गेलो. १९७० ते ८० च्या दशकात आसामचे विभाजन होऊन जी सात राज्ये झाली त्यातील मेघालयाची निर्मिती सर्वात शेवटी झाली. त्यामुळे सप्तभगिनीपैकी हे राज्य सर्वात तरुण आहे असे म्हणता येईल. गारो, खाँसी, जैतिया (जयंत्या) टेकड्यांनी हे राज्य व्यापलेले आहे.

## पामर

पुंडलिका भेटी
परब्रह्म आले
माझिया साठी
विश्वरूप झाले

फेकियली वीट
राहिला तो उभा
काम करी नीट
लावियला हेका

पुंडलिकाचा हात
पाय चुरू लागे
मस्तकीचा हात
मज थांबवू पाहे

भक्त थोर त्याची
उरली ती कीर्ति
मी पामर माझी
कुंठली ही मती

**-कल्पना सुभाष कोठारे**

डोंगर टेकड्यांनी दऱ्याखोऱ्यांनी वेढलेले, हिरव्या श्रीमंतीचा अभिमान बाळगणारे राज्य म्हणजे मेघालय. मेघांचे आलय ते मेघालय. सदैव मेघांनी वेढलेले ते मेघालय. गारो, खाँसी आणि जैतिया टेकड्यांनी विणलेला त्रिकोणी गोफ म्हणजे मेघालय.

खाँसी टेकड्यांमधील शिलाँग ही मेघालयाची राजाधानी पर्यटकांचे आवडते थंड हवेचे ठिकाण आहे. ब्रिटिशकालीन रस्ते, इमारती, चर्चेस व्हिक्टोरियन काळाची आठवण करून देतात. शिलाँगला पूर्वेकडील 'स्कॉटलंड' असेही म्हणतात.

येथील shilong Peak वरून शिलाँग व आसपासच्या परिसराचे विहंगम दृश्य दिसते. येथे खरेदीची उत्तम सोय असून बांबू व चटयांपासून विणलेल्या बॅग्ज, हातामागावर विणलेल्या शाली, स्टॉल्स इ. वस्तू विक्रीस असतात. तसेच खास तेथील जमातींचा नखशिखान्त पोशाख करून फोटो काढून घेण्याचा आनंद पर्यटकांना मिळतो.

शिलाँग येथील Elephant Fall हा तीन पातळ्यांवर असलेला धबधबा पहाण्यासारखा असून फोटो काढण्यासाठी (विशेषत: सेल्फी) चांगले ठिकाण आहे. तिसऱ्या पातळीवरील धबधबा पहाण्यासाठी पायऱ्यांवरून डोंगर उतरून खाली जावे लागते व तेवढेच परत वर चढून यावे लागते.

शिलाँगमधील Don Bosco Museum सुंदर प्रवेशद्वार असलेले म्युझियम आतून अतिशय अप्रतिम आहे. सात मजली म्युझियम पहाण्यासाठी आपण प्रथम लिफ्टने सर्वात वरच्या मजल्यावर जातो व पहात पहात जिन्याने खाली उतरतो. सर्वात वरच्या मजल्यावरील स्काय वॉकवरून शिलाँगचे चहुबाजुंनी विहंगम दृश्य दिसते.

या म्युझियममध्ये संपूर्ण ईशान्य भारताची राज्य निहाय भौगोलिक माहिती, तेथील विविध जमातींचे राहणीमान, त्यांचे पोशाख, वाद्ये यांची दृकश्राव्य माहिती आपल्याला मिळते.

शिलाँगपासून ५० कि.मी. वर चेरापुंजी हे वार्षिक ५०० पाऊस पडणारे, जगातील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण आहे. निळाईने व्याप्त नभ, हिरव्या शालूतले डोंगर, त्यावर मनमुराद बागडणारे ढग, थोड्याशा वाऱ्याच्या धक्क्याने दरीतून वर येणारे आणि अधांतरी वहाणारे ढग हे विलोभनीय दृश्य येथे दृष्टीस पडते. तेथील एका कड्यावर दर्शन गॅलरी Viewing gallary असून दरीत उजव्या हाताला Nohklikai Falls हा एक मोठा धबधब्यांचा समूह आहे. परन्तु दरीतून सतत तरंगत वर येणाऱ्या ढगांमुळे तो धबधबा आपल्याशी सतत लपंडाव खेळत असतो.

चेरापुंजी जवळच पहाडात लपलेल्या लवणस्तंभाच्या Limestone deposits गुंफा आढळतात. त्या पाहण्यासाठी कधी सरळ, कधी वाकून, तर कधी गुडघ्यावर चालत जावे लागते.

शिलाँगवरून सुमारे ९० कि.मी.वर गुवाहाटी हे आसामचे धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक राजधानीचे शहर आहे. (दिसपूर ही आसामची राजकीय राजधानी) येथून सुमारे ८ कि.मी.वरील 'नीलांचल' या पर्वतावर 'कामाख्या देवीचे' मंदिर आहे. वरपर्यंत बसने जाता येते. या मंदिरात प्रत्यक्ष देवीची मूर्ती नसल्याने मुखदर्शन घेता येत नाही पण गाभाऱ्यात असलेल्या एका खळग्यात हात घालून स्पर्शदर्शन अनुभवता येते. (आपल्या गोकर्ण महाबळेश्वर सारखे) येथे भाविकांची प्रचंड गर्दी असून शिस्तीने रांगेतून दर्शन घेण्यासाठी ६-७ तासांचा कालावधी लागतो. (तिरुपती प्रमाणे) म्हणून आम्ही कळसदर्शनच घेतले. हे मंदिर तंत्रविद्येसाठी प्रसिद्ध असून अजूनही 'पशू बळींची' प्रथा इथे चालू आहे.

गुवाहाटी शहराबाहेर एका मोठ्या मोकळ्या परिसरात बालाजीचे व इतर देवतांचे दाक्षिणात्य बांधणीची पण पांढऱ्या दगडात बांदलेली मंदिरे पाहाण्यासारखी आहेत. सभोवती सुंदर उद्यान असून विविध रंगाच्या फुलझाडांनी बहरलेल्या पार्श्वभूमीवर पांढरी शुभ्र मंदिरे प्रेक्षणीय दिसतात.

गुवाहाटीमधील 'पान बझार' हे मार्केट आपल्या रानडे रोड किंवा पुण्यातील लक्ष्मी रोड सारखे आसामी कापडासाठी (मुगा सिल्क, सुती पंचे ३०) प्रसिद्ध आहे.

गुवहटीचा विमानतळ आमच्या हॉटेलपासून सुमारे २१ कि.मी.दूर होता. विमानतळावर पोहोचल्यावर मला सुखद अनुभव आला. ज्येष्ठ नागरीक असल्याने आम्हाला प्राधान्य देऊन तेथील स्त्री कर्मचाऱ्यांनी आमच्या सामानाची ट्रॉली स्वत: वाहून नेऊन सामानाचे स्कॅनींग करून check in counter पर्यंत पोहोचवून आमचे काम प्रथम करण्यास सांगितले. असा ज्येष्ठ सन्मान अजूनपर्यंत तरी कोठे भारतातील इतर विमानतळावर मिळाला नव्हता. अशा तऱ्हेने सतरा दिवसांची आमची 'सप्त भगिनींची भेट' सफळ संपूर्ण झाली.

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Our Family did the 7-8-9 too!

✶ ***Shubhada Suresh Agaskar*** ✶

***(neè Vaishali Madhav Jayakar)***


❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

It was a nice, sunny day. The skies were clear and the weather was warm. Then why did I feel as if I was approaching the gates of Hell? Was it because I could hear screams in the distance? Or was it because I could feel our daughter clinging desperately to me and whispering "Aie, aapan nako na jauya tikde." And then the gates opened and we entered……the Steven Spielberg Special Effects Studio exhibit at the Universal Studios in Singapore.

Our Kesari Tour spanned 3 countries- Singapore, Malaysia and Thailand. We i.e. parents-in-law, hubby, daughter and self had landed in Singapore the day before, in the wee hours of the morning. Welcomed by our tour leader-Ninad, and the local guide-Ivy (she looked like a doppelganger of Bharti Singh from Comedy Express, and was immediately nicknamed Bharti Maushi by our naughty co-travellers), we were whisked off for breakfast and the Singapore Flyer.

A huge Ferris wheel like structure that has cabins as big as small rooms, it offers a bird's eye view of Singapore. From the top, flyovers look like out of a Hot Wheels cars ad and the cars on them like tiny, coloured ants scurrying about their work. The harbour had little streaks of white- those were sailboats speeding in the distance. A queer collection of iron trees stood out just across. We were told that it was an attraction called "Gardens by the Bay", which we were to visit later on during the day.

After exiting the Flyer, we went off on a river cruise. As our coach rolled along the streets, we marvelled at the colourful buildings. Nearing the pier, we made ourselves comfortable on a boat




**Merlion**

that was to take us to see the famous Merlion of Singapore. On the way, we were asked to keep a lookout for kids diving into the river. As we neared the Fullerton Hotel, we were astonished to see a bronze sculpture of 5 boys that were urging each other to jump into the river. They looked so lifelike that we almost expected them to yell and hear the splash as they dove into the water. And the kid diving looked like he was suspended in mid air, without any support whatsoever. Aptly named "First Generation", the artist- Chong Fah Cheong



had captured the spirit of the first immigrants of Singapore and infused it into this work of art.

Most cities have a famous landmark. Paris has its Eiffel Tower, London has the Big Ben, Mumbai has the Gateway of India and Singapore has its Merlion. A mythical half-lion, half-fish like creature, it was believed to have been seen by the Malay prince Sri Tri Buana as he made his way from Suvarnabhumi to the neighbouring island of Bintan. As he stood upon a hill there, he espied a white beach in the distance and setting off to explore it, he came upon the island of Temasek. The moment he landed, he saw a beast that one of his entourage identified as a lion. Thinking that if this was a good place for lions to prosper, he would prosper there too and he decided that henceforth the island would be known as Singa-pura (Singa for lion and pura for city). Of course, the credit for establishing Singapore as a major trading centre goes to Sir Stamford Raffles and from then on, Singapore flourished!

The Merlion statue that we see today is a 70-tonne sculpture that gushes water into the bay. When we docked near it, there were hordes of tourists there, many armed with selfie sticks and all trying to get the perfect shot! We posed too and then came upon a stall selling Calamansi-a clear yellow-orange drink with a tart taste and which was simply yummy!

After a quick lunch and check-in into our hotel, we were off again to visit the above mentioned "Gardens by the Bay". Located in downtown Singapore, it is actually a set of 3 gardens created on 101 hectares of reclaimed land. A horticulturist's dream come true, it has various areas like the Flower Dome, the Cloud Forest and the SuperTree Grove.


The Flower Dome has a wide range of cactuses from across the world on its uppermost level with the lower level having a Flower Field with changing displays based on seasons and festivals. There are 1000 yr old olive trees and flower bedecked robotic dragonflies that gently flap their wings!

We then proceeded to the Cloud Forest, which was a 35 mtrs tall artificial mountain, covered in lush vegetation. We rode up to the top using an elevator and made our way down using metal walkways that gently descended to the bottom. Named "Walk in the Clouds", this descent kept us in awe at every turn. The walls were covered in ferns, orchids and begonias and we saw carnivorous plants like the Pitcher plants that we had hitherto read about only in our Biology textbooks. Divided into nine zones, this structure also has an artificial waterfall with a viewing gallery. My one regret was that I could not use my camera in this area as it was very moist. Walking over the metal and glass walkway gave us a thrill….it was as close to trekking through the mountains as one could make it. There was even fog in certain places, making it difficult to navigate!

But the best was yet to come! Making our way to the Supertree Grove, we made ourselves comfortable, stretching out our tired limbs on the grass. At dusk, the trees burst into light, heralding a magnificent show called as the "Garden Rhapsody". Popular soundtracks and a fantastic light display enthralled us and when it ended, there was pindrop silence-followed by the almost deafening sound of clapping! My camera battery conked out halfway through the display….later on, I found that I had almost exhausted the memory chip. Luckily, we had carried quite a few, anticipating this very problem!

Hauling our aching bodies back to the coach, we went for a quick dinner and rolled into bed with instructions to come down early for breakfast as we were to spend the next entire day at Universal Studios-Singapore.

Which brings me back to the start of the Special Effects Studio exhibit! With an already



scared daughter, hanging on to me for dear life, we made our way onto the special ramp and were cautioned to turn off our recording devices. And the show began! A force 8 hurricane hit the set, fires broke out, furniture exploded, windows got smashed, water gushed in and quite a few things happened, along with a huge boat that came careening in and stopped just a few inches from us and we heaved a sigh of relief even though we knew it was all ‘special effects’.

Another popular ride was the Transformers one. We stood in line and were told that it would take almost an hour and a half before our turn on the ride. But the wait was worth every bit of it! We wore 3D glasses and entered the car with huge anticipation. The ride took just a few minutes but was absolutely stunning. The effects were so realistic that I could feel the heat of blasts taking place in front of me. There was an all out war going on between the Decepticons and the Autobots and we were caught right in the middle. By the time it ended, we were left wanting more! Believe me when I say that Universal Studios has to be experienced firsthand!

Our third and final day in Singapore had us waking up at the crack of dawn to visit the Jurong Bird Park. Spread out over almost 20 hectares of land, this park is home to almost 5000 birds from 400 different species. There is a huge walk-in lory flight aviary, where one can meet and feed the birds. We collected small containers that were full of nectar and ventured onto the walkway. The birds took some time to realise that we were holding food, but the moment they did so, they came in droves. One sat on my hand and fed like a glutton, repeatedly dipping his beak in the nectar and shaking it. Most definitely a male….no table manners! Just joking….guys!!! We then saw the Flamingo Lake with hundreds of those pink birds…all doing yoga…by standing on one leg! The Penguin section has various varieties of penguins from across the world! The park has various bird shows that display birds of prey like eagles and hawks. Unfortunately, it started raining while the show was about to start and most of their birds were too bugged with the weather to perform. They did bring out a few colourful macaws that did some fabulous flights through the crowd, flying through numerous hoops that were held up by the staff sitting amongst the spectators.

The afternoon was spent visiting the Singapore Aquarium that enthralled us with a simply humungous tank that must have held close to some 1000 fishes, all living in perfect harmony. We also visited Madame Tussauds and got ourselves clicked with celebrities from all walks of life. My mother in law sat down next to Audrey Hepburn as she had breakfast at Tiffany’s while hubby made a beeline for David Beckham.

As our visit to Singapore drew to a close, we spent the last few hours shopping and then doing some late night packing. The title of this story reflects the timings that we had to adhere to, throughout our trip-Wake Up call at 7:00 a.m., breakfast at 8:00 a.m. and in the coach by 9:00 a.m. Those of you who wish to embark on this tour had better take extra large suitcases…we were really thankful for ours! The next day, we were to undertake a road journey to Malaysia. We bid goodbye to Singapore with a heavy heart and wished that we could visit this tourist friendly country again!

✳

# NEPAL

## (A Nature Paradise- Devasted by Earthquake)

**✶ Jayant B. Kirtikar ✶**

As a gift for my wife Nutan on her 60th Birthday in March early this year, we decided to go on a tour to the Himalayan country of Nepal. Both I and my wife are travel trotters, having toured almost all the states in India; along with one or two goreign countries as well, but we have yet to see the North-East corner of India, which God-willing, we wish to cover in the near future.

After landing at the Kathmandu airport early in the morning we went directly to Bhaktapur, which is dotted with many hritage pagoda - style wooden temples, dating back to more than a couple of centuries. At night we rested in Nagarkot, a hill station famous for sunrise viewing; which unforunately we missed due to cloudy weather. After visiting the Manakamna - devi temple by cable car the next day, we proceeded to Chitwan, a very tranquil forest area, where the only sounds were the fwitterings of a variety of birds. An elephant-safari in a dense jungle, and a dug-out canoe' ride in the crocodile in fested Budhi-Rapti river, were the highlights of our stay in Chitwan; followed by a tribal dance by the natives. During our stay in Pokhra, a town surrounded by the phewa lake; in the middle of which is situated the barahi-devi temple; we saw two of nature's surprises. one was a ground. level waterfall (davy's Fall) and second a milky white river known as Seti-Gorje.

On our return to kathmandu, we saw the world famous pashupathinath temple and the swayambhunath stupa, both attract hordes of tourists all year round. We also visited the 'Budha-neelkanth' mandir, where a sleeping vinshnu appears to be floating in water.

Nearing the end of our stay in Nepal, we were offered a one hour optional everest mountain flight. after having seen so many mountains from far and near on this tour as well as earlier tours, we were debating whether to spend an additional sizable amount on the mountain flight. But out local guide adivsed us that it was once - in - a - lifetime experience and not to miss it at any cost. So we reported to kathmandu airport at 6 am the next day. Asmall propeller driven aircraft having a capacity of about 40 seats, took off with 20 passengers on board, each of us in a window seat. compared to the jet-aircrafts that we are used to travel in these modern times, the progress of this plane appeared to be bollock cart type slew. As the view of the city, the roads and cars gradually grew smaller, the mountains started appearing at a distance. The airhostess gave each of us a map of various mountain. peaks that should be visible. slowly and steadily the snow draped mountains appeared unbelievably close and the different peaks were identified one by one by the air hostess like 'Annapurna', 'Dhavlagiri' 'Gauri-Shankar', 'Makalu', 'Kanchanjunga' and last but not the least Mount Everest'.

Each one of us was busy clicking photographs on cameras and cell-phones, and turn by turn every one was allowed in the cockpit for a few minutes to capture the $180^0$ view of the mountain ranges. The entire panorama of the golden snow-clad mountains at sunrise and the sky above made us stare in awe, and the vastness of nature made us introspect our earthly desires and wants, envy and natured; as compared to the ethereal beauty of nature. At the end of the flight we were given a certificate which said ''I have not climbed mount everest, but I have touched it with my heart'' How very true.

And about 15-20 days after we returned the horrible, massive earthquake struck nepal, killing about 800 innocent people and destroying many heritage temples and movements.

This is the vagary of nature!

✳

लेख

# जयोस्तुते

**✶ सुहासिनी कीर्तिकर ✶**

पंचवीसएक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मुलुंड कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळातर्फे ते सद्‌गृहस्थ पाहुणे म्हणून आले होते. आमचे प्राचार्य अ. द. ओक शिस्तशीर, गणितज्ञ, क्रीडाप्रेमी. पण सिनेमासृष्टीतील माणसांबरोबर त्यांचे समीकरण फारसे जुळणारे नव्हते. पण काय गंमत! 'ते' पाहुणे आले, कार्यक्रमाआधी प्रथेप्रमाणे प्राचार्यांच्या कचेरीत आदबशीर बसले, महाविद्यालयीन पातळीवर छाऽऽन गप्पा झाल्या. मुळात पाहुण्यांचे व्यक्तिमत्त्वच प्रसन्नतेचा शिडकावा करणारे, प्रज्ञा बहुविध विषयात रमलेली आणि पाहुणा म्हणून पाळावयाचे शिष्टाचार अत्यंत आदबशीर. म्हणजे सिनेकलावंत, तोही अतिलोकप्रिय असला; जरा प्रसिद्धीच्या वलयात;तर अहंभाव जपणारा असतो. कॉलेजने असेही अनेक कलावंत आधी पाहिलेले होते. म्हणून कार्यक्रम आटपल्यावर प्राचार्य ओक म्हणालेच मला, 'अत्यंत प्रभावी व्यक्तित्व; अन् सर्व उपचार सुसंस्कृतपणे पाळणारे' त्या पाहुण्यांना अहंभाव नव्हता; पण हा शेरा ऐकल्यावर अहंकार माझ्याच मनात दाटून आला. मनातच मी म्हटलं, मग? सुसंस्कृत असणारच. पाठारे प्रभु आहे तो!'

लक्षात आलंच असेल, मी कुणाविषयी हे म्हणत आहे. या पाठारे प्रभु कलावंताला नसेलच आठवत. हेही नसेल आठवत की अ.भा. मराठी साहित्य महामंडळाच्या तेव्हाच्या अध्यक्षा वसुंधरा पेंडसे नाईक अन् मी कार्यवाह; अशा दोघी तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांना - विलासराव देशमुखांना भेटायला गेलो होतो. बाहेरच्या खोलीत बोलावण्याची वाट बघत होतो. अशात 'हे' निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते आले. वसुंधराबाईंना मी उपचार म्हणून ओळख करून दिली. तेवढ्यात ते आत गेले. त्यांचे काम झाल्यावर बाहेर आले. आवर्जून बाईंकडे आले, चार शब्द बोलले अन् त्यांचा निरोप घेतला. यात काय मोठेसे? - असे वाटणे साहजिक आहे. पण खूप खूप अनुभव गाठीशी बांधल्यामुळे अशा प्रसंगी समोरच्याचा सुसंस्कृत स्वभावच मनात ठसला; बाई म्हणाल्या; 'सुसंस्कृत आहेत!'

रसिकहो, सांगायलाच हवं का? कोण ते 'सदगृहस्थ?... नको ना? सगळ्यांनाच ठावे आहे की हे सगळे महेश कोठारेंविषयी आहे. पुढे ते आदिनाथसह चिपळूणच्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनातही होते. त्यावेळी झालेल्या त्यांच्या मुलाखतीत ठसली ती आपल्या हाती घेतलेल्या कार्याविषयीची ठळक, ठाशीव भूमिका. १९६४ मधील 'छोटा जवान' चित्रपटसृष्टीला जवान करता झाला तो याच भूमिकेमुळे. म्हणूनच सचिन पिळगावकरनंतर (मराठी) चित्रपटसृष्टीत कार्यकारकीर्दीची पन्नाशी पूर्ण करण्याचा विक्रम यांनी केला.

पंच्याऐंशी, शहाऐंशीत त्यांनी सर्वार्थाने 'धूमधडाका'च लावला.

'धूमधडाका'चे दिग्दर्शनही त्यांचेच होते. या काळातील मराठी तरुणाला मराठी चित्रपटांची गोडी लावण्याचे काम इसाक मुजावरच्या मते दोघांनी केले. एक-दादा कोंडके, दोन-महेश कोठारे. 'धूमधडाका'नंतर पंचाक्षरी नावे असलेल्या चित्रपटनिर्मितीचा पंचाक्षरी मंत्रच जणू महेशना गवसला. किती किती नावे घ्यावीत? झपाटलेला, खतरनाक, खबरदार, धडाकेबाज, पछाडलेला... या सगळ्या पंचाक्षरी मंत्रांत एक जबरदस्त पछाडलेपण आहे. निर्माता, दिग्दर्शक महेशचे अन् प्रेक्षकांचेही. मराठी सिनेमाला संजीवन देण्याचे फार मोठे काम या मंत्राने केले. कारण हा नुसता निर्मितीचा झपाटा नव्हता;

**'जरा हसा'**

मुलगा:- आई! सांग बरं; माझ्या तोंडात काय आहे?


आई:- अरे! आता जेवलास नं तू? मग आता तोंडात परत काहीतरी?

मुलगा:- हात् वेडे! अगं, माझ्या तोंडात हवा आहे!! हाऽऽहाऽऽऽ!

त्यात तांत्रिकदृष्ट्या प्रयोग होते, 'कोठारे व्हिजन'ची 'व्हिजन' होती. 'सिनेमास्कोप' मराठीत? - हो! 'व्हिजन' असणाऱ्या महेश कोठारेंनी आणले. त्यांच्या 'चिमणीपाखरे'मध्ये 'डॉल्बी डिजिटल साऊंड'चा मराठीत प्रथम वापर झाला. आधुनिक ते ते 'सिनेसुंदर' करण्याचे द्रष्टेपण महेशमध्ये आहे; म्हणूनच 'कॉम्प्युटर' (संगणक)चा वापर झाला, ॲनिमेशन झाले मराठी चित्रपटात! 'तात्या विंचू' हा बाहुला आगळेपणाने प्रेक्षकांच्या 'गळी पडला'. याच बाहुल्याला मग 'झपाटल्या'मुळे दुसऱ्या आवृत्तीत 'थ्री डी' मध्ये सादर केले महेशनी. थ्री डी चा वापर मराठी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदाच झाला. महेशनी अनेक हिंदी चित्रपटांमधूनही अभिनयाची मोहोर उमटवली आहेच. 'मासूम', 'राजा और रंक', 'घर घरकी कहानी', 'सफर', 'लो मैं आगया'... हे त्यातले काही चित्रपट. शिवाय मराठीत तर त्यांनी अभिनय केलेल्या चित्रपटांची रांगच्या रांग आहे. दुभंग, वेड लावी जीवा, फुल ३ धमाल, शुभमंगल सावधान, दे दणादण, माझा छकुला... इ. इ. एका ओळीत दिव्यांची रांग असली की सारा आसमंतच उजळून जातो, प्रकाशरेषा झगमगती होते ना? अगदी तस्सेच हे!

यातल्या अनेक सिनेमांचे दिग्दर्शन (उदा. माझा छकुला, मासूम, पछाडलेला, धांगडधिंगा, लो मैं आगया, खतरनाक, चिमणी पाखरे वगैरे... वगैरे...) महेश यांचेच. अनेक पुरस्कारांनी त्यांच्या अभिनयाला, दिग्दर्शनाला सलामी दिली आहे ती यामुळेच. 'धूमधडाका'ला दिग्दर्शनाचे फिल्म फेअर अवॉर्ड (१९८६), 'माझा छकुला'च्या दिग्दर्शनाला स्क्रीन अवॉर्ड, खतरनाकलाही स्क्रीन अवॉर्ड (दिग्दर्शनासाठीच!) 'खबरदार' ला महाराष्ट्र राज्याचा

## हास्यचित्र



दिग्दर्शनाचा पुरस्कार आणि लक्षणीय म्हणजे २००९ मध्ये महाराष्ट्र राज्याने त्यांना 'आऊट स्टँडींग कॉन्ट्रीब्युशन ॲवॉर्ड' देऊन गौरवले. या सगळ्या पुरस्कारांच्या वर्षावाने महेश कधीच फुशारून गेले नाहीत. फळांनी लदलेले झाड नेहमीच लवते, नम्र होते ना? तसेच या पुरस्कारांनी महेश याची कारकीर्द लखलखीत झाली; पण त्यांचे हे कार्याचे 'आनंदाचे झाड' सदा नम्र होत बहरतच राहिले. 'अनोळखी दिशा', सध्याची गाजती 'जय मल्हार' या सारख्या मालिका या झाडाला फुटणारे आणखी फुटवे आहेत. 'जय मल्हार'ची लोकप्रियता महेशच्या लोकप्रियतेशी सध्या बरोबरी करतेय! म्हणजे आत्ता येऊन गेलेल्या गणेशोत्सवात गणपतीही 'खंडोबा'च्या रूपात काही ठिकाणी अवतरले. सोनेबाजारात सध्या 'जय मल्हार' मुळे पारंपारिक दागिन्यांच्या घडणीची वाढती मागणी आहे. ('जय मल्हार'ची वेशभूषा. रंगभूषा सौ. निलिमा महेश कोठारे यांची!)

महेश असे चित्रपटगृहाखेरीज मालिकांतून सध्या घराघरात पोहोचले आहेत. मराठी माणसांची चित्रपट माध्यमाबद्दलची जाण जाणीवपूर्वक घडवताहेत. प्रयोगशीलता हा त्यांचा धर्म आहे. याहीपेक्षा आणखी एक महत्त्वाचा पुत्रधर्म ते व्यावसायिक म्हणून पाळताहेत, कौटुंबिक पातळीवरही पाळताहेत. म्हणूनच त्यांच्या निर्मितीचे नाव आहे, 'जेनमा फिल्मस्!' आणि आपल्या कुठल्याही सिनेमात श्री. अंबर कोठारे यांची एक तरी भूमिका असतेच पोलीस कमिशनर/इन्स्पेक्टरची. वडिलांबरोबरीने अनेक चित्रपटात हा आपला ओळखीचा 'छोटा जवान' 'डॅम इट' करत पोलीस इन्स्पेक्टरच्याच भूमिकेत/रुबाबात वावरतो. श्री. अंबर आणि सौ. सरोजिनी (जेनी) ही चित्रपट, रंगभूमीवरची मंडळी. त्याला महेशच्या कर्तृत्वाने '...आणि मंडळी' असे रूप आले. आता त्यांचा मुलगा आदिनाथही रंगभूमी आणि चित्रपटातून 'आणि मंडळी'मध्ये सामील झालाय. सून सौ. उर्मिला कानेटकर-कोठारेही उत्कृष्ट अभिनयासाठी पुरस्कार पटकावत, नृत्य आणि अभिनयातून 'कोठारे व्हिजन'च्या नावलौकिकाला साजेल असे कर्तृत्व गाजवतेय.

हा वारसा आहे, महेश कोठारे नावाच्या एका निर्मात्याचा, अभिनेत्याचा, दिग्दर्शकाचा; कलावंताचा आणि सुसंस्कृत कलाकार घराण्याचा.

**बालविभाग**

# आई गं आई

आई गं आई!
काय गं बाई!
काम करतेस आणि ऑफिसला जातेस
अभ्यासही घेतेस, जेवणही बनवतेस
आई गं आई!
काय गं बाई!
कधी कधी मारतेस पण लाड तू खूप करतेस
तू कुशीत घेतेस तेव्हा बरं वाटतं,
जेव्हा तू रागावतेस तेव्हा वाईट वाटतं
आई गं आई!
काय गं बाई!
फिरायला जाऊ, चणे दाणे खाऊ
कुठे जायचं? सांग तू आई
मी मोठा झालो की परदेशीच जाऊ
मात्र तुला तिकडे काम करावं लागणार नाही.
आई गं आई!
काय गं बाई!

**-वरुण राकेश राणे**
इयत्ता ६वी

---

त्यांच्या कारकीर्दीच्या पन्नाशीनिमित्त त्यांना 'प्रभु तरुणा'तर्फे खूप खूप शुभेच्छा. 'जय मल्हार' गाजते आहे, त्याच थाटात आपण म्हणू या. 'जय महेश'. नाही तरी महेशाचेच रूप मल्हारीमार्तण्ड! तेव्हा परत एकदा 'जयतु महेशः।'

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Effect of social networking

✶ Aishwarya Velkar ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀




Like many, I am truly fascinated by this crazy world we live in. We now have the seamless ability to connect with people from all over the globe at any moment. **We can connect with old friends from past lives, stay in touch with those in our current lives, and even make new friends with the touch of a button.** In a very short amount of time social media has come to dominate the way we interact and communicate and yet it still doesn't quite feel real and tangible to me.

**Social media is also woven into the daily fabric of our lives in fitness and wellness.** We have access to data, ideas, new exercises, and the latest workout trends with the click of a mouse. We can track our calories,access coaches, and find instant answers to our questions. There are infinite possibilities to find right path for our journeys in fitness and wellness right here and right now.



Indeed, we live in a world of instants - instant messaging, text messaging, Skyping. The technology is dumbfounding and wonderful, and also frightening and confusing at the same time. Living in a world of instants has affected our health, emotionally and physically. The instant gratification we collectively seek has never been more pronounced than it is at this very moment in time. People want results and they want them now.

Technology allows us to take immediate steps to improve our fitness and health, yet at the same time technology can hinder or wellness if we aren't tuned in. **Technology as a whole is neither good nor bad - it's both. The key is having the self-awareness to decipher how technology is affecting us.** We have superb access to data and opinion. However, there is also a lot of bad information out there - including the information we *want* to seek rather than the information we *know* to be true from within. We tend to seek convenience and there is nothing more convenient than technology.

✳